


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ८ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## आज दहावीचा निकाल

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल उद्या शुक्रवार दि. ८ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी दिली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नउ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेचा निकाल पुढील अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येईल.



1) https://results.digilocker.gov.in
2) https://mahahsscboard.in
3) https://sscresult.mkcl.org
4) https://results.targetpublications.org
5) https://results.navneet.com
6) https://www.tv9marathi.com
7) https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-ssc-10-results

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना (पान २ वर)

## महुआ मोइत्रांना विमानात पाहताच प्रवाशांच्या 'चोर-चोर' घोषणा

**नवी दिल्ली:** तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार महुआ मोइत्रा पुन्हा एकदा एका वादामुळे चर्चेत आल्या आहेत. एका विमान प्रवासादरम्यान सहप्रवाशांनी त्यांना पाहून चोर-चोर अशा घोषणाबाजी केल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महुआ मोइत्रा विमानात चढत असताना किंवा आपल्या जागेवर जात असताना काही प्रवाशांनी त्यांना लक्ष्य केले. कॅश फार क्वेरी (प्रश्नांसाठी पैसे घेणे) प्रकरणात झालेल्या आरोपांचा संदर्भ देत प्रवाशांनी त्यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली.या घोषणाबाजीमुळे महुआ मोइत्रा यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी घोषणा देणा-या प्रवाशांना बदतमजी (असंस्कृतपणा) करू नका असे सुनावले. या गोंधळामुळे विमानात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही लोक प्रवाशांच्या या वागणुकीचे समर्थन करत आहेत, तर काही जण लोकप्रतिनिधीसोबत असे वागणे चुकीचे असल्याचे म्हणत आहेत.



## 'त्या' चौघांचा मृत्यू ऊंदीर मारण्याच्या औषधामुळे

**मुंबई :** येथील पायधूनी परिसरात डोकाडिया कुटुंबातील चारही सदस्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणी आतापर्यंतची सर्वात मोठी माहिती समोर आली आहे. ऊंदीर मारण्याच्या औषधाने चौघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आल्याने मोठी खळबळ ऊडाली आहे. चौघांच्याही शरीरात सापडले ऊंदीर मारण्याच्या औषधाचे झिंक फास्फाईटचे अंश सापडले आहेत. चौघांच्या शरीरात तसेच कलिंगडाच्या नमुन्यांमध्ये देखील सापडले झिंक फास्फाईट सापडले आहे.२६ तारखेला अवघ्या काही तासांच्या (पान २ वर)



## डॉक्टर हजारो लोकांना विष देणार होता

**अहमदाबाद :** देशात जैविक दहशतवादी हल्ला म्हणजेच बायो टेररिझमचा धोका वाढत आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणाने आयएसआयएसशी संबंधित बायो-टेरर प्लाटमध्ये डॉक्टरसह ३ लोकांविरुद्ध बुधवारी आरोपपत्र दाखल केले आहे. आरोप आहे की हे लोक सार्वजनिक ठिकाणी जैविक विषारी पदार्थांद्वारे हजारो लोकांना विष देण्याचा कट रचत होते. आरोपपत्रात हैदराबादचे डॉ. सय्यद अहमद मोहिउद्दीन आणि यूपीचे आझाद व मोहम्मद सुहेल यांची नावे आहेत. आरोपपत्र (पान २ वर)



# सत्ता स्थापनेसाठी दोन वेळ भेट देऊनही नाकारले

### 113 संख्येवर सरकार कसे स्थापन करणार? विजय यांना राज्यपालांचे अनेक सवाल

**चेन्नई /वृत्तसंस्था :** सरकार स्थापन करण्यासाठी लागणारे बहुमत कुठून आणणार, तुम्हाला कोण-कोणत्या पक्षांनी सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिला आहे?, असे प्रश्न तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी टीव्हीके पक्षाचे प्रमुख विजय यांना विचारले.



विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकल्यानंतर विजय यांनी राज्यपालांची दुस-यांदा भेट घेतली. मात्र, राज्यपालांकडून काही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याने सत्ता स्थापनेला विलंब होण्याचीच चिन्हे दिसत आहेत. तामिळनाडू विधानसभेची सदस्य संख्या २३४ आहे. विजय यांच्या पक्षाने निवडणुकीत १०८ जागा जिंकल्या. यात विजय हे दोन जागांवरून निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांनी एका जागेचा राजीनामा दिला तर हा आकडा १०७ इतका होईल. तामिळनाडूत सत्ता स्थापन करण्यासाठी ११८ बहुमताचा आकडा आहे. विजय यांनी निकाल लागल्यानंतर दोन वेळा राज्यपाल आर्लेकर यांची भेट घेउन सत्ता स्थापनेचा दावा केला. मात्र, बहुमताचा आकडा (पान २ वर)




*कोण आहेत तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर?*

### बहुमत असून सत्तास्थापनेत पेच; देशाचे लक्ष

*तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम अर्थात टीव्हीके पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. मात्र, कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने राज्यात 'त्रिशंकू' स्थिती निर्माण झाली आहे. सर्वांत मोठा पक्ष असलेल्या टीव्हीके यांनी राज्यपालांची भेट घेतली खरी, परंतु, बहुमत नसल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे. बहुमताचा आकडा असलेल्या आमदारांची संख्या असलेले पत्र घेउन येण्याबाबत राज्यपालांनी अभिनेता विजय यांना सांगितल्याचे म्हटले जात आहे. यावरून राज्यपालांवर टीका केली जात आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर कोण* (पान २ वर)

### भाजपाने देशभरात सगळे कोश्यारीच नेमलेत



*भाजपाचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी आडमुठी भूमिका घेतली आहे. सर्वात मोठा पक्ष ठरूनही त्यांनी टीव्हीकेला सत्तास्थापनेचे आमंत्रण दिले नाही. हे घटनात्मकदृष्ट्या चुकीचे आहे. १०८ जागा मिळूनही सत्तास्थापनेसाठी आमंत्रित करणार नसाल तर तुम्ही भंपक आणि खोटारडे आहात. भाजपाने देशभरात सगळे कोश्यारीच नेमलेत. कुणी धोतर नेसले आहे तर कुणी सुटा-बुटात आहेत, अशी टीका संजय राउतांनी केली.*

## नायब तहसीलदारांना चालत्या जेसीबीला लटकवून 4 किलोमीटरपर्यंत नेले, मुरूम माफीयांची दहशत



**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात महसूल विभागाच्या अधिका-यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ ऊडाली आहे. कुही तालुक्यातील बोरी नाईक परिसरात ५ मे रोजी मध्यरात्री ११:३० च्या सुमारास अवैध मुरूम उत्खनन करणा-या माफियांनी महसूल पथकावर हा हल्ला केला. या परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे आपल्या पथकासह कारवाईसाठी घटनास्थळी पोहोचले होते. मात्र, कायद्याचा कोणताही धाक न बाळगता मुरूम माफियांनी चक्क नायब तहसीलदारांच्या जीवावर उठण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे प्रशासकीय वर्तुळात संतापाची लाट उसळली आहे.

**जेसीबी न थांबवता तहसीलदारांना लटकवले; थरारक पाठलाग आणि माफयांचा धुमाकूळ**

कारवाईच्या दरम्यान नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे यांनी अवैध उत्खनन करणारा जेसीबी थांबवण्याचा प्रयत्न केला असता, चालकाने वाहन न थांबवता त्याचा वेग वाढवला. यावेळी निकाळजे यांनी जेसीबीला रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांना चालत्या जेसीबीला लटकवून तब्बल ३ ते ४ किलोमीटरपर्यंत नेण्यात आले. माफियांनी त्यांना गंभीर दुखापत करण्याचा आणि जेसीबीवरून पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. हा थरार बराच वेळ सुरू होता, मात्र काही अंतरावर पोलिसांची वाहने येताना दिसताच जेसीबी चालकाने घाबरून वाहन सोडून दिले आणि तिथून पळ काढला. महसूल विभागाच्या एका जबाबदार (पान २ वर)

## यूपीसह 9 राज्यांमध्ये पाऊस



**भोपाळ/लखना/जयपूर/डेहराडून :** उत्तर, मध्य आणि दक्षिण भारतात पावसाचा जोर कायम आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, झारखंड, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेशात बुधवारी पाउस झाला. तर बिहार, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशात गारपीटही झाली. उत्तर प्रदेशातील गाझीपूरमध्ये गोदामात ठेवलेले १०० क्विंटल गहू भिजले. राज्यात कमाल तापमान ४० अंशाच्या खाली आले आहे. आज ४४ जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहारमधील पाटणा परिसरात गारपीटही झाली. येथे दुपारच्या वेळीच अंधार पसरला. पूर्णियामध्ये वीज कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला. उत्तराखंडमधील केदारनाथ धामसह उंच शिखरांवर सलग चौथ्या दिवशी बर्फवृष्टी झाली. गुजरातमधील राजकोट देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. येथील तापमान ४२.९ अंशावर नोंदवले गेले. तर महाराष्ट्रातील वाशिममध्ये तापमान ४२.६ अंशावर होते. राजस्थानमधील फलोदीमध्ये सर्वाधिक तापमान ४२.८ अंशावर नोंदवले गेले. जयपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये बुधवारी कडक उन होते. जयपूरमध्ये रस्त्यांवर पाणी फवारण्यात आले. हवामान विभागाने आज आणि उद्या ७ जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यासह पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. तसेच, ८ मे पासून उष्णतेच्या लाटेचा इशाराही दिला आहे.

## पश्चिम बंगालमध्ये सत्तापालट! विधानसभा विसर्जित, ममता बॅनर्जीचे मुख्यमंत्रिपद संपुष्टात

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या राजकारणात आज एक मोठी ऐतिहासिक घडामोडी घडली आहे. राज्याचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी अधिकृतपणे पश्चिम बंगाल विधानसभा विसर्जित केली असून, यासोबतच ममता बॅनर्जी यांचा मुख्यमंत्री म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्टात आला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या मोठ्या विजयानंतर हा मोठा निर्णय घेण्यात आला. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला असून भाजपने बहुमताचा आकडा पार केला आहे. विशेष म्हणजे, ममता बॅनर्जी यांचा स्वतः:च्या बालेकिल्ल्यात, भवानीपूर मतदारसंघात सुवेंदु अधिकारी यांनी पराभव केला. या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता, ज्यामुळे राज्यात घटनात्मक पेच निर्माण झाला होता. अखेर राज्यपालांनी आपल्या अधिकारांचा वापर करत विधानसभा विसर्जित करण्याचे आदेश दिले. राज्यघटनेच्या कलम १७४ (२) (पान २ वर)



## टीएमसीचे 10 आमदार गायब

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्तांतरत्तांतर घडले आहे. विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी टीएमसीचा दारूण पराभव झाला. त्यानंतर पक्षाने आत्मचिंतन सुरू केले आहे. ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या निवासस्थानी टीएमसी आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला पक्षाच्या ८० आमदारांपैकी ७० आमदार पोहचले आणि १० आमदार गैरहजर राहिले. त्यामुळे विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे. पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदाची निवड करण्यासाठी बोलावलेल्या या बैठकीला आमदारांनी गैरहजेरी लावली त्यामुळे नव्या चर्चा रंगू लागल्या आहेत. पश्चिम बंगालमध्ये पराभव झाल्यानंतर टीएमसीने विधानसभेत आणि बाहेर दोन्ही मोर्चांवर रणनीती तयार करण्यासाठी निवडून आलेल्या ८० आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीतून १० आमदार गायब होते. या आमदारांच्या गैरहजेरीने राजकीय चर्चा रंगत होत्या, त्यात पक्षाने हे १० आमदार वेगवेगळ्या कारणास्तव अनुपस्थित होते असा खुलासा केला. बंगालमध्ये मागील १५ वर्षापासून ममता बॅनर्जी यांची सत्ता होती. परंतु यंदाच्या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांना सत्तेतून हद्दपार करण्यात भारतीय जनता पार्टीला यश आले. भाजपाने २०० हून अधिक जागा जिंकून बंगालमध्ये नवा (पान २ वर)




## शवविच्छेदनविना अंत्यसंस्कार..!

## दफन केलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढून शवविच्छेदन करण्याची मागणी

### ● ९ वर्षीय अन्वीच्या मृत्यूभोवती गूढ ● पीएम अहवाल नसल्याने मदत रखडली



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांहून अधिक काळ उलटला, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताने मोठी प्रगती साधली; मात्र आजही काही समाजघटक मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे वास्तव नेर तालुक्यातील आजंती येथील घटनेतून समोर आले आहे. पारधी समाजातील ९ वर्षीय अन्वी अनाडी भोसले हिचा पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करताना झालेला मृत्यू हा केवळ दुर्दैवी प्रसंग नसून ग्रामीण भागातील प्रशासनिक दुर्लक्ष आणि सामाजिक विषमतेचे गंभीर चित्र उघड करणारा ठरत आहे.

नेर तालुक्यातील आजंती येथील पारधी बेड्यावर ९ वर्षीय अन्वी अनाडी भोसले हिचा झालेला मृत्यू आता केवळ दुर्दैवी घटना न राहता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणारा गंभीर विषय बनला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करताना झालेल्या या मृत्यूनंतर शवविच्छेदन न करताच अंत्यसंस्कार करण्यात आल्याने संपूर्ण प्रकरण अधिक संशयास्पद बनले आहे.मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसताना शवविच्छेदन न होणे ही गंभीर प्रशासकीय त्रुटी असल्याचे बोलले जात आहे. उष्माघात, अशक्तपणा किंवा अन्य कोणते कारण याबाबत अधिकृत वैद्यकीय निष्कर्ष समोर आलेला नाही. त्यामुळे या प्रकरणातील सत्य अद्यापही अंधारातच आहे.विशेष म्हणजे, या नववर्षीय बालिकेचा दफनविधी करण्यात आला असून आता शासनाने मृतदेह पुन्हा बाहेर काढून (उत्खनन करून) शवविच्छेदन करावे आणि मृत्यूमागील वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी ठाम मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली (यवतमाळ शाखा) यांच्यावतीने करण्यात येत आहे.संघटनेच्या प्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली असून, या प्रकरणाचा सविस्तर अहवाल वरिष्ठ शासकीय यंत्रणेकडे पाठविण्याची तयारी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा प्रशासन, महसूल विभाग, आरोग्य विभाग तसेच राज्य शासन स्तरावर या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात यावी, यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले. संघटनेच्या मते, शवविच्छेदन न झाल्याने केवळ मृत्यूचे गूढ वाढले नाही तर पीडित कुटुंब शासकीय मदतीपासूनही वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून चौकशी करण्याची मागणीही होत आहे.दरम्यान, या घटनेमुळे पारधी समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडे पुन्हा लक्ष वेधले गेले आहे. आजंती येथील पारधी वस्तीवर पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे, घरकुल योजना प्रलंबित असणे आणि अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगावे लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

> ***आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली (यवतमाळ शाखा) यांनी प्रशासनाकडे गंभीर मागणी केली आहे की, ९ वर्षीय अन्वी अनाडी भोसले हिचा दफन करण्यात आलेला मृतदेह शासनाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुन्हा बाहेर काढावा आणि तातडीने शवविच्छेदन करावे. कारण वास्तविक पाहणी केल्यानंतर संघटनेच्या निदर्शनात आले की शवविच्छेदन न झाल्याने मृत्यूचे खरे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मृत्यू नैसर्गिक, उष्माघातामुळे की अन्य कारणाने झाला, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. पीएम अहवालाशिवाय कुटुंब शासकीय मदतीपासून वंचित राहू शकते. त्यामुळे संबंधित प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे प्रकरण राज्य व वरिष्ठ शासकीय स्तरावर नेले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.शिवाय संपूर्ण घटनेचा अहवाल शासन व मानवाधिकार यंत्रणांना सादर करण्यात येणार असून एका निष्पाप बालिकेच्या मृत्यूचे सत्य दडपले जाऊ नये. वस्तुस्थिती जनतेसमोर आलीच पाहिजे,अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.***



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, ८ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# १० वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचारप्रकरणी आरोपी जेरबंद

## १०५ पोलिसांचे जंगलात दोन दिवस 'कॉम्बिंग ऑपरेशन'; सावरगावच्या दुर्गम वनक्षेत्रातून आरोपीला पकडले



■ प्रतिनिधी | अकोला ■

*पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून फरार झालेल्या ६० वर्षीय आरोपीला अकोला पोलिसांनी तब्बल दोन दिवसांच्या थरारक शोधमोहिमेनंतर अटक केली. घनदाट जंगल, कोणताही तांत्रिक पुरावा नसणे, आरोपीकडे मोबाईल वा वाहन नसणे आणि पोलिसांकडे आरोपीचा फोटोही उपलब्ध नसतानाही तब्बल १०५ पोलिसांच्या पाच विशेष पथकांनी राबविलेल्या 'कॉम्बिंग ऑपरेशन'मुळे अखेर आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकला.*

या प्रकरणी चान्नी पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक २०५/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(१), ६५(२), ३५१(२)(३) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ३, ४, ४(२), ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी महिला व तिचे पती हे ५ मे रोजी मजुरीच्या कामासाठी बाहेर गेले असताना आरोपी जगराम गोविंदा आडे (वय ६०, रा. सावरगाव ता. पातूर) याने घरात एकटी असलेल्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. ही घटना कोणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकीही आरोपीने दिली होती. घाबरलेल्या पीडितेने आईला प्रकार सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी तत्काळ चान्नी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांना आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश दिले. सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची तीन पथके, चान्नी पोलीस स्टेशनचे पथक, बाळापूर उपविभागातील पोलीस पथके, आरसीपीची दोन पथके, दोन श्वान पथके आणि ड्रोन कॅमेऱ्यांची मदत घेऊन व्यापक शोधमोहीम सुरू करण्यात आली. मात्र आरोपीकडे मोबाईल नव्हता, तो पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार नव्हता, त्याचा फोटो उपलब्ध नव्हता आणि जंगल परिसराची त्याला संपूर्ण माहिती होती. त्यामुळे पोलिसांसमोर हे मोठे आव्हान उभे राहिले.

### २५ किलोमीटरच्या घनदाट जंगलात 'कॉम्बिंग'

सावरगाव, चोंडी, वनदेव, वसाली, नवेगाव, पांगरताटी, झरंडी, शेकापूर या वनक्षेत्रांसह सावरगाव धरण परिसरात दोन दिवस सलग पोलिसांनी अक्षरशः पायी फिरून शोधमोहीम राबवली. या भागात वाहन जाण्यासाठी रस्ते नसल्याने रखरखत्या उन्हात पोलिसांना जंगल तुडवत शोधकार्य करावे लागले. दिनांक ६ मे ते ७ मेदरम्यान सुरू असलेल्या या मोहिमेत १०५ पोलिस अधिकारी-कर्मचारी, ४ ड्रोन कॅमेरे, श्वान पथके आणि वन विभागाची मदत घेण्यात आली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी वन विभागाच्या डीएफओ सुमन सोळंके यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली होती. त्यानुसार आरएफओ जाधव यांच्या नेतृत्वाखाली वन विभागाचे पथकही पोलिसांच्या मदतीला उतरले.



### स्थानिक नागरिकांच्या मदतीने आरोपी ताब्यात

अखेर ७ मे रोजी ग्रामस्थ आणि वन विभागाच्या मदतीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी जगराम गोविंदा आडे याला सावरगाव जंगल परिसरातून ताब्यात घेतले. कोणतीही ठोस माहिती वा तांत्रिक आधार नसताना पोलिसांनी सातत्याने केलेल्या मेहनतीला यश मिळाल्याने संपूर्ण पोलीस दलाने सुटकेचा निश्वास सोडला.

### या अधिकाऱ्यांनी सांभाळली मोहिमेची धुरा

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, सपोनि रविंद्र लांडे, पोउपनि विष्णु बोडखे यांच्यासह पोलीस कर्मचारी शेख हसन, महेंद्र मलीये, सुलतान पठाण, खुशाल नेमाडे, किशोर सोनोने, वसीमोद्दीन, एजाज अहमद, श्रीकांत पातोंड, धिरज वानखडे, राज चंदेल, सतिश पवार, अशोक सोनवणे, आकाश मानकर, स्वप्नील चौधरी, उदय शुक्ला, शेख अन्सार, चालक प्रशांत कमलाकर, मनीष ठाकरे, देवानंद खरात, रामकिसन डोईफोडे आदींनी सहभाग घेतला.

### रोहित पवारांची पीडित कुटुंबाला भेट

या घटनेचे राज्यभर पडसाद उमटत असताना आमदार रोहित पवार यांनी ७ मे रोजी पीडित मुलीच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना धीर दिला. यावेळी आमदार नितीन देशमुख, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, ठाणेदार रविंद्र लांडे यांच्यासह पोलिसांचा ताफा उपस्थित होता. पीडित मुलगी शिक्षणात अत्यंत हुशार असल्याचे समजताच रोहित पवार यांनी तिच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याची ग्वाही दिली. तसेच आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करून हे प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालविण्याची मागणी त्यांनी केली. राज्यात वाढत्या अत्याचारांच्या घटनांवर संताप व्यक्त करताना 'अशा घटना घडत असतील तर मुलींना जन्माला घालणे कठीण होईल,' अशी संतप्त भावना पीडितेच्या आईसह गावातील महिलांनी व्यक्त केली. यावर रोहित पवार यांनी राज्य सरकारने महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत अधिक गंभीर होण्याची गरज असल्याचे सांगत कठोर कायद्याची आवश्यकता व्यक्त केली. पीडित मुलीच्या कुटुंबीयांशी संवाद साधताना आमदार रोहित पवार यांनी, 'पीडितेला न्याय मिळेपर्यंत आपण हा लढा सोडणार नाही,' अशी ग्वाही दिली. आरोपीला कठोर शिक्षा मिळावी यासाठी न्यायालयीन प्रक्रियेचा सातत्याने पाठपुरावा करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

---

## जिल्हा कारागृहात क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.७ मे रोजी जिल्हा कारागृह वाशीम येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर, कारागृह अधीक्षक मोहन पाटील, तुरुंगअधिकारी राजेंद्र राठोड यांचे मार्गदर्शनाखाली वैद्यकिय अधिकारी डॉ विजय गोटे यांचे सहकार्याने बंधीस्त असलेल्या व्यक्तीपैकी संशयित क्षयरुग्णाची डिजिटल एक्स रे मशीन द्वारे तपासणी करण्यात आली.

क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ६२ कैदी व्यक्तीचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित फार्मसी ऑफिसर ऋषीकेश मिसूरकर, परिचर प्रशांत तूरक, वाहनचालक शिवाजी देशमुख. पो कॉ अमोल पाखरे, ज्ञानेश्वर जगताप तसेच जिल्हा कारागृहाचे सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. समुपदेशक पंढरी देवळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ करुणा आरु यांनी १८ बंधिस्तांची एच आय व्हि तपासणी केली.

---

## पातुरातील चिमुरडी अत्याचार प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा

### - आरोपीला फाशीची शिक्षा द्या
### - वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

पातुर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत सावरगाव येथे १० वर्षीय चिमुरडीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, या प्रकरणातील आरोपीवर फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून त्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी अकोला यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. पोलिसांचा वचक कमी झाल्याने खून, प्राणघातक हल्ले, लुटमार तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. निवेदनात म्हटले आहे की, सावरगाव येथे आई-वडील मजुरीसाठी बाहेर गेले असताना घरात एकटी असलेल्या १० वर्षीय मुलीवर गावातील एका नराधमाने लैंगिक अत्याचार केला. या घटनेत पीडित मुलीची प्रकृती चिंताजनक असून, मानवतेला काळिमा फासणारी ही घटना असल्याचे नमूद करण्यात आले. या प्रकरणातील आरोपीला तत्काळ कठोर शिक्षा व्हावी, यासाठी हा खटला विशेष फास्टट्रॅक न्यायालयात चालविण्यात यावा. तसेच सरकारने सक्षम सरकारी वकिलांची नियुक्ती करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

निवेदन देतेवेळी महिला जिल्हाध्यक्ष आम्रपाली खंडारे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, ज्ञानेश्वर सुलताने, प्रभाताई शिरसाट, संगीता अढावू, राजकुमार दामोदर, मजहर खान, गजानन गवई, गोरसिंग राठोड, किशोर जामणिक, विकास सदांशिव, लक्ष्मीताई वानखडे, मंगलाताई शिरसाट, पवन बुटे, शरद इंगोले, नगरसेविका उज्वलाताई पातोडे, जयश्रीताई बहाद्दूरकर, नगरसेवक शेख शमशू, पराग गवई, सुनील इन्नाणी, नितीन सपकाळ, ज्योती खिल्लारे, प्रदीप शिरसाट, वसंतराव नागे, अजय शेगावकर यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## शासकीय निवासी शाळेत प्रवेशप्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील सुरकुंडी येथील अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येते. या निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी (सेमी इंग्रजी माध्यम) पर्यंतच्या वर्गांसाठी प्रवेश अर्ज मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना मोफत निवास, ग्रंथालयीन सुविधा, सुसज्ज संगणक कक्ष तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रवेशासाठी जागांचे आरक्षण प्रवर्गनिहाय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

---

## मातृदीनानिमित्त मंगरूळनाथ ब्रह्माकुमारीज परिवार करणार मातांचा सत्कार

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, गोविंद ऑइल मिलच्या बाजूला मंगरूळपीर येथे दि. १० मे रविवारी संध्याकाळी ५:३० ते ७:०० या वेळात मातृदिनाच्या निमित्ताने मातांच्या सत्काराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. मंगरूळनाथ सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सारिका दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला वाशिम सेवा केंद्राच्या मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी रुक्मिणी दीदी तर प्रमुख अतिथी म्हणून रिसोड सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी असणार आहेत. मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मातृ दिवस दरवर्षी साजरा केला जातो यावर्षी सुद्धा सारिका दीदी यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या कार्यक्रमातून मंगरूळनाथ शहरातील अनेक मातांचा सत्कार करून मातांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे. मातृशक्ती ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. जननी आणि जन्मभूमी या दोहोचेही ऋण जन्मोजन्मी फेडणे अशक्य आहे. परंतु मातांच्या या ऋणाचे ओझे हलके करण्यासाठी त्यांच्याप्रती सदभाव सहानुभूती स्नेह व्यक्त करणे हे प्रत्येक मनुष्याचे आद्य कर्तव्य आहे. माता ही आमचे सुरक्षा कवच आहे कारण ती आम्हांला प्रत्येक संकटातून बाहेर पडण्याची शक्ती आणि युक्ती प्रदान करते. मेणबत्तीप्रमाणे स्वतः आयुष्यभर जळत राहून इतरांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य केवळ माताच अविरतपणे करीत असते. मातृदिनाच्या निमित्ताने ब्रह्मकुमारीज परिवार अकोला वाशिम सेवा केंद्र मुख्य प्रभारी राजयोगिनी ब्रह्माकुमारी रुक्मिणी दीदी यांचे विशेष मार्गदर्शन व आशीर्वाचन मिळणार आहे.

---

## मॉ गंगा मेमोरियल नर्सिंग महाविद्यालय व बाहेती हॉस्पिटलमध्ये रोजगार मेळावा; ५० हून अधिक पदांसाठी संधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यांतर्गत प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २० मे २०२६ रोजी मॉ गंगा मेमोरियल नर्सिंग महाविद्यालय व बाहेती हॉस्पिटल, वाशिम येथे हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून विविध नामांकित रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करणार आहेत.

या मेळाव्यात हिंदुजा हॉस्पिटल अपोलो हॉस्पिटल मॉ गंगा मेमोरियल नर्सिंग महाविद्यालय व बाहेती हॉस्पिटल या संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. विविध पदांसाठी ५० पेक्षा अधिक रिक्त जागांकरिता मुलाखती घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाणार आहे. वाशिम जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील इच्छुक स्त्री व पुरुष उमेदवारांनी महास्वयं रोजगार पोर्टल या संकेतस्थळावर सेवायोजन कार्डच्या युजरनेम व पासवर्डद्वारे लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार विविध पदांसाठी पसंतीक्रम नोंदवावा. तसेच दि. २० मे २०२६ रोजी आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

---

## सलोखा योजनेतून शेतजमिनीचे वाद मिटणार

### पिढ्यान् पिढ्यांची वैरभावना संपुष्टात येण्यास मदत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेतजमिनीच्या ताबा व वहिवाटीवरून वर्षानुवर्षे सुरू असलेले वाद मिटवून समाजात सलोखा निर्माण करण्याच्या उद्देशाने शासनामार्फत राबविण्यात येणारी 'सलोखा योजना' शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. या योजनेमुळे प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या जमिनी संबंधित शेतकऱ्यांच्या नावावर होणार असल्याने पिढ्यान् पिढ्या सुरू असलेले वाद, तणाव आणि वैरभावना संपुष्टात येण्यास मदत होणार आहे.

दि. १२ डिसेंबर २०२२ रोजी शासनाने या योजनेस मंजुरी दिली असून, दि. ७ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार योजनेचा कालावधी वाढवून दि. १ जानेवारी २०२७ पर्यंत करण्यात आला आहे. गावपातळीवर अनेक ठिकाणी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे, तसेच दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील जमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असल्याचे दिसून येते. अशा जमीनधारकांच्या परस्पर अदलाबदलीनंतर संबंधित क्षेत्र प्रत्यक्ष ताब्यानुसार त्यांच्या नावावर होणार असून, त्याप्रमाणे वहिवाट सुलभ होणार आहे. या योजनेअंतर्गत अदलाबदल दस्तासाठी नाममात्र मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क आकारण्यात येते. यासाठी केवळ १ हजार रुपये नोंदणी फी व नाममात्र मुद्रांक शुल्क १ हजार रुपये भरावे लागते. सदर योजना केवळ शेतजमिनींसाठी लागू असून, लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी संबंधित गावातील तलाठी यांच्याकडे अर्ज करावा. दोन्ही बाजूंच्या क्षेत्रफळामध्ये कितीही फरक असला तरी संबंधित जमीनधारक या योजनेसाठी पात्र राहतात.

---

## रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी 'सिल्क, मिल्क व मीट' तिहेरी उत्पन्नाची संधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य व केंद्र शासनामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तुती लागवड, संगोपनगृह (शेड) उभारणी तसेच आवश्यक साहित्य खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे.

रेशीम शेतीमुळे केवळ रेशीम उत्पादनच नव्हे तर दुग्ध व्यवसाय व शेळीपालन यालाही चालना मिळत असून शेतकऱ्यांना 'सिल्क, मिल्क व मीट (मांस)' या तिहेरी उत्पन्नाचा लाभ मिळत आहे. तुतीची पाने प्रथिनेयुक्त असल्याने ती दुभत्या जनावरांसाठी उपयुक्त ठरतात. मर्यादित प्रमाणात तुतीची पाने जनावरांना दिल्यास दूध उत्पादनात वाढ होते, तसेच शेळीपालनात बकऱ्यांची तब्येत सुधारून प्रजनन क्षमताही वाढते, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे हा उद्योग अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी परवडणारा व शाश्वत ठरत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना १ एकर तुती लागवडीसाठी तीन वर्षांत सुमारे ४ लक्ष ३२ हजार २४० पर्यंत अनुदान दिले जाते. यात तुती लागवड, औषधे व संगोपनगृह उभारणीसाठी मदत केली जाते.

सिल्क समग्र-२ योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी ७५टक्के तर अनुसूचित जाती-जमातींसाठी ९०टक्के अनुदान दिले जाते. यामध्ये तुती लागवड, सिंचन सुविधा व किटक संगोपन साहित्य यासाठी आर्थिक मदत दिली जाते.

---

## चित्ररथाचे वाशिमकरांनी केले जोरदार स्वागत

### क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले द्विशताब्दी जयंती निमित्ताने महाराष्ट्रभरात फिरतोय चित्ररथ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ दरम्यान केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने हा चित्ररथ महाराष्ट्रभर फिरविण्यात येत आहे. हा चित्ररथ दि. ५ मे रोजी शहरात दाखल झाला. शहरवासीयांनी चित्ररथाचे जोरदार स्वागत केले. हा रथ पाहण्यासाठी शहरवासीयांनी मोठी गर्दी केली होती.

या चित्ररथामध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे तसेच महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. यासोबतच राजर्षी छत्रपती शाहू महाराज, घटनेचे शिल्पकार



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे चित्ररथात साकारण्यात आले आहेत. विशेष म्हणजे महात्मा जोतीराव फुले लिखित पुस्तक व पेन या ज्ञानाच्या प्रतीकांची प्रभावी मांडणी करून समाजप्रबोधनाचा संदेश दिला जात आहे. तसेच यामध्ये भिडेवाड्याची प्रतिकृती देखील साकारण्यात आली आहे. राज्य शासनाच्या वतीने भिडे वाड्याचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे ही प्रतिकृती आकर्षणाचा केंद्र ठरली आहे. शहरात आगमन होताच या चित्ररथाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्ष अनिल केंदळे, डॉ. विजय कानडे, नारायण नवले मुंबई, समता परिषदेचे प्रदेश चिटणीस प्रा. अरविंद गाभणे आदींसह मान्यवरांनी चित्ररथातील महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भारत शहरातील विविध मार्गावरून फिरविण्यात आला. शहरातील नागरिक तसेच विद्यार्थ्यांनी रथाचे जोरदार स्वागत केले. तर अनेकांनी चित्ररथा समोर सेल्फी घेतले. यावेळी क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते, सत्यशोधक समाज, माळी कर्मचारी सेवा मंडळ, माळी युवा मंच, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आदी संघटनांचे कार्यकर्ते, नगर परिषदेचे नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी, तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६० ■ शुक्रवार ८ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# राज्यातील बाल वैज्ञानिकांची झेप आता थेट नासापर्यंत

## शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांची संकल्पना

## ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ शासन निर्णय जारी

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि त्यांना जागतिक दर्जाच्या संशोधन संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी प्रयत्न करून पाठपुरावा केलेल्या 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' या अभिनव उपक्रमाचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा अमेरिकेतील नासा आणि भारतातील इस्रो या नामवंत संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्दिष्टांना अनुसरून राज्यातील शिक्षण पद्धतीत प्रयोगशीलता आणि संशोधनवृत्ती वाढवण्यासाठी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर सातत्याने प्रयत्नशील होते. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे आता विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता प्रत्यक्ष कृतीतून विज्ञानाचे धडे मिळणार आहेत.



**शासन निर्णयातील महत्त्वाच्या बाबी**

राज्यातील तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या २१४८ विद्यार्थी आणि २० पर्यवेक्षकांसाठी नजीकच्या विज्ञान केंद्राची (नागपूर, पुणे किंवा मुंबई) सहल आयोजित केली जाईल. यासाठी प्रति व्यक्ती २० हजार रुपये खर्च जिल्हा नियोजन समितीमधून (डीपीडीसी) करण्यात येईल.

जिल्हा स्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना आणि ८ शिक्षकांना बंगळूरू येथील इस्रो केंद्राला भेट देण्यासाठी शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी प्रति व्यक्ती २५ हजार रुपये खर्च निर्धारित केला आहे. यामध्ये सर्वसाधारण, दिव्यांग आणि आदिवासी अशा सर्व गटांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय प्रदर्शनातील उत्कृष्ट ५१ बाल वैज्ञानिक आणि ४ अधिकारी अशा एकूण ५५ जणांना अमेरिकेतील नासा केंद्राच्या ८ दिवसांच्या भेटीसाठी पाठवण्यात येईल. यासाठी प्रति व्यक्ती ६ लाख रुपये याप्रमाणे एकूण ३ कोटी ३० लक्ष रुपयांच्या खर्चास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या सूचनेनुसार, या वारीसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी तालुका स्तरावर गट शिक्षणाधिकारी, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि राज्य स्तरावर संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या संपूर्ण उपक्रमाचे संनियंत्रण राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांना नासासारख्या संस्थेत जाण्याची संधी - डॉ.भोयर**

या निर्णयाबद्दल राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, शासन निर्णय हा राज्यातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यालाही नासासारख्या संस्थेत जाण्याची संधी मिळावी, हा आमचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमातून भविष्यातील वैज्ञानिक घडतील, असा मला विश्वास आहे.

---

## घामाच्या किमतीला अखेर न्याय

# हमाल कामगारांना तब्बल १ कोटी ७५ लाखांची थकीत लेव्ही मंजूर

## आ. समीर कुणावार यांच्या पाठपुराव्याला यश

**वर्धा जनमाध्यम :** वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या हक्काच्या पैशासाठी शासन दरबारी हेलपाटे मारणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील हमाल कामगारांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्य हाताळणीचे काम करणाऱ्या हमाल कामगारांना माहे फेब्रुवारी २०१७ ते डिसेंबर २०२० या कालावधीतील ३० टक्के लेव्हीची थकीत रोख रक्कम अदा करण्यास शासनाने मंजुरी दिली असून एकूण तब्बल १ कोटी ७५ लाख ३५ हजार १९६ रुपयांची देयके मार्गी लागली आहेत.



या महत्त्वपूर्ण निर्णयामागे हिंगणघाट विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर कुणावार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची मोठी भूमिका असल्याचे बोलले जात आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रश्नासाठी त्यांनी शासन स्तरावर वारंवार पाठपुरावा करून हमाल कामगारांच्या न्याय्य मागणीला आवाज दिला. अखेर शासनाने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील नियम क्र. ४० (१) अंतर्गत अधिकार वापरत या देयकांना मंजुरी दिली.

जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार हमाल कामगारांची एकूण थकीत देणी शासनाकडे पाठविण्यात आली होती. त्यानंतर संबंधित प्रकरणी मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र. ६७७३/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून तसेच रकमेची तपासणी शासनाच्या प्रचलित नियमांनुसार करण्यात आली. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाने देयक वितरणास हिरवा कंदील दिला.या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यातील शेकडो हमाल कामगारांच्या घरात आर्थिक दिलासा पोहोचणार असून अनेक कुटुंबांचा रखडलेला उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटणार आहे. आमच्या घामाच्या कष्टाला अखेर न्याय मिळाला, अशी भावना व्यक्त करत कामगारांनी आमदार समीर कुणावार यांचे आभार मानले आहेत.

दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने हमाल कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

---

# पींगर विकणाऱ्याच्या लेकीची थेट पोलिस दलात झेप

## आईची मजुरी, बापाचा संघर्ष लेकीने जिंकली खाकी

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** घरात ना पैशांची श्रीमंतीष्ठ ना कुठला मोठा आधारष्ठ वडील गावोगावी फिरून पींगर विकतात, भंगार गोळा करतातष्ठ आई दुसऱ्यांच्या शेतात मजुरी करून संसाराचा गाडा ओढतेष्ठ अशा हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या एका लेकीने आज कष्ट, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर थेट नागपूर पोलिस दलात धडक मारत गरिबीच्या काळोखावर यशाचा प्रकाश पाडला आहे.सिंदी रेल्वे येथील साक्षी कल्पना रोहीदास वर्जे हिची नागपूर पोलिस विभागात निवड होताच संपूर्ण परिसरात अभिमानाचा आणि भावनांचा पूर उसळला. भंगार विकणाऱ्याची लेक पोलीस झाली, ही बातमी गावोगावी पोहोचताच अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.तीन मुली आणि आई-वडील अशा पाच जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी साक्षीचे वडील उन्हातान्हात गावोगावी फिरून पींगर विक्री आणि भंगार व्यवसाय करतात. आई शेतमजुरी करते. अनेकदा घरात आर्थिक चणचण, अडचणी, उपासमारीचे प्रसंग आले; पण या संघर्षानेच साक्षीला खंबीर बनवले. परिस्थितीसमोर हार न मानता एक दिवस पोलीस बनायचेच हा निर्धार तिने मनाशी पक्का केला.दिवसरात्र अभ्यास, शारीरिक तयारी आणि प्रचंड मेहनतीच्या बळावर साक्षीने अखेर आपले स्वप्न सत्यात उतरवले. तिच्या या यशाने सिंदी रेल्वे परिसरातील सर्वसामान्य कुटुंबांतील मुलींना नवी दिशा मिळाली आहे. गरिबी ही कमजोरी नसते, जिद्द असेल तर नशीबही बदलते, हे साक्षीने आपल्या यशातून दाखवून दिले.साक्षीच्या या ऐतिहासिक यशाबद्दल गावकऱ्यांनी तिच्या घरी जाऊन भावनिक सत्कार केला. शाल, श्रीफळ आणि पेढे देत तिच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण उपसभापती वर्षा सुनील बोंबले, नगरसेवक आशिष देवतळे यांच्यासह अमोल सोनटक्के, प्रशांत कलोडे, आनंद छाजेड, गौरव कलोडे, धनराज झिलपे, अमित सातपुते, धर्मेंद्र झाडे, मिलिंद पेटकर, खुशाल बोरकर, संजय तडस, बालू इंगोले, श्रीकांत घोडमारे, चंपू भन्साली, सुनील बोंबले, विनायक सोनटक्के, किशोर सोनटक्के आणि संदीप आगलावे उपस्थित होते.



---

# अल्पवयीन मुलीवर मातृत्व लादणाऱ्यास २० वर्षांचा सश्रम कारावास

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवत वारंवार लैंगिक अत्याचार करून तिला मातृत्व लादणाऱ्या आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली. जिल्हा न्यायाधीश-३ सतीश गो. अडके यांनी आरोपी राजकुमार विनायक कासार (वय २३, रा. रामपूर, ता. आर्वी) यास भादंवि कलम ३७६(२)(एन) तसेच पोक्सो कायद्यान्वये २० वर्षांचा सश्रम कारावास व २० हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास अतिरिक्त सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत १० वर्षांचा सश्रम कारावास व पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. प्रकरणानुसार, आरोपीने जानेवारी २०२१ मध्ये सावंगी परिसरातील घुबडटोली जंगलात पीडितेला नेऊन लग्नाचे आमिष दाखवत अत्याचार केला. त्यानंतर आठ ते दहा वेळा तिचा लैंगिक छळ करण्यात आला. काही महिन्यांनी पीडितेची मासिक पाळी बंद झाल्याने आईने तिला रुग्णालयात नेले असता ती सात महिन्यांची गर्भवती असल्याचे उघड झाले. त्यानंतर आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक ज्योत्स्ना गिरी यांनी केला. न्यायालयात अतिरिक्त सरकारी वकील विनय घुडे यांनी शासनाची बाजू मांडली.

---

# शेतकऱ्यांच्या जमिनीवर जबरदस्ती चालणार नाही; योग्य मोबदला द्या

## मांडगाव परिसरातील पावरग्रीड टॉवर लाईनविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलनाचे संकेत : अतुल वांदिले

**हिंगणघाट जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव, नंदपूर आणि सुजातपूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातून प्रस्तावित पावरग्रीड टॉवर लाईन टाकण्याच्या कामाला तीव्र विरोध होत असून, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत काम होऊ देणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी हिंगणघाट येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, संबंधित भागातील अनेक शेतकऱ्यांची शेती ओलीताखाली असून अत्यंत मौल्यवान आहे. या शेतांमधून पावरग्रीड टॉवर लाईन टाकण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.



तसेच कंपनीकडून शेतकऱ्यांवर मानसिक दबाव टाकला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणतीही जबरदस्ती खपवून घेतली जाणार नाही. योग्य मोबदला मिळाल्यास आम्ही विचार करू, मात्र अन्यथा एकाही कंपनीला शेतात टॉवर उभारू देणार नाही, असा ठाम इशारा अतुल वांदिले यांनी दिला.

मांडगाव परिसरातील शेतकऱ्यांनी लेखी तक्रारीद्वारे आपली व्यथा राष्ट्रवादीकडे मांडली असून प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

---

# ५ वर्षीय नातीवरील अत्याचारप्रकरणी आजोबांना २० वर्षांचा सश्रम कारावास

## वर्धा न्यायालयाचा कठोर निर्णय

**वर्धा जनमाध्यम :** ज्या नात्यावर विश्वास, माया आणि संरक्षणाची जबाबदारी असते, त्याच नात्याला काळीमा फासणाऱ्या एका निर्घृण आजोबाला वर्धा जिल्हा न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे. अल्पवयीन नातीवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या कारंजा तालुक्यातील नारा येथील ५६ वर्षीय आरोपीस जिल्हा न्यायाधीश-३ सतीश गो. अडके यांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.न्यायालयाने आरोपीस पॉक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत १० वर्षांचा सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड, तर कलम ६ अंतर्गत २० वर्षांचा सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाचीही तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यात संताप व्यक्त होत असून न्यायालयाच्या कठोर भूमिकेचे स्वागत केले जात आहे.

घटनेच्या वेळी पीडित बालिका अवघ्या पाच वर्षांची होती. ६ सप्टेंबर २०२३ रोजी तिची आई मजुरीसाठी बाहेर गेली होती. घरात आरोपी असलेला चुलत सासरा ऑपरेशनमुळे विश्रांती घेत होता, तर सासू शेतात गेल्या होत्या. संध्याकाळी घरी परतल्यानंतर पीडितेची आई मुलीकडे लक्ष देत असताना काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता धक्कादायक प्रकार उघड झाला.

यानंतर कारंजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक पुनम गिरडकर यांनी पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला, तर पैरवी अधिकारी म्हणून पंचम कोडगिरवार यांनी काम पाहिले. साक्षी, पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद लक्षात घेत न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत ७ मे २०२६ रोजी शिक्षा सुनावली.

---

# पेट्रोल माफियांचा काळा खेळ उघड

## सावंगी पोलिसांची मध्यरात्री अवैद्य पेट्रोल डिझेलवर कारवाई

### ५.४७ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघे जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलच्या काळाबाजाराचा गुप्तपणे सुरू असलेला धोकादायक खेळ अखेर सावंगी (मेघे) पोलिसांनी उघडकीस आणला. मध्यरात्रीच्या सापळ्यात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५ लाख ४७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तिघांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे इंधन माफियांचे धाबे दणाणले आहेत.

सावंगी पोलिसांचे पथक नियमित रात्रीची गस्त घालत असताना दहेगाव गावंडे ते सालोड हिरापूर मार्गावर पेट्रोलचा अवैध साठा वाहून नेला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ नाकाबंदी करून संशयित वाहनांना अडविण्याची मोहीम सुरू केली. त्यावेळी पांढऱ्या रंगाचे मालवाहू वाहन संशयास्पदरीत्या जाताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता वाहनात मोठ्या प्रमाणात पेट्रोलने भरलेल्या प्लास्टिक कॅन आढळून आल्या.

या प्रकरणी विशाल दत्ता लखवादे (३१) रा. क्षीरसमुद्रपूर, स्वप्नील आनंद सुरजुसे (३१) रा. येळाकेळी आणि सचिन शंकर वानखेडे (३४) रा. येळाकेळी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. वाहनातून १५ मोठ्या प्लास्टिक कॅनमध्ये भरलेले सुमारे ४५० लिटर पेट्रोल जप्त करण्यात आले. या पेट्रोलची किंमत ४६ हजार ८०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. तसेच पेट्रोल वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले एमएच २७ एक्स ८५२३ क्रमांकाचे वाहन, प्लास्टिक पाईप आणि इतर साहित्य असा एकूण ५ लाख ४७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.



ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पंकज वाघोडे, प्रभारी ठाणेदार नागेशकुमार चतरकर आणि पोलिस उपनिरीक्षक सचिन कानडे यांनी केली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध इंधन साठा आणि काळाबाजार करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा अवैध धंद्यांविरोधात आणखी कठोर मोहिम राबविण्याचे संकेत दिले आहेत.

---


**कार्यालय ग्रामपंचायत, टाकळी (किटे)**
**पंचायत समिती, सेलू, जि.वर्धा**
**पेपर निविदा सूचना-१/२०२६-२७**

१५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता अनुभवी कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छुक कंत्राटदारांनी ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून मोहरबंद लिफाफ्यात स्वतः किंवा पोस्टाने ग्रामपंचायत कार्यालय टाकळी (किटे) येथे सादर करावी. उशिरा प्राप्त होणाऱ्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**निविदेचा तपशील**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत व तांत्रिक मान्यता क्र. | निविदा सादर करण्याची दिनांक | निविदा उघडण्याची संभाव्य दिनांक | निविदा प्रपत्र किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १५ वा वित्त आयोग अंतर्गत सिमेंट नाली बांधकाम टाकळी (किटे) (संजय सुरजुसे ते चंद्रभान टेकाम) | ६२२/२५-२६ १५००००/- | ०७.०५.२०२६ ते १५.०५.२०२६ | १९.०५.२०२६ | १०००/- | १५००/- |

**अटी व शर्ती -**

१) निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्या.

२) अनुभवी व पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा स्विकारल्या जातील.

३) नियमानुसार शासकीय कपाती करुनच देयक अदा करण्यात येईल.

४) निविदा स्विकारण्याचे व नाकारण्याचे सर्व अधिकार ग्रा.पं.टाकळी (किटे) कडे राखील राहील.

स्वा/-
सरपंच,
ग्रामपंचायत टाकळी (किटे)

स्वा/-
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत टाकळी (किटे)



**कार्यालय ग्रामपंचायत, उमरी (मेघे), ता.जि.वर्धा**
**पंचायत समिती वर्धा, जि.प.वर्धा**
**निविदा सूचना**

सर्व नोंदणीकृत कंत्राटदार, पुरवठादार यांना सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत उमरी (मेघे) येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध योजने अंतर्गत मंजूर कामांकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. कोरी निविदा फॉर्म प्रसिध्दीच्या दिनांकापासून दिनांक ०८.०५.२०२६ ते १४.०५.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रु.१०००/- मध्ये उपलब्ध होईल व निविदा सभेच्या दिवशी उघडण्यात येईल.

| अ.क्र. | | कामाचे लोकेशन | टी.एस.नं. | प्रा.किंमत | निविदा फी | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा स्विकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | डीपीसी २०२५-२६ | मौजा उमरी (मेघे) येथील स्मशानभूमी बांधकाम करणे | १७९१/EE /२५-२६ | १०००००० | १००० | १०००० | ६ महिने | ०८.०५.२०२६ ते १४.०५.२०२६ | १५.०५.२०२६ किंवा सभेच्या दिवशी |
| २. | जि.वा.यो. जनसुविधा | मौजा-उमरी (मेघे) वार्ड नं.०३ येथील शुभांगी टेलर ते श्री.केळझरकर ते श्री.नाखले ते श्री.ढोकणे यांच्या घरा-पर्यंत सिमेंट रोड बांधकाम करणे | १९३६/EE /२५-२६ | १०००००० | १००० | १०००० | ६ महिने | ०८.०५.२०२६ ते १४.०५.२०२६ | १५.०५.२०२६ किंवा सभेच्या दिवशी |
| ३. | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | मौजा-उमरी (मेघे) येथील वार्ड नं.०३ मधील आपले सरकार सेवा केंद्र येथे शौचालय बांधकाम करणे | ६८०/DE/ /२५-२६ | ४००००० | १००० | ४००० | ६ महिने | ०८.०५.२०२६ ते १४.०५.२०२६ | १५.०५.२०२६ किंवा सभेच्या दिवशी |

१. अटी व शर्ती शासकीय नियमानुसार राहील. त्यात फेरबदल करणे मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार प्रशासक व सचिवास राहील. शासकीय शर्ती लागू राहील.
२ निविदा उपलब्धीनुसार कामाचे मुल्यांकन झाल्यानंतर देय अदा करण्यात येईल.
३. कामाच्या सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.

स्वा/-
प्रशासक,
ग्रा.पं.उमरी (मेघे)
ता.जि.वर्धा

स्वा/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं.उमरी (मेघे)
ता.जि.वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## शासकीय विद्यानिकेतनांतील शिक्षक भरती प्रक्रिया गतीमान करा

### रोस्टर तपासणी तातडीने पूर्ण करण्याचेही निर्देश- डॉ.भोयर

**मुंबई दि. ७ :** शासकीय विद्यानिकेतनांतील सहाय्यक शिक्षकांची पदभरती पवित्र प्रणालीमार्फत करण्यासाठी रोस्टर तपासणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. शासकीय विद्यानिकेतनांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. बैठकीस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे आयुक्त, संचालक, उपसंचालक, संबंधित अधिकारी आणि विद्यानिकेतनचे माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, राज्यात विद्यानिकेतनांच्या केवळ पाच शाळा कार्यरत असून, शिक्षक पदभरतीसंदर्भातील सर्व कार्यवाही पुढील पाच दिवसांत पूर्ण करण्यात यावी. पवित्र पोर्टल ३१ मेपर्यंत सुरू असल्याने रोस्टर तपासणीसह इतर आवश्यक प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विद्यानिकेतनांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासगट स्थापन करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. सध्या सुरू असलेल्या इयत्ता ६ वी ते १० वीच्या वर्गांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर इयत्ता ११ वी व १२ वीचे वर्ग सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.इयत्ता ६ वी तसेच पुढील वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील अधिकार प्राचार्यांना देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली. शाळांची इमारत आणि वसतिगृहांची तपासणी करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे अथवा नवीन इमारती उभारण्यासाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.याशिवाय विद्यानिकेतनांतील विविध समस्या, पायाभूत सुविधा आणि आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यासंदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## मूठ गावाने मिळवला स्वगणना मोहिमेत सिंधुदुर्गात पहिला मान

### सर्व कुटुंबांची स्वगणना पूर्ण

**सिंधुदुर्गनगरी, दि. ०७ :** स्वगणना मोहिमेत वेंगुर्ला तालुक्यातील मूठ गावाने उल्लेखनीय कामगिरी करत सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मूठ हे सर्व कुटुंबांची स्वगणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिले महसुली गाव ठरले आहे. जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक पातळीवरील नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हा महत्वाचा टप्पा गाठण्यात प्रशासनाला यश आले आहे. मूठ गावात एकूण ३६ घरे आणि ४३ कुटुंबांचा समावेश असून, गावची लोकसंख्या १४४ आहे. गावातील सर्वच कुटुंबांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. या यशामागे तहसीलदार ओंकार ओतारी यांचे सूक्ष्म नियोजन महत्त्वाचे ठरले. तसेच नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी आणि सर्व तलाठी यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हे अभियान यशस्वी झाले. विशेष म्हणजे, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, ही बाब उल्लेखनीय ठरली. मूठ गावाची ही कामगिरी जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरली असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे कोणतेही उद्दिष्ट साध्य होउ शकते, हे अधोरेखित झाले आहे. जिल्ह्यातील इतर गावांनीही मूठ गावचा आदर्श घेउन स्वगणना प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी केले आहे.

## पशुसंवर्धन सेवेतील 3103 अधिकारी पदांसाठी 11 जूनला परीक्षा

**मुंबई, दि. ७ :** राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अच्या २ हजार ७९५ आणि सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट अच्या ३०८ पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा ११ जून २०२६ रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून संबंधित उमेदवारांची परीक्षा सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. राज्यातील पशुसंवर्धन विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी रिक्त असल्याने पशुवैद्यकीय सेवा, पशुधन आरोग्य तपासणी, लसीकरण आणि ग्रामीण भागातील शेतक-यांना तातडीची मदत देण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, खूप दिवस झाले आपण ज्या अत्यंत आनंदाच्या बातमीची प्रतीक्षा करत आहात, ती बातमी तुम्हा सर्वांना देण्यासाठी मला आनंद होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी गट अ या पदासाठी २७९५ तर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट अ या पदासाठी ३०८ जागांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय झालेला आहे. ११ जून २०२६ रोजी ही परीक्षा आहे. एवढे सर्व अधिकारी पशुसंवर्धन खात्यात रु जू झाल्यानंतर विभागाच्या कामाला मोठा वेग मिळेल. ग्रामीण भागातील लोकांच्या आणि त्यांच्या पशुधनाची अधिक चांगली काळजी घेणे शक्य होईल. या भरतीमुळे राज्यातील पशुवैद्यकीय यंत्रणेला मोठे बळ मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करून या परीक्षेला बसणा-या सर्व परीक्षार्थींना मंत्री पंकजा मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या.

## इयत्ता चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची उत्तरसूची प्रसिद्ध

**मुंबई, दि. ७ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार २६ एप्रिल, २०२६ रोजी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. सातवी) आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेची इयत्तानिहाय, पेपरनिहाय अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची परिषदेच्या www.mscepune.in ´É https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे. या अंतरिम उत्तरसूचीवर काही आक्षेप असल्यास त्याबाबतचे निवेदन परिषदेच्या संकेतस्थळावरु न ऑनलाईन स्वरूपात करता येईल. हे निवेदन पालकांकरिता संकेतस्थळावर व शाळांकरिता त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्रुटी/ आक्षेपाबाबतचे ऑनलाईन निवेदन भरण्याकरिता ७ ते १४ मे २०२६ या कालावधीची मुदत देण्यात येत आहे. त्यानंतर निवेदन स्वीकारले जाणार नाही. तसेच ऑनलाईन निवेदनाशिवाय इतर कोणत्याही प्रकारे प्राप्त त्रुटी/ आक्षेपाबाबतच्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही, असेही परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात जहाजबांधणी प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा उभाराव्या

**मुंबई, दि. ७ :** राज्यातील जहाजबांधणी व सागरी पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टीने नांदगाव, दिघी आणि विजयदुर्ग या तीन संभाव्य स्थळांचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक आढावा घेण्यात आला असून, सिंधुदुर्ग जिल्ह्यास प्राधान्य देत संबंधित स्थळांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण, पुनर्भरण, ट्रॅफिक लाँचिंग तसेच सागरी पायाभूत सुविधांच्या नियोजनाबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. जहाजबांधणी उद्योगात गुंतवणूक करू इच्छिणा-या ऑपरेटर्सना प्राथमिक स्वरूपातील माहिती व अहवाल उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. यावेळी जहाजबांधणी प्रकल्पासाठी संभाव्य स्थळांबाबत तांत्रिक क्षमता, समुद्रातील खोली, भूगर्भीय स्थिती, संपर्क व्यवस्था आणि भविष्यातील औद्योगिक संधी संदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. बैठकीस महाराष्ट्र सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप, हस्कोनिंग कंपनीचे श्री जॉन सम्यूएल, श्री बिजापूर, तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.






# भारत-व्हिएतनाम संबंध अधिक दृढ करण्यासाठी महाराष्ट्र कटिबद्ध-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### बौद्ध वारसा पर्यटन, उद्योग, स्मार्ट सिटी आणि गुंतवणूक क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर

**मुंबई/प्रतिनिधी :**भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र विश्वासार्ह भागीदार म्हणून कार्य करण्यास सज्ज आहे.व्हिएतनाम सोबत सांस्कृतिक, आर्थिक आणि परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या एक दिवसीय मुंबई भेटीदरम्यान आयोजित इंडिया-व्हिएतनाम बिझनेस फोरमला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना गुंतवणुकीसाठी राज्यात येण्याचे आवाहन केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत आणि व्हिएतनाम भागीदारी अधिक दृढ होउन एन्हान्स्ड काम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रटेजिक पार्टनरशिप नव्या स्तरावर नेल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा समृद्ध वारसा सांगताना मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारु न त्याला आधुनिक काळात मिळवून दिलेल्या अधिष्ठानाचा परिचय दिला. तसेच युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा आणि वेरु ळ येथील बौद्ध आणि जैन लेणी येथे व्हिएतनामच्या गुंतवणुकदारांचे स्वागत केले. छत्रपती संभाजीनगर आणि हो चि मिन्ह सिटी यांच्यात थेट हवाई सेवा सुरू करण्यासह स्वतंत्र बौद्ध पर्यटन सर्किट विकसित करण्याचा प्रस्ताव त्यांनी यावेळी मांडला.

मुंबई आणि हो चि मिन्ह मध्ये साधर्म्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या कराराचे स्वागत केले. तसेच व्हिएतनाम कंपनी विनग्रूपच्या महाराष्ट्रातील ६.५ अब्ज अमेरिकन डालर्सच्या प्रस्तावित गुंतवणुकीच्या कराराचे स्वागत करताना हा दक्षिण पूर्व आशियातून झालेला सर्वात मोठा करार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, गडचिरोली आदी शहरांमध्ये असलेल्या औद्योगिक संधींबद्दल माहिती देउन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना उद्योग, उर्जा, औषधनिर्माण, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन अशा विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. मुंबई आणि पुणे येथील औषधनिर्माण क्षेत्र जागतिक दर्जाचे असून व्हिएतनामला परवडणारी जेनेरिक औषधे आणि लसींचा विश्वासार्ह पुरवठा करण्याची क्षमता राज्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र-व्हिएतनाम व्यावसायिक परिषद दरवर्षी मुंबई आणि हो चि मिन्ह सिटी येथे आळीपाळीने आयोजित करण्याचाही प्रस्ताव मुख्यमंत्री यांनी मांडला. व्हिएतनामच्या प्रतिनिधींच्या मुंबईतील पहिल्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भेटीसाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

**भारत-व्हिएतनाम आर्थिक भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी उद्योग क्षेत्राने पुढे यावे**

\- राष्ट्राध्यक्ष तो लाम

भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील सर्वंकष आर्थिक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी उद्योग, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि व्यापार क्षेत्रात दोन्ही देशांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी या फोरममध्ये बोलताना केले.

मुंबई हे भारताचे प्रमुख आर्थिक आणि औद्योगिक केंद्र असून येथे आयोजित हा कार्यक्रम भारत-व्हिएतनाम संबंधांना नवी दिशा देणारा असल्याचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी नमूद केले. बदलत्या जागतिक परिस्थितीत आर्थिक सहकार्य, जागतिकीकरणातील नव्या संधी आणि विश्वासार्ह भागीदारीचे महत्त्व अधिक वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत-व्हिएतनाम द्विपक्षीय व्यापार सातत्याने वाढत असल्याचे सांगून यामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक संबंध अधिक मजबूत होत असल्याचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी नमूद केले. इलेक्ट्रिक वाहने, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान सेवा, उर्जा आणि उद्योग क्षेत्रात भारत आणि व्हिएतनाम यांच्यात सहकार्याच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक भारतीय उद्योग व्हिएतनाममध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असून हे सहकार्य भविष्यातील व्यापार आणि उत्पादन क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

द्विपक्षीय सहकार्य अधिक प्रभावी करण्यासाठी व्यापार सुलभीकरण, आर्थिक सहकार्य वाढविणे, पायाभूत सुविधा आणि लाजिस्टिक कनेक्टिव्हिटी मजबूत करणे, कौशल्य विकासाला चालना देणे आणि गुंतवणूक प्रक्रियेत अधिक सुलभता आणणे या प्रमुख बाबींवर भर देण्यात येणार असल्याचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी सांगितले. व्यापार क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी दोन्ही देशांनी एकमेकांच्या अनुभवांचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले. भारतीय उद्योगांना व्हिएतनाममध्ये अधिक गुंतवणूक करण्याचे आणि अनुभव व तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या उपस्थितीत दोन्ही देशांमधील विविध क्षेत्रांमधील उद्योगांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

## शेत/ पाणंद रस्त्यांना प्राधान्य देउन ग्रामीण रोजगाराला गती द्यावी -मंत्री भरत गोगावले

**मुंबई, दि. ७** - रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबविण्यात येणा-या मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देउन तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करु न ग्रामीण रोजगाराला गती देण्याचे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिले.ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शेतक-यांना आवश्यक सुविधा आणि ग्रामविकासाला गती देण्याच्या दृष्टीने मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विभागीय आढावा बैठक घेण्यात आली.मंत्री भरत गोगावले यांनी विविध जिल्ह्यांतील रोजगार हमी योजनेच्या अधिका-यांशी सविस्तर चर्चा करत सध्या सुरू असलेल्या मनरेगा व मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत कामांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. यामध्ये रोजगार हमी योजनेतील नोंदणीकृत मजुरांची संख्या, प्रत्यक्ष सुरू असलेली कामे, प्रलंबित मंजुरी, निधी वापर, तसेच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांबाबतची सद्यस्थिती यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, केंद्र शासनाने व्ही.बी.जी राम जी अधिनियम २०२५ पारित केला असला तरी सदर अधिनियम अद्याप अंमलात आलेला नसून मनरेगा योजना पूर्ववत सुरू आहे. त्यामुळे विद्यमान कार्यपद्धतीनुसार सर्व कामे वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाकडून मनरेगा कामांसाठी कोणतीही अंतिम कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेत/ पाणंद रस्त्यांची कामे ही राज्य शासनाची प्राधान्याची योजना असल्याचे सांगत मंत्री भरत गोगावले यांनी या कामांमध्ये अधिक गतिमानता आणण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेउन शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात शेत/ पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. क्षेत्रीय स्तरावर या कामांच्या अंमलबजावणीस गती द्यावी, असे त्यांनी सांगितले. मंजूर कामांची अंदाजपत्रके तातडीने तयार करून त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच संबंधित कामांचे वर्ककोड तत्काळ तयार करून कार्यारंभ आदेशासह हजेरीपत्रके निर्गमित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सुरू असलेल्या कामांची उर्वरित हजेरीपत्रके देखील त्वरित निर्गमित करून कामांचे मोजमाप घेउन देयके नरेगासाफ्ट प्रणालीवर विनाविलंब नोंदविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.केंद्र शासनाने जिल्हाधिका-यांच्या परवानगीने ग्रामपंचायत स्तरावर २० पेक्षा अधिक कामे सुरू करण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शासनमान्य शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्याने मंजुरी देण्याचे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले. संभाव्य एल निनो परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यासाठी शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांवर विशेष भर देण्याचेही त्यांनी सांगितले. या बैठकीस रोजगार हमी योजना विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## एआय उपयुक्त, पण मानवी भावना आणि सर्जनशीलतेला पर्याय नाही

### टेक वारी २.० कार्यक्रमातील कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स- परिसंवादात मान्यवरांचे मत

**मुंबई, दि. ७ :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही कला, चित्रपटसृष्टी तसेच सर्वच क्षेत्रासाठी उपयुक्त तांत्रिक साधन असले, तरी मानवी भावना, संवेदना आणि सर्जनशीलतेची जागा ती कधीच घेउ शकत नाही, असा सूर मंत्रालयात आयोजित टेक वारी २.०- कार्यक्रमातील कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स या परिसंवादात उमटला. कला, चित्रपट आणि शिल्पकलेतील मान्यवरांनी एआयच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना तंत्रज्ञानाचा वापर सजगतेने आणि विचारपूर्वक करण्याची गरज अधोरेखित केली. सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित टेक वारी २.० अंतर्गत कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात काळा घोडा आर्ट्स फेस्टिव्हलच्या संस्थापक आणि कलाकार बृंदा मिलर, शिल्पकार अरझान खंबाटा, चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी आणि ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होत्या. काळा घोडा फेस्टिव्हलच्या आयोजक तथा संस्थापक बृंदा मेलर म्हणाल्या की, गेली २७ वर्ष काळा घोडा फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते आहे. या फेस्टीव्हलमध्ये सातत्यता असल्यामुळेच हा फेस्टिव्हल यशस्वी आहे. कोणत्याही खाजगी फेस्टिव्हलला जर शासनाचा पाठिंबा मिळाला तर ते काम चांगले यशस्वी होते हेच काळाघोडा फेस्टिव्हलचे यश आहे. सुरूवातीला या फेस्टिव्हलला मर्यादा होती. आता फेस्टिव्हल शासनाच्या मदतीमुळे चांगला होत आहे याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी चित्रपट क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ प्रवासातील बदलत्या तंत्रज्ञानाचा अनुभव कथन केला. सुरुवातीच्या काळात चित्रपटांमध्ये ॲनिमेशनचा वापर का करत नाही, असा प्रश्न विचारला जात असे. त्यानंतर त्यांनी स्वत?चे प्रशिक्षण केंद्र सुरू करून नवोदित कलाकारांना संधी दिली.

## सायबर सुरक्षेसाठी कठोर कायदे, आधुनिक तपास यंत्रणा आणि जनजागृतीवर भर- प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

**मुंबई/प्रतिनिधी :** डिजिटल व्यवहारांचा झपाट्याने वाढणारा वापर आणि त्यासोबत वाढणा-या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेसाठी आवश्यक धोरणात्मक बदल, कठोर नियम आणि व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत असल्याचे माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले. सायबर गुन्हेगार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लक्ष्य करत असून या गुन्हेगारीचे स्वरूप आता पूर्णपणे संघटित आणि कार्पोरेट पद्धतीचे बनल्याने अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित टेक वारी २.० महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह अंतर्गत इव्हाल्विंग लँडस्केप इन सायबर सिक्युरिटी थ्रेट्स, चॉलेंजेस अँड ऑपर्चुनिटीज या विषयावरील सत्रात ते बोलत होते. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, डिजिटल व्यवहार दिवसेंदिवस वाढत असताना केवळ तांत्रिक सुरक्षा उपाय पुरेसे राहिलेले नाहीत. सुरक्षित व्यवहार पद्धतींचा अवलंब आणि नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची बाब आहे. सायबर गुन्हेगार सातत्याने नव्या तंत्रांचा वापर करत असल्याने कायद्यांमध्ये आवश्यक बदल करून अधिक कडक नियम लागू करणे गरजेचे ठरत आहे. त्याचबरोबर तपास यंत्रणांना आधुनिक साधने आणि विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**म्यूल अकाऊंट्स आणि क्रिप्टोकरन्सीद्वारे पैशांची विल्हेवाट**

सायबर फसवणुकीमागे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संघटित आर्थिक जाळे कार्यरत असल्याचे सांगताना त्यांनी या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. फसवणूक झाल्यानंतर काही मिनिटांतच रक्कम विविध खात्यांत विभागली जाते. त्यासाठी म्यूल अकाउंट्सचा वापर केला जातो. त्यानंतर हे पैसे वेगवेगळ्या व्यवहारांतून पुढे पाठवले जाउन अखेरीस क्रिप्टोकरन्सीत रूपांतरित केले जातात आणि परदेशात पाठवले जातात.

हब बिलिंग पद्धतीने मोठी रक्कम लहान व्यवहारांमध्ये विभागल्यामुळे पैशांचा मागोवा घेणे तपास यंत्रणांसाठी अत्यंत कठीण बनते. या संपूर्ण प्रक्रियेत ठरावीक वेळेत व्यवहार पूर्ण करण्यासाठी सर्व्हिस लेव्हलनुसार नेटवर्क नियंत्रित केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. डालरशी निगडित स्टेबल काइन्स, विशेषतः यूएसडीटीसारख्या माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असल्याने सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान अधिक गंभीर बनले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**डिजिटल अरेस्टच्या नावाखाली मानसिक दबाव,**

नागरिकांनी बळी न पडण्याचे आवाहन

देशात डिजिटल अरेस्टसारख्या नव्या प्रकारच्या फसवणुकींनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले असल्याचेही त्यांनी सांगितले. बनावट फोन किंवा व्हिडिओ कालद्वारे स्वताला पोलीस, सीबीआय किंवा अन्य सरकारी अधिकारी म्हणून भासवले जाते आणि नागरिकांना मानसिक दबावाखाली ठेवून लाखो रु पयांची फसवणूक केली जाते. सायबर गुन्हेगार सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा वापर करून सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून नागरिकांना जाळ्यात ओढतात. बनावट संकेतस्थळे, फेक ॲप्स, डीपफेक व्हिडिओ आणि व्हाईस इम्पर्सनेशनचा वापर वाढत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

परदेशातून चालणारे काल सेंटर नेटवर्क

म्यानमार, लाओस आणि कंबोडिया येथून विविध भाषांमध्ये भारतीय नागरिकांना लक्ष्य केले जात असल्याचे सांगून ते म्हणाले की, या आंतरराष्ट्रीय जाळ्यांमुळे सायबर गुन्ह्यांचा तपास अधिक गुंतागुंतीचा होत असून क्रिप्टोकरन्सीद्वारे पैसा देशाबाहेर पाठवला जात असल्याने तपास प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सायबर फसवणुकीपासून बचावासाठी नागरिकांनी अनोळखी काल, लिंक आणि संशयास्पद संदेशांपासून दूर राहावे, वैयक्तिक माहिती मर्यादित प्रमाणातच शेअर करावी आणि कोणतीही फसवणूक लक्षात येताच तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन ब्रिजेश सिंह यांनी केले.राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन १९३० वर तक्रार नोंदवल्यास संशयास्पद व्यवहार थांबवण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच cybercrime.gov.in या पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवण्याची सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्वरित बँकेशी संपर्क साधणे, पासवर्ड बदलणे आणि संबंधित पुरावे जतन करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही ब्रिजेश सिंह यांनी अधोरेखित केले.

## रक्ताच्या कर्करोगाशी झुंजणा-या चिमुकल्या विवेकला जीवदान

**नागपूर :** रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या तीन वर्षीय विवेक किरण देशमुख या चिमुकल्याला मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून तातडीची आर्थिक मदत मिळाल्याने त्याच्यावर वेळेत उपचार होउन त्याला नवजीवन मिळाले आहे. नागपूरातील सावित्रीबाई फुले नगर, पार्वती नगर येथे राहणा-या विवेकच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून एकूण तीन लाख रु पयांची मदत मंजूर करण्यात आली.



विवेकला रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाल्यानंतर त्याच्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले. हातमजुरी करून उदरनिर्वाह करणा-या आई-वडिलांसमोर मुलाच्या उपचाराचा मोठा खर्च उभा राहिला होता. डॉक्टरांनी तातडीने केमोथेरपी आणि अन्य वैद्यकीय उपचार सुरू करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमुळे कुटुंब चिंतेत होते. विवेकच्या आजाराची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी तातडीने मदतीचे निर्देश दिले. त्यानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून सुरुवातीला ५० हजार रु पये आणि पुढील उपचारांसाठी अतिरिक्त २ लाख ५० हजार रु पये अशी एकूण तीन लाख रु पयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळाल्यानंतर नागपूरातील व्होकहार्ट रु ग्णालयात विवेकवर केमोथेरपीसह आवश्यक उपचार सुरू करण्यात आले. उपचारांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असून त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. मुलाच्या चेह-यावर पुन्हा हास्य फुलल्याने कुटुंबालाही मोठा दिलासा मिळाला आहे. आमच्या मुलाचे प्राण वाचवण्यासाठी योग्य वेळी आर्थिक मदत मिळाली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कार्यालयाची कार्यपद्धती जलद, संवेदनशील आणि माणुसकी जपणारी असल्याचा अनुभव आम्हाला आला, अशी भावना विवेकच्या पालकांनी व्यक्तकेली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक तसेच नागपूर कक्ष प्रमुख डॉ. सागर पांडे यांचे आभार मानले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत विविध गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड प्रत्यारोपण, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, डायलिसिस, नवजात शिशू उपचार, अपघातग्रस्त रु ग्ण, जळीत रु ग्ण तसेच लहान बालकांच्या शस्त्रक्रियांसह जवळपास २० प्रकारच्या आजारांचा समावेश आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'राजकीय हट्टीपणा'

व्यक्तिगत पराभवासह तृणमूल काँग्रेस पक्षाच्या दारुण पराभवानंतरही मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न देण्याचा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पवित्रा निव्वळ 'राजकीय हट्टीपणा' म्हणावा लागेल.

२०२६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने २०७ जागा जिंकून पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक बहुमत मिळवले. तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. या पराभवानंतरही ममता बॅनर्जी यांनी 'मी हरले नाही; त्यामुळे राजीनामा देणार नाही' अशी भूमिका घेतल्याने एक अभूतपूर्व घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. त्यांचा हा निर्णय लोकशाहीवर अविश्वास दाखवणारा आहे. त्यांच्या पक्षाला सत्तेतून पायउतार का व्हावे लागले याची अन्य कारणे आहेतच, त्यात ममता यांच्या स्वभावातील आक्रस्ताळेपणा राजकीय वर्तन हेही एक कारण आहे. एकीकडे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा दिला. लोकशाही प्रक्रियेत जनमताचा आदर करणे अपेक्षित असते. मात्र, या दोन्ही नेत्यांच्या तुलनेत ममता बॅनर्जी यांनी या वस्तुस्थितीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. हा केवळ बालिश हट्टीपणा नसून त्यांची राजकीय अपरिपक्वता आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. दीर्घ राजकीय अनुभव गाठीशी असतानाही ममता बॅनर्जी यांना या परिणामांची कल्पना नसावी, याचे आश्चर्य वाटते. जर त्यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला नाही, तरी काही फरक पडणार नाही. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणुका पार पडल्या आहेत. त्याचे निकाल जाहीर झाले आहेत. पश्चिम बंगाल विधानसभेचा कार्यकाळ संपताच किंवा नवीन विधानसभेची अधिसूचना निघताच जुन्या मुख्यमंत्र्यांना पद सोडावे लागते, हा नियम आहे. त्यामुळे ममता बॅनर्जींनी राजीनामा दिला नाही, तरी राज्यपाल त्यांना पदच्युत करू शकतात आणि बहुमत असलेल्या पक्षाला सत्तास्थापनेसाठी आमंत्रित करू शकतात, तशी घटनात्मक तरतूद आहे. ममता यांच्या या हट्टीपणामुळेच त्यांच्या पक्षांवर नामुष्की ओढवली असेल, तर तो त्यांचा राजकीय अपमान आहे, याची त्यांना जाणीव का नसावी? हा प्रश्न उपस्थित राहतो, एखादी व्यक्ती सतत संविधानाचा आणि लोकशाही मूल्यांचा आधार घेत राजकारण करते, तीच व्यक्ती आज जनमताचा अनादर करून पदाला चिकटून बसली आहे, असा संदेश यानिमित्ताने देशात गेला आहे. राजीनामा देण्यास नकार देऊन ममता यांनी आपल्या समर्थकांना त्यांच्यावर अन्याय झाला आहे, हे भासवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, या भूमिकेतून त्यांनी जनतेची सहानुभूती गमावली आहे. त्यांनी लक्षात घ्यायला हवे होते, की जनता अनेक गोष्टी विसरते, पण राज्यकर्त्यांचा अहंकार कधीच विसरत नाही. जर त्यांना पुन्हा जनमानसात स्थान मिळवायचे असेल, तर त्यांनी विनम्रपणे जनादेशाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. आपल्या पराभवाचे मुख्य कारण हे सरकारचा गैरकारभार आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड जनक्षोभ आहे, हे वास्तव स्वीकारण्यास त्या तयार नाहीत हे खरेच आहे. तृणमूल काँग्रेसला केवळ बहुमताचीच अडचण होती असे नाही, तर २९४ जागांच्या विधानसभेत बहुमतासाठी १४८ चा आकडा असताना त्यांना १०० जागांचा टप्पाही ओलांडता आला नाही. स्वतःच्या पराभवाचे खापर इतरांवर फोडून ममता बॅनर्जी त्याच मार्गावरून चालल्या आहेत, ज्या मार्गावर राहुल गांधी गेल्या अनेक दिवसांपासून मार्गक्रमण करत आहेत. राहुल गांधींकडून सातत्याने 'मतचोरी'चा सिद्धांत मांडला गेला. कालही त्यांनी त्याच सुरात सांगितले, की भाजप आणि निवडणूक आयोगाच्या संगनमताने आसाम आणि बंगालमधील निवडणुका चोरल्या गेल्या आहेत. मग प्रश्न असा उरतो, की जिथे काँग्रेसप्रणीत आघाडीचा विजय झाला, त्या केरळमधील निकालांबद्दल त्यांचे मत काय आहे? तिथेही निवडणूक आयोगाची तीच यंत्रणा कार्यरत होती, हे ते सोयीस्करपणे विसरलेले दिसतात. ममता बॅनर्जी स्वतःच्या भवानीपूर मतदारसंघात १५ हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभूत झाल्यानंतरही 'नैतिक विजय आमचाच आहे' असे म्हणणे, हे कुठल्या नैतिकतेला धरून आहे. १५ वर्षांची एकहाती सत्ता आणि 'बंगाली अस्मिते'चे प्रतीक झालेल्या तृणमूल काँग्रेसला मतदारांनी सपशेल नाकारले आहे, हे वास्तव ममता यांनी स्वीकारायला हवे. बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास दिलेला नकार हा लोकशाहीतील निरोगी परंपरांना छेद देणारा आहे. या निर्णयामुळे केवळ पश्चिम बंगालमध्येच नव्हे, तर राष्ट्रीय राजकारणातही जकारणातही चुकीचा पायंडा पडण्याची भीती आहे. ममता यांची ही भूमिका त्यांच्या 'स्ट्रीट फायटर' प्रतिमेला साजेशी वाटत असली, तरी संसदीय लोकशाहीसाठी घातक आहे. निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचे आरोप करणे आणि निकालाला न्यायालयात आव्हान देण्याची भाषा करणे, हे मतदारांच्या निर्णयाचा अनादर करण्यासारखे आहे. सत्तेचा त्याग करणे हा लोकशाहीतील सर्वोच्च सन्मान असतो. निवडणुका येतात-जातात, पण घटनात्मक संस्थांवरील विश्वास टिकवून ठेवणे ही नेत्यांची जबाबदारी असते. लोकशाहीत विजय स्वीकारणे जितके सोपे असते, तितकाच पराभव पचवणे कठीण असते, हेच यातून सिद्ध होते. ममता बॅनर्जी यांनी सत्तेच्या हट्टापायी घटनात्मक पेच निर्माण करण्यापेक्षा मिळालेल्या कौलाचा आदर करून विरोधी पक्षाची भूमिका सक्षमपणे बजावावी, तेच त्यांच्या आणि बंगालच्या हीताचे ठरेल.

# ममता आणि टीएमसीची अवस्था

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, ममता बॅनर्जी यांनी इंडिया अलायन्ससोबत निवडणूक लढवण्यास नकार दिला आणि आपण एकट्याने निवडणूक लढवू अशी घोषणा केली. नरेंद्र मोदी २०२४ च्या लोकसभा निवडणुका पुन्हा जिंकले, आणि त्यामुळे, बीजेडी, बसपा, शिवसेना, जेडीयू, टीआरएस, वायएसआर, पीडीपी आणि आप यांच्यानंतर, त्याच ड्रॅगनने आज टीएमसीला गिळून टाकले...!**

✍ निलेश पवार

ममता बॅनर्जी यांनी जेव्हा १९९७ मध्ये, सुमारे २९ वर्षांपूर्वी, काँग्रेस पक्ष सोडला आणि मुकुल रॉय यांच्यासोबत तृणमूल काँग्रेस (TMC) ची स्थापना केली, तेव्हा त्यांनी सीपीएम, सीपीआय आणि काँग्रेसला संपवण्यासाठी भाजपला पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करण्यास मदत केली होती. त्यानंतर मुकुल रॉय भारतीय जनता पक्षात सामील झाले होते. १९९९ मध्ये, ममता बॅनर्जी भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारमध्ये सामील झाल्या आणि रेल्वेमंत्री बनल्या होत्या. २००१ च्या सुरुवातीला, जेव्हा 'ऑपरेशन वेस्ट एंड'ने संरक्षण करारांमधील एक मोठे लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आणले, तेव्हा ममता बॅनर्जी यांनी एनडीए सरकार सोडले होते. ऑगस्ट २००१ मध्ये बीबीसीला दिलेल्या एका मुलाखतीत, जेव्हा ममता बॅनर्जी यांना विचारण्यात आले की त्यांच्या पक्षाच्या एनडीएमध्ये परत येण्याची काही शक्यता आहे का, तेव्हा त्यांनी उत्तर दिले, होय, टीएमसीच्या जाहीरनाम्यानुसार, भाजप आमचा 'नैसर्गिक मित्रपक्ष' आहे असे म्हटले होते.



२००३ मध्ये, ममता बॅनर्जी एनडीए सरकारमध्ये पुन्हा सामील झाल्या, परंतु अनेक महिने त्या बिनखात्याच्या मंत्री राहिल्या होत्या. २००३ मध्ये, ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र 'पाँचजन्य'चे तत्कालीन संपादक तरुण विजय यांनी लिहिलेल्या साम्यवादी दहशतवादावरील पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला हजेरी लावली होती. तरुण विजय यांनी त्यांचे स्वागत करताना त्यांना 'बंगालची दुर्गा' म्हटले होते. सभागृहात बोलताना, भाजपचे राज्यसभा खासदार बलबीर पुंज ममता बॅनर्जींबद्दल म्हणाले, आमच्या लाडक्या ममता दीदी म्हणजे दुर्गेचा अवतार आहेत. अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी पुंज यांचे निधन झाले आहे. आरएसएसने ममता बॅनर्जी यांना 'बंगालची दुर्गा' असेही संबोधले आणि डाव्यांविरुद्धच्या त्यांच्या लढ्याला 'प्रखर पाठिंबा' व्यक्त केला होता. ममता बॅनर्जी यांनी आपल्या एका भाषणात आरएसएस नेते मोहन भागवत, शेषाद्री चारी आणि मदनदास देवी यांचा उल्लेख करत म्हटले, 'मी आरएसएसच्या अनेक नेत्यांना ओळखत नाही, पण त्यापैकी काहींना मी वैयक्तिकरित्या भेटले आहे. तुम्ही खरे देशभक्त आहात.' मला माहित आहे की तुमचे तुमच्या देशावर खरे प्रेम आहे.

२०१२ मध्ये, आरएसएसचे मुखपत्र 'पांचजन्य'ने ममता बॅनर्जी यांच्या साध्या जीवनशैलीची प्रशंसा करणारा एक लेख लिहिला होता. त्यात म्हटले होते, ममता त्या दुर्मिळ राजकारण्यांपैकी एक आहेत ज्यांनी राजकारणाचा वापर पैसा कमावण्यासाठी केला नाही. देशात असे अधिक राजकारणी असते तर बरे झाले असते. २०१९ मध्ये, ममता बॅनर्जी यांनी एनआरसी आणि सीएएच्या विरोधात अनेक आंदोलने आयोजित केली. तथापि, जेव्हा संसदेत सीएएवर मतदान झाले, तेव्हा टीएमसीचे आठ खासदार रहस्यमयरीत्या अनुपस्थित होते, ज्यामुळे हे विधेयक मंजूर झाले. ममता बॅनर्जी यांनी या खासदारांना माफ केले आणि त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. २७ जानेवारी २०२० रोजी, जेव्हा भाजप सरकारमधील तत्कालीन अर्थ राज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी आपल्या भाषणात 'हरामखोरांना गोळ्या घाला' अशी घोषणा दिली, तेव्हा टीएमसी नेते शेख आलम यांनी मुर्शिदाबादमध्ये सीएएला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर गोळीबार केला होता. २०१७ मध्ये भाजपमध्ये सामील झालेले मुकुल रॉय, २०२१ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी टीएमसीमध्ये परतले आणि ममता बॅनर्जी यांनी त्यांचे आनंदाने स्वागत केले. निवडणुकीदरम्यान, मुकुल यांनी पत्रकारांना सांगितले की भाजप टीएमसीच्या बरोबरीचा आहे. म्हणून मी त्यात परतलो आहे.

जुलै २०२२ मध्ये, ममता बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती निवडणुकीत विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांना पाठिंबा देण्यास नकार दिला. त्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या खासदारांनी मतदानात भाग घेतला नाही. जगदीप धनखर विजयी झाले. बंगालच्या राज्यपाल असताना ज्यांनी त्यांचे आयुष्य कठीण केले होते, त्या धनखर यांना ममता बॅनर्जी यांनी पाठिंबा दिला होता.

अलीकडेच, सप्टेंबर २०२२ मध्ये, ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (RSS) भरभरून प्रशंसा केली आणि म्हटले की, संघात अनेक चांगले लोक आहेत. संघ एक चांगली संघटना आहे. २०२४ पूर्वी नितीश कुमार यांनी स्थापन केलेल्या इंडिया अलायन्सचे निमंत्रक म्हणून त्यांच्या नियुक्तीला ममता बॅनर्जी यांनी तीव्र विरोध केला. यामुळे नाराज झालेले नितीश कुमार भाजपमध्ये सामील झाले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, ममता बॅनर्जी यांनी इंडिया अलायन्ससोबत निवडणूक लढवण्यास नकार दिला आणि आपण एकट्याने निवडणूक लढवू अशी घोषणा केली.

नरेंद्र मोदी २०२४ च्या लोकसभा निवडणुका पुन्हा जिंकले, आणि त्यामुळे, बीजेडी, बसपा, शिवसेना, जेडीयू, टीआरएस, वायएसआर, पीडीपी आणि आप यांच्यानंतर, त्याच ड्रॅगनने आज टीएमसीला गिळून टाकले...! ममता बॅनर्जी आपल्या कर्माचे फळ भोगत आहेत. भारत आघाडी तोडून, त्या आपल्या कर्माचे फळ भोगत आहेत. आता त्यांच्या पक्षाचे खासदार नक्कीच राघव चड्ढांसारखे वागतील यात तिळमात्र शंका नाही.

# केरळमध्ये सत्ता परिवर्तन !

✍ अभय गोखले

केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचा दणदणीत विजय झाला आहे. १४० सदस्यांच्या केरळ विधानसभेत संयुक्त लोकशाही आघाडीला १०२ जागांवर विजय मिळाला असून, प्रतिस्पर्धी मार्क्सवादी कम्युनिस्टप्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला फक्त ३५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. २०१६ पासून केरळमध्ये सत्तेवर राहिलेल्या डाव्या लोकशाही आघाडीला याखेपेस विजयाची हॅट्ट्रिक साधण्याची चांगली संधी होती, मात्र ती संधी डाव्या आघाडीला साधता आली नाही. गेल्या पाच दशकांत प्रथमच मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचे सरकार देशातील कुठल्याही राज्यात सत्तेवर असणार नाही. पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा या राज्यांत डाव्या आघाडीची सरकारे यापूर्वीच पायउतार झाली आहेत आणि भविष्यात तेथे डावी आघाडी सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नाही.

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन हे निवडणुकीत विजयी झाले असले तरी त्यांच्या मंत्रिमंडळातील १३ मंत्र्यांचा दारुण पराभव झाला आहे. डाव्या लोकशाही आघाडीने आपल्या निवडणूक प्रचारात प्रामुख्याने विकासाच्या मुद्द्यावर जोर दिला होता मात्र केरळ मधील जनतेने तो गांभीर्याने घेतला नसल्याचे निवडणूक निकालावरुन दिसून आले आहे. जनतेला महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे वाटले म्हणुनच जनतेने डाव्या लोकशाही आघाडीला नाकारले.

२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत, डाव्या लोकशाही आघाडीला जो विजय मिळाला त्याचे श्रेय पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वाला देण्यात आले होते. त्यामुळे डाव्या लोकशाही आघाडीने यावेळी त्यांच्या नावावर निवडणूक लढवली असावी. परंतु या टर्म मध्ये पिनाराई विजयन यांची लोकप्रियता झपाट्याने घसरली होता. त्याचा अंदाज डाव्या लोकशाही आघाडीला बांधता आला नाही. त्यामुळे डाव्या लोकशाही आघाडीचा फायदा होण्याऐवजी तोटाच झाला. २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीला ९४ जागांवर विजय मिळाला होता. त्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ६१ जागा जिंकल्या होत्या, तर आघाडीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सीपीआयने १७ जागा जिंकल्या होत्या. मात्र या खेपेस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला फक्त २६ जागांवर समाधान मानावे लागले आहे तर सीपीआयला फक्त ८ जागांवर विजय मिळाला आहे. या उलट काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीने जिंकलेल्या १०२ जागांपैकी ६३ जागा काँग्रेसने जिंकल्या असून, आघाडीत दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या इंडियन युनियन मुस्लिम लीगने २२ जागांवर विजय मिळविला आहे. इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या विजयाचे वैशिष्ट्य म्हणजे पक्षाने फक्त २७ जागा लढवल्या होत्या. त्यांचा स्ट्राईक रेट ८० च्या आसपास आहे.




भाजपाला या निवडणुकीत बऱ्याच अपेक्षा होत्या, मात्र भाजपाची कामगिरी अपेक्षेनुसार झालेली नाही. विशेषत: लोकसभा निवडणुकीत त्रिशूरची जागा जिंकल्याने आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तिरुवनंतपुरम महानगर पालिकेवर भाजपाने आपला झेंडा फडकावल्याने भाजपा, विधानसभा निवडणुकीत किमान अर्धा डझन जागा जिंकेल असा अंदाज वर्तवण्यात आला होता मात्र भाजपाला फक्त तीन जागाच जिंकता आल्या. अर्थात भाजपाला तीन जागांवर मिळालेला विजय, ही भाजपाची केरळ विधानसभा निवडणुकीतील आजवरची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आणि गेल्या वर्षी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतरही त्या पराभवाची दखल डाव्या लोकशाही आघाडीने पुरेशा गांभीर्याने घेतली नाही. ॲंटी इन्क्युंबन्सी फॅक्टरकडे डाव्या लोकशाही आघाडीने दुर्लक्ष केले. श्री नारायण धर्म परिपालन योगम ( एसएनडीपी ) या संघटनेचे नेते नटेसन यांच्याबरोबर असलेली, डाव्या लोकशाही आघाडीची जवळीक, आघाडीला महागात पडली. नटेसन हे वारंवार केरळमधील मुस्लिम समाजावर जहरी टीका करत असल्याने राज्यातील मुस्लिम समाज डाव्या लोकशाही आघाडी पासून मोठ्या प्रमाणात दूर गेला. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतर आघाडीने सॉफ्ट हिंदुत्वाचे धोरण पत्करले होते. त्यामुळे राज्यातील मुस्लिम समाज डाव्या आघाडीवर नाराज झाला होता. काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचा या खेपेस पुन्हा एकदा पराभव झाला तर काँग्रेसचे मनोबल खच्ची होईल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल. भाजपाची ताकद वाढेल या भीतीमुळे, मुस्लिम समाजाने या खेपेस काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला भरभरून मतदान केले असावे. केरळमध्ये मुस्लिम समाजाची संख्या २८ टक्के, ख्रिश्चन समाजाची संख्या १८ टक्के, हिंदू समाजाची संख्या ५४ टक्के इतकी आहे. काँग्रेसला इतका मोठा विजय मिळाला, याचा अर्थ, पक्षाला मुस्लिम समाजाबरोबरच ख्रिश्चन समाजाची मतेही मोठ्या प्रमाणात मिळाली आहेत. याउलट हिंदू समाजाची मते काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी, मार्क्सवादी कम्युनिस्टप्रणीत डावी लोकशाही आघाडी आणि भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्यात विभागली गेली. नायर समाजाचा केरळमधील राजकारणावर मोठा प्रभाव आहे. हा समाज अलिकडे काही प्रमाणात भाजपाकडे सरकत असल्याचे दिसून आले आहे. एझवा आणि नायर हे समाज डाव्या लोकशाही आघाडी पासून जसजसे दूर जातील तसतशी डावी लोकशाही आघाडी केरळमध्ये कमकुवत होत जाईल. तेंव्हा डाव्या लोकशाही आघाडीला यापुढे खरा धोका, काँग्रेसपासून नसून भाजपा पासून आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. भाजपाबाबत बोलायचे झाल्यास, हिंदू समाजाला मोठ्या प्रमाणात, आपल्याकडे वळवण्यात पक्ष यशस्वी झाला तरच भाजपाला केरळ मध्ये चांगले यश मिळू शकेल. मुस्लिम आणि ख्रिश्चन या समाजांची एकत्रित संख्या राज्यात ४६ टक्के इतकी आहे, ही मते भाजपाला फारशी मिळत नसल्याने भाजपाला हिंदू समाजाची मते आपल्या कडे मोठ्या प्रमाणावर कशी वळवता येतील यावर जोर द्यावा लागेल. पश्चिम बंगालमध्ये भाजपाला त्याबाबतीत मोठ्या प्रमाणात यश मिळाले तेंव्हा केरळमध्येही भाजपाकरता ती गोष्ट साध्य करणे अवघड दिसत नाही.

# एम.के.स्टॅलिन यांचा पराभव अनपेक्षित

✍ अमित महाडेश्वर



**तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांच्या द्रमुकचा कालच्या विधानसभा निकालात पराभव झाला. बंगाल आणि आसामचा निकाल काही प्रमाणात अपेक्षित होता. पण केरळ आणि तमिळनाडूचा निकाल नक्कीच अनपेक्षित होता.**

एम. के. स्टॅलिन यांच्या पराभवाने एकूणच देशाच्या राजकारणातील एक मोठा खेळाडू मैदानातून बाहेर (तात्पुरता का होईना) गेला. विजयच्या नेतृत्वाखालील नवख्या पक्षाने द्रमुकचा पराभव केला ही गोष्ट जास्त धक्कादायक आहे.

स्टॅलिन यांचे आणि माझे वैयक्तिक काही घेणे देणे नाही. पण या माणसाने भाषिक आणि आर्थिक मुद्द्यावर गेल्या ५ वर्षांत जे काम केले. त्यानंतरही पराभव होणार असेल तर मग एखाद्या मुख्यमंत्र्याने आणखी काय करणं अपेक्षित आहे हे कळत नाही...

स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील २०२४-२५ या आर्थिक वर्षात तमिळनाडूच्या GSDP मध्ये (राज्याचं सकल उत्पादन) १६३ वाढ झाली. आणि गेल्या १४ वर्षांत पहिल्यांदाच तामिळनाडूने दोन अंकी वाढ गाठली.

२०२१ ते २०२३ या दोनच वर्षांत स्टॅलिन सरकारने राज्यामध्ये ९.७४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणली आणि ३१ लाख रोजगार निर्माण केले. यामुळे तमिळनाडू हे देशात सर्वाधिक कारखाने आणि औद्योगिक कामगार असलेले राज्य बनले. तमिळनाडू २०३१ पर्यंत १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनू शकते असा अंदाज फेब्रुवारी २०२६ मध्ये तमिळनाडूच्या आर्थिक सर्वेक्षणाने वर्तवला होता.

मुख्यमंत्री म्हणून स्टॅलिन यांनी विद्यार्थ्यांसाठी मोफत नाश्ता, उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि महिलांसाठी मोफत बसपास अशा अनेक योजना राबवल्या. 'शिक्षण हे फक्त श्रीमंतांची मक्तेदारी नसावी', हे अण्णादुराई यांचे स्वप्न होते. स्टॅलिन कदाचित तेच काम पुढे चालवत होते.

पण त्याहून सर्वात महत्त्वाचे स्टॅलिन यांची खरी ताकद दिसून येते ती केंद्र सरकारला कोणत्याही मुद्द्यावर विशेषतः भाषिक मुद्द्यावर फाट्यावर मारायची. वेगवेगळ्या काळात जेव्हा जेव्हा तमिळ भाषेवर (आणि इतर भाषांवरही) हिंदी नावाचे संकट आले, तेव्हा स्टॅलिनने (आणि अर्थातच त्यांच्या पूर्वसुरींनी) जोरदार लढा दिला आणि ते संकट रोखले. पण तीन भाषा धोरणाच्या नावाखाली हिंदी लादण्याचा धोका आजही सर्वांच्या डोक्यावर तलवारी सारखा टांगलेला असताना स्टॅलिन यांचा पराभव होणे म्हणजे इतर भाषांचा पाय आणखी खोलात जाण्यासारखे आहे. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारला थेट वेळोवेळी प्रश्न विचारले होते. हल्लीचे त्यांचे प्रश्न बघितले उदा. NEET परीक्षेचा प्रश्न असेल, तमिळनाडूला न मिळालेल्या विशेष निधीचा प्रश्न असेलद्यक आणि परिसीमन विधेयकाचा प्रश्न असेल. यात राजकारण, त्यांचा स्वार्थ नक्कीच आहे पण द्रविड चळवळीचा वारसा ते टिकवू पाहत होते यात दुमत नसावे.

अण्णादुराई यांनी १९५०-६० च्या दशकात भाषेचा खऱ्या अर्थाने वापर केला. त्यानंतर करुणानिधींनीही वापर केला आणि स्टॅलिन यांनी याच भाषेचा वापर २१व्या शतकाच्या राजकारणात अत्यंत प्रभावीपणे करून केंद्र सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले.

त्यांनी NEET मधून राज्याला सूट मिळवण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा धोरणाला प्रखर विरोध केला. शिक्षण हा राज्याचा विषय असायला हवा आणि तो समवर्ती सूचीमधून बाहेर काढावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली. राज्याची स्वायत्तता जपण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश कुरियन जोसेफ यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय समितीदेखील स्थापन केली होती.

ऑगस्ट २०२५ मध्ये व्हिएतनामी इलेक्ट्रिक वाहन कंपनी VinFast ने तुतीकोरिनमध्ये २ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करून मोठा कारखाना सुरू केला. यातून तब्बल ३,५०० नोकऱ्या निर्माण होणार आहेत. फेब्रुवारी २०२६ मध्ये टाटा मोटर्स आणि Jaguar Land Rover ने राणीपेटमध्ये १.१ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करून नवीन प्रकल्पही सुरू केला. इतके करूनही एखाद्या माणसाचा पराभव होत असेल तर त्याने नक्की करावं हा सामान्य माणूस म्हणून मला पडलेला प्रश्नच आहे.

पण हा प्रश्न मला पडलेला आहे स्टॅलिनना नाही. पराभव झाला असला तरी काल त्यांनी समाजमाध्यमांवर पोस्ट लिहून आपले निवेदन जाहीर केले, त्याचा सारांश पुढीलप्रमाणे -

'विधानसभेच्या निवडणुकीत DMK आघाडीवर विश्वास ठेवून मतदान केलेल्या सर्व १.५४ कोटी जनतेचे मी मनापासून आभार मानतो. जिंकलेल्या पक्षाला आपल्यापेक्षा फक्त ३.५२ टक्के मते जास्त मिळाली आहेत. हा जनतेचा आपल्यावरचा भक्कम विश्वासच आहे. मी द्रमुकच्या सर्व विजयी उमेदवारांना विनंती करतो की त्यांनी थेट जनतेत जाऊन त्यांचे आभार मानावेत.

द्रमुकने आजवर अनेक विजय आणि पराभव पाहिले आहेत. पण आपले धोरण आणि विचार कधीही डगमगले नाहीत. पक्षाचे कार्यकर्ते हीच आमची खरी ताकद आणि रक्तवाहिन्या आहेत. तुमच्या साथीमुळेच मला बळ मिळते.

सत्तेत असताना आपण लोकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. आता एक भक्कम विरोधी पक्ष म्हणून आपण जनतेच्या हक्कांसाठी आणि मागण्यांसाठी नक्की लढू.

पेरियार, अण्णा(दुराई) आणि कलैग्नार (एम. करुणानिधी) यांच्या विचारांचा वारसा जपत, आपली संस्कृती (द्रविड), भाषा आणि राष्ट्र वाचवण्याची ही चळवळ आपण अशीच पुढे नेऊ. आपण खचणार नाही आहोत, आपण पुन्हा नक्की जिंकू!'

पराभव झाला असला तरी एम. के. स्टॅलिन यांनी राज्याच्या विकासासाठी आणि हक्कांसाठी दिलेला लढा आणि त्यांची दूरदृष्टी तमिळनाडूच्या इतिहासात कायम लक्षात राहील.

### मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेला दिलासा देण्यासाठी

# अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी

**अमरावती/का.प्र**

मेळघाटातील कोलमडलेल्या आरोग्य व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची जोरदार मागणी आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे लेखी स्वरूपात केली आहे. दुर्गम भागातील नागरिकांना वेळेत उपचार मिळत नसल्याने होणारे मृत्यू, गर्भवती महिलांचे हाल आणि बालकांच्या जीवावर बेतणारी परिस्थिती लक्षात घेता ही मागणी करण्यात आली आहे.

आमदार कडू यांनी निवेदनात नमूद केले की, अमरावती शहरात आधीपासूनच मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि हजारो बेडची क्षमता येथे आहे. विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधून दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, तर शहरातील रुग्णालयांमध्ये हजारो बेडची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे अमरावतीत आरोग्य सेवा मोठ्या प्रमाणावर विकसित झाल्या आहेत.

मात्र दुसरीकडे मेळघाट आणि अचलपूर परिसरातील आरोग्य व्यवस्था अत्यंत बिकट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक गावांमध्ये डॉक्टर, औषधे आणि रुग्णवाहिका उपलब्ध नाहीत. रुग्णांना १५० ते २०० किलोमीटरचा खडतर प्रवास करून अमरावती गाठावी लागते. या प्रवासादरम्यान अनेक रुग्णांचा मृत्यू होत असल्याच्या घटना घडत आहेत.

गर्भवती महिलांना वेळेत उपचार मिळत नाहीत, आजारी बालकांना कडेवर घेऊन डोंगर-दऱ्यांतून प्रवास करावा लागतो, तर वृद्ध रुग्ण उपचाराअभावी घरातच वेदना सहन करत पडून राहतात. कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यूचे वाढते प्रमाण ही त्या भागातील गंभीर समस्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अचलपूर हे भौगोलिकदृष्ट्या चांदूरबाजार, अंजनगाव, दर्यापूर, धारणी व चिखलदरा या भागांसाठी केंद्रबिंदू असल्याने येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे अत्यंत उपयुक्त ठरेल. तसेच येथे मोठ्या प्रमाणात शासकीय जमीन उपलब्ध असून भविष्यात स्वतंत्र जिल्हा म्हणून विकसित होण्याची क्षमता असल्याचेही कडू यांनी सांगितले.

सध्या अचलपूर तालुक्यात केवळ १५० ते २०० बेडचीच सुविधा उपलब्ध असून त्याच्या तुलनेत अमरावतीत ३५०० पेक्षा अधिक बेडची सुविधा आहे. त्यामुळे आरोग्य सुविधांचे असमतोल वितरण स्पष्ट दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'अमरावतीत आधीच मोठ्या प्रमाणावर सुविधा आहेत, मात्र मेळघाटातील लोक आजही उपचारासाठी तडफडत आहेत. अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन झाल्यास हजारो गरीब व आदिवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळेल,' असे कडू यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आंबेडकर यांनी मेळघाट दौऱ्यात आरोग्य समस्यांचा निपटारा करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांची पूर्तता होत असल्याचे या मागणीमुळे दिसून येत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.शासनाने या गंभीर व मानवतावादी प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन अमरावती येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अचलपूर येथे स्थानांतरित करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## अमरावतीमध्ये हिंदुत्व जागृतीसंदर्भात बैठक



**अमरावती/का.प्र.**

मुंबई आणि गोवा येथील हिंदू जनजागृती संस्था आणि सनातन संस्थेचे प्रमुख सुनील जी. घनवट यांनी अमरावती दौऱ्यादरम्यान प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया यांच्या निवासस्थानी विशेष भेट दिली.

याप्रसंगी हिंदुत्व, सनातन संस्कृती, राष्ट्रीय जागृती आणि समाजात धार्मिक जाणीव वाढवणे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत हिंदू समाजाला संघटित करण्यावर आणि तरुणांमध्ये मूल्ये व देशभक्ती रुजवण्यावर विशेष भर देण्यात आला.चर्चेदरम्यान, अमरावतीमध्ये हिंदू जनजागृती संस्थेचा एक मोठा मेळावा आयोजित करण्यासंदर्भात विशेष चर्चा झाली. या प्रस्तावित मेळाव्याबाबत हिंदू समाजात उत्साहाचे वातावरण असून, हजारो हिंदूंनी उपस्थित राहण्याची प्रतिज्ञा केली आहे.

चंद्रकुमार जाजोदिया यांनी सांगितले की, हिंदुत्व आणि सनातन धर्माबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे आणि असे कार्यक्रम समाजाला एक नवी दिशा देतील.याप्रसंगी इस्कॉनचे मधुपतिदास महाराज, भाजप युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विकी शर्मा, करण धोते, आशिष सुतवाल, आशिष अग्रवाल, अनिकेत जोशी, क्षितिज धुंधी, प्रथमेश अधौ, रोशन गुप्ता आणि अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते व समाजसेवक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी माल विकल्यानंतर सोयाबीन व कापसाचे वाढले दर

### हमीभाव मिळूनही सरकारच्या अपयशी धोरणामुळे शेतकरी मेटाकुटीस

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरातील शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. सोयाबीन व कापसाच्या दरात चढ-उतार होत असले तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांना मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. बाजारात काही प्रमाणात दरवाढ झाली असली तरी बहुसंख्य शेतकऱ्यांनी गरजेपोटी आपला माल आधीच कमी दरात विकल्याने व्यापाऱ्यांनाच अधिक फायदा होत असल्याचे चित्र आहे.

सोयाबीनला काही ठिकाणी चांगला दर मिळत असला तरी उत्पादन खर्च, शेतीसाठी लागणारे वाढते खर्च, कुटुंबाची जबाबदारी आणि आर्थिक अडचणी यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल साठवून ठेवणे शक्य होत नाही.त्यामुळे अनेकांना कमी



भावातच माल विकावा लागत आहे.दरम्यान, कापूस उत्पादक शेतकरीही संकटात सापडले असून अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.हवामानातील बदल, अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वारे आणि कीडरोग यामुळे उत्पादनात घट झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य मूल्य मिळावे व शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

अमरावती बाजार समितीत सध्या सोयाबीनला ५,१५० ते ५,५२० प्रति क्विंटल तर कापसाला ८,३०० ते ८,७०० दर मिळत असला तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याचे चित्र आहे. गरजेपोटी अनेक शेतकऱ्यांनी आपला माल कमी भावात आधीच विकल्याने व्यापाऱ्यांचा मोठा फायदा होत आहे.शासनाकडून हमीभाव जाहीर करण्यात आला असला तरी खरेदी प्रक्रियेतील अडचणी, विलंब, निकष व अपुऱ्या सुविधा यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नाही.परिणामी उत्पादन खर्च वाढत असताना शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

■ सोयाबीन आणि कापसाला बाजारात दर वाढल्याचे सांगितले जाते, पण आम्हाला त्याचा फायदा होत नाही. गरजेपोटी माल आधीच कमी भावात विकावा लागतो. शासनाने शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

**-गणेश पाटील,शेतकरी**

■ खत, बियाणे, औषधे आणि मजुरीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यात नैसर्गिक संकटांमुळे उत्पादन घटते आणि बाजारात योग्य भावही मिळत नाही. त्यामुळे शेतकरी पूर्णपणे आर्थिक अडचणीत सापडला आहे.

**-नामदेव देशमुख, शेतकरी**

## पुलाचे अर्धवट बांधकाम करणे कंत्राटदाराला पडले महागात

### कंत्राटदाराला प्रतिदिन ५२८ रुपये दंडाची आकारणी

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थान शेंडगाव या गावी अंजनगाव वरून जाणारा टाकरखेडा-कापुसतळणी-कोकर्डा-डोंबाला रस्ता प्राजिमा-१० या रस्त्यावरील कापुसतळणी ते पिंपळगावच्या मध्ये लहान मुलाचे बांधकाम अर्धवट असल्यामुळे सदर रस्त्याने ये जा करणारे शेतकरी,विद्यार्थी, व तालुक्याला जाणारे नागरिक यांना खूप मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. अर्धवट पुलाचे बांधकामा मुळे एसटी बस सुद्धा बंद राहत होती.

या अर्धवट पुलाच्या बांधकामाबाबत सामाजिक कार्यकर्ते अरुण शेवाने यांनी उपविभागीय अभियंता सार्वजनिक



बांधकाम उपविभाग अंजनगाव यांना लेखी तक्रार करून संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. अन्यथा ७ मे रोजी आमरण उपोषण करण्यात येईल असा लेखी निवेदन देऊन इशारा दिला होता. अरुण शेवाने यांच्या निवेदनाची तात्काळ दखल उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंजनगाव यांनी घेतली असून संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे

प्राप्त माहितीनुसार रस्त्याचे व पुलाचे बांधकाम अर्थसंकल्प डिसेंबर २०२३ अंतर्गत मंजूर झाले आहे. हे काम करारनामांन्वये कंत्राटदार मे. कुशल कंस्ट्रक्शन कंपनी, रा. अभियंता नगर, अमरावती यांना ३०० दिवस म्हणजे ८ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतीमध्ये पूर्ण करावयास दिलेले होते. करारनाम्याच्या अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटदाराने काम पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र कंत्राटदाराने काम पूर्ण न केल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदाराला प्रतिदिन ५२८ रुपये दंड आकारण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला आहे. दंडाची आकारणी केल्यामुळे कंत्राटदारांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.कंत्राटदाराला काम करण्याची मुळ मुदत ८ जानेवारी २०२५ पासून संपली होती त्यामुळे कंत्राटदारावर ८ जानेवारी २०२५ पासून ते काम पूर्ण होईपर्यंत प्रतिदिन रुपये ५२८ याप्रमाणे दंड आकारण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आल्यामुळे वरिष्ठ अधिकारी किती दंड वसूल करतात याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## मनपा कर्मचाऱ्यांचे दोन महिन्याचे वेतन रखडले

### सरकारकडे पाठपुरावा

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील २९ महापालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना मार्च २०२६ महिन्याची जीएसटी ग्रँट अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सर्व महापालिका कर्मचाऱ्यांचे वेतन न झाल्यामुळे अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.

त्यातच एप्रिल महिनाही संपला आहे. तरी वित्त विभागाकडे गेल्या २० दिवसांपासून सर्व २९ महापालिकांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन थांबले आहे. सतत दोन महिने संपेपर्यंत जीएसटी ग्रँट मिळत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे मनपा कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा मुद्दा गंभीर होत आहे. हा कर्मचाऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा मुद्दा असून मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांच्याकडून कारवाई होणे अपेक्षित आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन न झाल्याने अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्व कर्मचाऱ्यांना वेतनाकरिता बेमुदत कामबंद आंदोलनाशिवाय दुसरा पर्यायच उरलेला नाही, असे संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री, अर्थ व वित्तमंत्री तसेच पालकमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यांपासून वेतनाकरिता शासन जीएसटी ग्रँट विलंबाने पाठवित आहे. ही बाब नियमाला अनुसरून नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील सर्वच महापालिका रस्त्यावर आल्याशिवाय प यायच

#### जीएसटी ग्रँट अद्याप अप्राप्तः कर्मचाऱ्यांमध्ये रोष

कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या मुद्याचा सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भात नियमित ग्रँट यावी, यासाठी राज्य संघटनेच्या स्तरावर चर्चा सुरू आहे. लवकरच पुण्यात राज्याची बैठक होणार असून हा मुद्दा कायमस्वरूपी निकाली निघावा, यासाठी प्रयत्न केल्या जात असल्याचे महानगरपालिका कर्मचारी/कामगार संघाचे सरचिटणीस प्रल्हाद कोतवाल यांनी सांगितले.

उरलेला नाही.तरी लवकरात लवकर विनाविलंब अर्थ व वित्त विभागाकडे नगरविकास विभागाने पाठविलेली जीएसटी ग्रँटच्या फाईलवर लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी महानगरपालिका कर्मचारी कामगार संघाच्यावतीने करण्यात आली आहे.

## विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी,खो-खोमध्ये राजस्थानची आगेकूच



**अमरावती/का.प्र.**

एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बुधवारी (दि.६) झालेल्या चुरशीच्या साखळी सामन्यांमध्ये महावितरणच्या पुरुष व महिला संघाने प्रतिस्पर्धी संघावर सहज विजय मिळवला. तर खो-खोमध्ये महावितरणच्या पुरुष संघासह राजस्थानच्या महिला व पुरूष संघाने आगेकूच केली आहे.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आज पहिल्या सत्रात कबड्डी, खो-खोचे साखळी सामने झाले. कबड्डीच्या सामन्यांमध्ये महापारेषण संघाने मध्यप्रदेशच्या एमपी पॉवर संघाचा ३ गुणांनी पराभव केला. तर महावितरणने एकतर्फी वर्चस्व गाजवत महानिर्मिती संघाचा २६ गुणांनी पराभव केला. पंजाब पॉवरने उत्तराखंडच्या पॉवर ट्रान्समिशन कंपनीचा १७ गुणांनी आणि हरियाणा संघाने गुजरात संघाचा ३० गुणांनी पराभव केला. कबड्डीच्या महिला गटात हिमाचल प्रदेशने महापारेषण संघाचा ३२ गुणांनी तर महावितरणने हरियाणा पॉवर संघाचा ४८ गुणांनी एकतर्फी पराभव केला.

खो खोच्या महिला गटात राजस्थान संघाने गुजरात ऊर्जा विकास निगम संघाचा पराभव केला. तर पुरुष गटात हरियाणा पॉवर संघाने मध्यप्रदेश पॉवर संघाचा, राजस्थान विद्युत निगम संघाने गुजरात ऊर्जा विकास निगमचा तर राष्ट्रीय खो खो संघाचा कर्णधार व महावितरणचा खेळाडू प्रतिक वाईकर याच्या नेतृत्वात महावितरणने हिमाचल प्रदेश राज्य विद्युत मंडळ संघाचा सहज पराभव केला.

### दमयंती नदीत सुरू असलेल्या

## संरक्षण भिंतीच्या कामामुळे जीवितहानीला जबाबदार कोण?

**मोर्शी/वार्ताहर**

दमयंती नदीच्या पात्रात चुकीच्या पद्धतीने सुरू असलेल्या संरक्षण भिंतीचे काम नदीच्या काठावर करण्यात यावे अन्यथा या विभागाच्या नगरसेविका प्रभा फंदे, माजी नगराध्यक्ष कैलास फंदे व भाजपाचे सर्व नगरसेवक यांनी आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला असून अशा आशयाचे एक लेखी निवेदन जिल्हाधिकारी अमरावती यांना देण्यात आले आहे. निवेदनाची प्रतिलिपी खासदार डॉ.अनिल बोंडे यांना रवाना करण्यात आली.

मोर्शी नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजनेमधून पेठपुरा येथील दमयंती नदीवर जवळपास ८३ लक्ष रुपयाच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम नदीपात्रात काम सुरू असल्याची तक्रार नगरसेविका प्रभा कैलास फंदे यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे केली. पावसाळ्याच्या दिवसात नदीपात्राला मोठ्या प्रमाणात पूर आल्यास चुकीच्या पध्दतीने संरक्षण भिंतीचे बांधकाम केल्यामुळे पावसाचे पाणी पेठपुरा



भागात शिरुन जिवीतहानी तसेच वित्तहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तत्कालीन कॅबिनेट मंत्री डॉ.अनिल बोंडे कृषी मंत्री असतांना सन २०१९ मध्ये मोर्शी शहरासह तालुक्यात अतिवृष्टी होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळल्यामुळे दमयंती नदीला मोठा महापूर येऊन नदीचे पाणी पेठपुरा परिसरामध्ये घुसून कित्येक घरात पाणी शिरून कोट्यावधी रुपयाचे नुकसान झाले होते. नदीला आलेल्या पुराची वेळ दुपारची असल्यामुळे जिवीतहानी न होता वित्तहानी व जनावरे गुरे यांची मोठ्या प्रमाणात हानी झाली होती.या गंभीर घटनेची दखल घेत डॉ. अनिलजी बोंडे यांनी पेठपुरा येथे पुलाची उंची वाढविणे व नदीला संरक्षण भिंत बांधण्याचे तात्काळ आदेश देऊन निधींची उपलब्धता सुध्दा करुन दिली. दरम्यान या नदीवरील दोन्ही पुलाचे काम पूर्णत्वास गेले असून याच निधीतुन नदीपात्रात होत असलेले संरक्षण भिंतीचे बांधकाम थांबविण्यात येऊन ती भिंत नदी काठावर बांधण्यात यावी. अशाप्रकारची तक्रार नगरपरिषद प्रशासनाला देऊन सुद्धा कोणत्याही प्रकारची दखल न घेता हे बांधकाम सुरू आहे. शेवटी नगरसेविका प्रभाताई कैलास फंदे, माजी नगराध्यक्ष कैलास फंदे व नगर सेवक यांनी डॉ. अनिलजी बोंडे खासदार राज्यसभा यांचेकडे धाव घेतली असता त्यांनी चुकीचे बांधकाम त्वरीत थांबवुन जलसंपदा विभाग मार्फत नदी पात्राची रुंदी मोजून नदीपात्रातील चुकीची भिंत हटविण्याचे आदेश मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना पत्राद्वारे दिले.

## संक्षिप्त

### मनपा उर्दू हायस्कूलचा निकाल ८८ टक्के



**अमरावती-**इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये महानगरपालिका उर्दू हायस्कूल जमिल कॉलनी (इंग्लिश मीडियम) चा निकाल ८८% लागला. विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा मनपा उर्दू हाय स्कूल जमील कॉलनी येथे आयोजित करण्यात आला होता यावेळी अध्यक्ष म्हणून ॲड. प्रिती रेवणे शिक्षण सभापती ह्या उपस्थित होत्या.गुण गौरव मध्ये प्रथम क्रमांक आयेशा समन अब्दुल समद ७३%,द्वितीय क्रमांक - तहेमा अजीन अतहर अहमद ६९.३३%, तृतीय क्रमांक - जवेरीया तसलीम अब्दुल नईम ६३.५०% या गुणी विद्यार्थिनींचा गुण गौरव करण्यात आला. यावेळी मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, सईद सर मुख्याध्यापक मनपा उर्दू हायस्कूल जमील कॉलनी हे उपस्थित होते.

### आप्पाजी महाराज वारकरी ज्ञानपीठामध्ये प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**अमरावती-**माऊली कृपांकित आप्पाजी महाराज वारकरी ज्ञानपीठ हे अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात आहे. हे महाराष्टातील नामवंत डिजिटल वारकरी ज्ञानपीठापैकी एक आणि विदर्भातील पहिले डिजिटल वारकरी ज्ञानपीठ आहे. ' त्वं ज्ञानमयो, त्वं विज्ञानमयो, त्वं तंत्रज्ञानमयोएसि ' या संकल्पनेवर कार्य करत विद्यार्थ्यांना वारकरी शिक्षण शालेय, शिक्षण आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण निःशुल्क दिल्या जाते.इथे पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण दिले जाते.दरवर्षी या ज्ञानपीठामध्ये पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. याही वर्षी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश नोंदवण्याची अंतिम तारीख ५ जून आहे. विद्यार्थ्यांची निवड ही मुलाखत प्रक्रियेने होईल.विद्यार्थ्यांचा प्रवेश नोंदवण्यासाठी ९६०४१९३७४९, ९४०५३५२२२७, ९७६२५५५१५४ या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.

### छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात व्याख्यान



**खल्लार-** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे महाराष्ट्रातील सहकार चळवळ या विषयावर अतिथी व्याख्यान पार पडले. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून नारायण कनिष्ठ महाविद्यालयाचे डॉ.आर.आर.देशमुख उपस्थित होते. प्रमुख अतिथी इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रविण सदार उपस्थित होत. प्रास्ताविक डॉ.रविंद्र इचे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# डिजिटल इंडियाची जनगणना

**‘आमची जनगणना, आमचा विकास’ हे ब्रीद असणारी आणि स्वयंगणना करण्याची संधी देणारी जनगणना १ मेपासून संपूर्ण भारतात सुरू झाली. जनगणना कशासाठी? तिचा राष्ट्राला, आपणाला काय लाभ? यात लोकांची भूमिका, कर्तव्ये काय? याविषयी...**

**डॉ. जे. के. पवार**

जनगणना भारतात फार प्राचीन काळापासून सुरू होती. राजेरजवाड्यांच्या काळात आपापल्या राज्यातील मालमत्तेची मोजदाद करण्यासाठी जनगणना केली जात असे. त्यामुळे त्या राज्यातील महसूल गोळा करण्याच्या कामी जनगणनेची माहिती उपयोगी पडत असे. ख्रिस्तपूर्व ४०० वर्षांपूर्वीच्या कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये जनगणनेसंबंधी माहिती नमूद केली आहे. धारा (कर वसुली) गोळा करणाऱ्यांनी किती कुटुंबांकडून धारा गोळा केला जाऊ शकेल व किती कुटुंबांकडून गोळा करता येणार नाही, याची नोंद घेण्यासाठी घरांची गणना करावी. तसेच किती शेतकरी, गुराखी, व्यापारी, दुकानदार, नोकर आहेत, प्रत्येक कुटुंबामध्ये किती तरुण आणि वृद्ध माणसे आहेत, त्यांचा व्यवसाय, उत्पन्न आणि खर्च ही माहिती गोळा करावी. इतकेच नव्हे, तर भटक्या जमातीतील लोकांच्या स्थलांतराची कारणे गोळा करावीत, अशा सूचना दिल्या होत्या.

लोकसंख्येच्या शास्त्रशुद्ध अभ्यासास सतराव्या शतकात लंडनमधील जॉन ग्रँट या शास्त्रज्ञापासून सुरुवात झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांनी आपले सिद्धांत ‘नॅचरल अँड पॉलिटिकल ऑब्झर्वेशन मेड अपॉन द बिल्स ऑफ मोर्टॅलिटी इन लंडन’ (१६६२) या पुस्तकामध्ये प्रसिद्ध केले. त्यात आयुर्मान सारणी कशी तयार करता येईल. याचा आराखडा दिला आहे. तसेच माल्थस यांनी १७९८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या लोकसंख्या तत्त्वावरील निबंधात आर्थिक दृष्टिकोनातून जनगणनेचा अभ्यास केला होता. १९३९ मध्ये अल्फ्रेड जे. लोटका यांनी जन्म, मृत्यू आणि लोकसंख्येची वयनिहाय विभागणी यामधील संबंध दाखविणारे सिद्धांत प्रस्थापित केले होते.

नियोजनबद्ध जनगणनेची सुरुवात १८७२ मध्ये झाली, तर सार्वत्रिक स्वरूपाची जनगणना १८८१ मध्ये झालेली दिसून येते. तेव्हापासून भारतात दर १० वर्षांनी जनगणना केली जात आहे. २०२७ मधील जनगणना ही भारतातील १६ वी जनगणना असून स्वातंत्र्योत्तर काळातील ही ८ वी जनगणना आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ मध्ये स्वतंत्र भारताची पहिली जनगणना झाली होती. ८ वी जनगणना दोन टप्प्यांत होणार असून, पहिला टप्पा यावर्षी (२०२६), तर दुसरा टप्पा २०२७ मध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यात स्वयंगणना होणार आहे. यामध्ये भारतीय नागरिकांनी १ मे ते १५ मे या कालावधीत म.महेलेु.द.ग्ह या संकेतस्थळावर किंवा ॲपवर आपली माहिती भरायची आहे. माहिती भरल्यानंतर एस.सी.आय.डी. क्रमांक तयार होईल. त्यानंतर १६ मे ते १५ जून या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरामध्ये जाऊन माहिती घेतील. स्वातंत्र्योत्तर काळातील ७ जनगणना या दर दहा वर्षांनी नियमितपणे झाल्या. काही नैसर्गिक, तर काही तांत्रिक, मनुष्यनिर्मित अडचणींमुळे ८ वी जनगणना तब्बल १६ वर्षांनी होत आहे. विशेष म्हणजे, ही जनगणना ‘डिजिटल जनगणना’ म्हणून ओळख निर्माण करीत आहे. यामुळे माहिती संकलन अधिक जलद, अचूक आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. डिजिटल साक्षरतेचे प्रमाणही वाढण्यास मदत होत आहे.

एखाद्या जनसमूहाचा अभ्यास हा प्रामुख्याने पुढील पिढीमध्ये लोकसंख्येची पुनर्स्थापना कशी होईल, याविषयीचा अभ्यास असतो. व्यक्ती ही मर्त्य असली, तरी जनसमूह/समाज हा सतत अस्तित्वात असतो. म्हणजेच जनसमूहाचे घटकत्व नेहमी बदलत असते. प्रतिवर्षी काही बालके जन्माला येतात, तर काही माणसे मरतात. याशिवाय स्थलांतरानेही जनसमूहाच्या घटकांमध्ये निव्वळ वाढ अगर घट होऊ शकते. म्हणूनच लोकसंख्येतील वाढ, घट अगर आहे ती लोकसंख्या टिकून राहणे हे जननक्षमता, मृत्यू आणि स्थलांतर या तीन गोष्टींवर प्रामुख्याने अवलंबून असते आणि हा एक सोपा परंतु महत्त्वाचा असा निष्कर्ष जनगणनेतून मिळतो. जनगणनेमुळे देशातील लोकसंख्येची एकूण आकडेवारी, लोकसंख्यावाढीचे प्रमाण, वाढीचा वेग, घटीचा वेग, मृत्युदर, जन्मदर, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी, शैक्षणिक माहिती, साक्षरता प्रमाण, लोकसंख्येची वयोगटानुसार, ग्रामीण व शहरी विभागणी, सरासरी आयुर्मान, लोकसंख्यावाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम अशा अनेक महत्त्वाच्या घटकांची, बाबींची माहिती आकडेवारी उपलब्ध होते.



देशात आज अनेक समस्या आहेत; मात्र त्याचे मूळ काय? याचे उत्तर जनगणनेतील विविध निष्कर्षांतून बऱ्यापैकी मिळू शकते. अर्थात, त्यासाठी जनगणना निर्दोष असायला हवी. आकडेवारी चुकीची असली, तर उपाय कोणते? कसे? आणि कोण करणार? म्हणून जनगणनेसाठी प्रत्येकाने आपापली खरी आणि सविस्तर माहिती देणे, हेच आपणा सर्वांचे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. देशातील उपलब्ध मनुष्यबळ, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, घरबांधणी, शेती व अन्नविषयक गरजा, सार्वजनिक आरोग्य, कुटुंबनियोजन इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी धोरण आणि कार्यक्रम ठरविण्यासाठी जी माहिती आवश्यक असते, ती या जनगणनेतूनच उपलब्ध होते. राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक योजनांमध्ये जनगणनेचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. ‘आपली जनगणना, आपले भविष्य’ हे २०११ च्या जनगणनेचे ब्रीद होते. खरोखरच आपली जनगणना हे आपले भविष्यच ठरते.

कारण, देशाची आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक घडी व्यवस्थित बसविण्यासाठी राज्यकर्ते व नोकरशहांना जनगणनेद्वारे संकलित केलेल्या माहितीचा उपयोग होतो. या माहितीआधारेच देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा अचूकपणे तयार करता येतो. त्यामुळेच २०२७ च्या जनगणनेचे ब्रीद ‘आमची जनगणना, आमचा विकास’ असे घेण्यात आले असावे. आज आपला देश जगात एक महासत्ता म्हणून उभारी घेत आहे. सर्व अंगांनी भारताची विकासाकडे घोडदौड चालू आहे.जगातील इतर महासत्ता भारताकडे भावी महासत्ता म्हणून पाहत आहेत. म्हणूनच जनगणना यशस्वी करणे हे सर्वच भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे.

जनगणनारूपी जगन्नाथाच्या रथास सर्वांचेच हात लागावेत, अशी अपेक्षा आहे. मग, चला तर आपली जबाबदारी पार पाडूया, जनगणनेत सहभागी होऊया!

# खा. बोंडे यांच्यासह भाजप कार्यकर्त्यांना दिलासा



**आंदोलनाच्या तीनही प्रकरणातून निर्दोष मुक्तता**

**मोर्शी/ वार्ताहर**

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलन करणारे राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे व भाजपा कार्यकर्त्यांच्या विरोधात तीन प्रकरणात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. परिणामी दि.५ मे रोजी वि.प्रथम श्रेणी न्यायाधीश एन.के. खराडे यांनी सर्व गुन्हे खारीज करून खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह सर्व भाजप कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आल्यामुळे मोर्शी शहरासह तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

माजी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे यांचे मार्गदर्शनात भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा मोर्शी ग्रामीण तर्फे २०१८-२०१९ मधील अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळग्रस्त यादीमधुन वगळलेल्याशेतक-यांना व्याजासहीत मोबदला, शेतक-यांच्या पैशावर डल्ला मारणा-या तहसीलदार व या कामात सहभागी असलेल्या कर्मचा-यांवर कार्यवाही करून त्यांना निलंबीत करावे, शेतक-यांचे शेतातील बंद असलेला विज पुरवठा त्वरीत सुरू करावा, संजय गांधी, श्रावण बाळ योजनेचे मानधन देण्यात यावे यासाठी तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले. तत्कालीन तहसीलदार यांच्या कक्षाचे दरवाजाला निवेदन चिटकवून कुलुपाचे जागेवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा लावला.आंदोलन कर्त्यांनी कार्यालयामध्ये व कार्यालयीन परीसरामध्ये अशोभनीय वर्तणुक करून घोषणाबाजी केली.शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केल्यामुळे त्यांचेविरुद्ध कलम ३४१,१८६,१४३,१४९ व १८८ अन्वे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक जयस्तंभ चौक मोर्शी येथे माजी कृषिमंत्री व विद्यमान खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात भाजपाचे कार्यकर्ते यांनी दिवाळीपूर्वी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करून मोर्शी वरुड तालुका ओला दुष्काळ जाहीर करावा.या मागणीसाठी रस्त्यावर संत्री टाकून सरकारच्या विरोधात जनआक्रोश आंदोलन केले.त्यामुळे त्यांच्याविरुद्ध मोपो काचे कलम १३५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०जानेवारी २०२२ रोजी सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मोर्शी यांचे कार्यालयासमोर मोर्शी वरूड चांदूरबाजार तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील वीज कनेक्शन कापू नये.यासाठी आंदोलन करून तीव्र स्वरूपाची नारेबाजी केल्यामुळे त्यांचेविरुद्ध भादवी कलम १८८ व २६९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तीनही केसचा निकाल ५ मे रोजी लागला असून खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.या आंदोलनात डॉ.अनिल बोंडे, आप्पा गेडाम, अजय आगरकर, प्रवीण राऊत, अशोक ठाकरे, ब्राम्हानंद देशमुख, ज्योती मालवीय, देवकुमार बुरंगे, नरेंद्र नांदुरकर, निलेश शिरभाते, नितीन राऊत, प्रदीप सोलव, शशिकांत उमेकर, दिवाकर पाचारे, रवी मेटकर, सुनील सोमवंशी, प्रतिभा फंदे, वर्षा गाडगे, अनिता लांजेवार, वर्षा काळमेंघ, सुवर्णा साठवणे, वर्षा घाटोळ, प्रशांत राऊत, मनोज मोकलकर, अजिंक्य लुंगे, सुनील ढोले, विलास वानखडे यांचा सहभाग होता.आरोपी तर्फे ॲड.पवन अकर्ते व ॲड.हर्षा बाळसराफ यांनी तर सरकारी वकील म्हणून उगले यांनी कामकाज पाहिले.

# भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा सोमवारी अभिष्टचिंतन सोहळा





**पालकमंत्री बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार कार्यक्रम**

**विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन**

**अमरावती/का.प्र.**

भाजपचे अमरावती शहर व जिल्हा अध्यक्ष, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शहरात विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

डॉ. धांडे यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सोमवार ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.


याप्रसंगी भाजपचे प्रदेश महामंत्री तथा अमरावती प्रभारी आ. संजय कुटे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, भाजपचे मुख्य प्रतोद आ. रणधीर सावरकर, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी राज्यमंत्री आ. परिणय फुके, आ. प्रताप अडसड, आ. रवी राणा, आ. तायडे, आ. उमेश यावलकर, आ. वानखडे, आ. काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय आ. सुलभा खोडके, आ. संजय खोडके, राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या सदस्या किरणताई महल्ले, आ. गजानन लवटे, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार प्रवीण पोटे, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, सुनील देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, रविराज देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, तसेच विविध पक्षांचे व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. डॉ. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी सकाळी विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात महाआरती करण्यात येणार असून त्यानंतर स्थानिक गोरक्षण येथे लापशी तुला करण्यात येणार ओहे.

शहराच्या विविध भागात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे अशी माहिती आयोजन समितीने दिली.

# प्राध्यापकांना शिकवण्याच्या नव्या तंत्रज्ञानाची माहिती

**जीएचआरयू अमरावतीत शैक्षणिक प्रौद्योगिकीवर पाच दिवसीय एफडीपी**



**अमरावती/का.प्र.**

जी. एच. रायसोनी विश्वविद्यालय (जीएचआरयू), अमरावती येथील स्कूल ऑफ लॉच्या वतीने एसोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) आणि अकॅडेमिक अँड ॲडमिनि स्ट्रेटिव्ह डेव्हलपमेंट सेंटर (एएडीसी) यांच्या सहकार्याने पाच दिवसीय ऑनलाइन फैकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

‘फ्रॉम एलएमएस टू लर्निंग ॲनालिटिक्स : लेवरेजिंग एज्युकेशनल टेक्नॉलॉजीज फॉर अकॅडेमिक एक्सलन्स’ या विषयावर आधारित या कार्यक्रमात वेबेक्स प्लेटफॉर्मद्वारे देशभरातील शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अन्वये प्राध्यापक, संशोधक आणि प्रशासकांना डिजिटल पेडागॉजी, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम (एलएमएस), लर्निंग ॲनालिटिक्स, ई-कंटेंट विकास, ऑनलाइन मूल्यमापन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने सक्षम करण्याचा मुख्य उद्देश या एफडीपीमागे होता. दररोज सरासरी १७० प्रतिभागींनी कार्यक्रमात भाग घेतल. त्यात स्कूल ऑफ लॉचे ९ प्राध्यापक देखील सहभागी होते.

स्कूल ऑफ लॉच्या डीन डॉ. नीता नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विभागीय समन्वयक म्हणून असिस्टंट प्रोफेसर क्षितिजा देशमुख तर संयोजक म्हणून असिस्टंट प्रोफेसर डॉ. रंजन दुबे यांनी काम पाहिले.उद्घाटन सत्रात एआययूच्या जॉइंट सेक्रेटरी रंजना परिहार, विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्रो. डॉ. विनायक एस. देशपांडे आणि कुलसचिव डॉ. स्नेहिल जैस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.एनआयईपीएचे प्रो. के. श्रीनिवास यांनी ‘ब्लेंडेड लर्निंग व एनईपी २०२०’ आणि ‘एलएमएस इव्होल्यूशन व ई-कंटेंट डिझाइन’ या विषयांवर दोन सत्रे घेतली आणि लाइव्ह एलएमएस डेमोही सादर केले.

दुसऱ्या दिवशी डॉ. अतुल कुमार साहू आणि डॉ. ब्लेसी डो एम यांनी ऑनलाइन मूल्यमापन रणनीती, क्विझ, असाइनमेंट आणि रुब्रिक तयार करणे यावर व्यावहारिक प्रशिक्षण दिले.तिसऱ्या दिवशी आयआयटी बॉम्बेतील शोध विद्यार्थी आदित्य राजमाने आणि सिस्टर निवेदिता युनिव्हर्सिटीचे प्रो. डॉ. सैकत माइती यांनी लर्निंग ॲनालिटिक्स, डेटा व्हिज्युअलायझेशन आणि विद्यार्थ्यांच्या सहभागिता पॅटर्न यावर प्रकाश टाकला. चौथ्या दिवशी डॉ. अभिषेक डी. पटंगे यांनी प्रेडिक्टिव ॲनालिटिक्स आणि जोखमीत असलेल्या विद्यार्थ्यांची ओळख यावर चर्चा केली, तर सुश्री सोयोनिका गोगोई यांनी विद्यार्थ्यांच्या वर्तणूक, भावनात्मक आणि संज्ञानात्मक ॲनालिटिक्सवर व्याख्यान दिले.पाचव्या दिवशी डॉ. संजय बंग यांनी एआयचा नैतिक वापर आणि डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) ॲक्ट २०२३ यावर सविस्तर चर्चा केली. डॉ. नेहा दमानी यांनी एडटेकचे भविष्य आणि व्यक्तिनिष्ठ व अनुकूलित शिक्षण यावर आपले विचार मांडले.

समापन सत्रात प्रतिभागींचा अभिप्राय, प्रमाणपत्र वितरण आणि कुलगुरूंचे सम्बोधन यासह कार्यक्रमाची सांगता झाली. कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी याला २१व्या शतकातील शैक्षणिक उत्कृष्टतेकडे एक महत्त्वाचे पाऊल म्हटले. प्रतिभागींना एलएमएस, ई-कंटेंट विकास, डेटा-आधारित निर्णय, प्रेडिक्टिव मॉडेल्स आणि नैतिक एआय वापर यांची व्यावहारिक समज प्राप्त झाली.

# पुणे येथे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा सत्कार



**अमरावती/का.प्र.**

‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने यशदा, पुणे येथे राज्यस्तरीय शहरी संवाद कार्यक्रम उत्साहात पार पडला. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित या एकदिवसीय कार्यक्रमात राज्यभरातील महापौर, पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी आणि प्रकल्प प्रमुखांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यसभेच्या खा. मेघा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ साध्य करण्यासाठी पारदर्शक, सक्षम आणि नागरिकाभिमुख स्थानिक स्वराज्य संस्था उभारण्याची गरज अधोरेखित केली. उद्घाटनप्रसंगी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा सत्कार करण्यात आला.

महापौर श्रीचंद तेजवानी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगीतले की, ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी आज आयोजित करण्यात आलेला हा शहरी संवाद कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आणि दिशादर्शक ठरला आहे.विकसित महाराष्ट्र २०४७’ हे केवळ एक स्वप्न नसून ते साकार करण्याची सामूहिक जबाबदारी आहे. शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच आपण हे उद्दिष्ट निश्चितच गाठू शकतो, असा विश्वास यावेळी महापौरांनी व्यक्त केले आहे.

कार्यक्रमात जयराज फाटक, भा. प्र. से. तसेच रवी रंजन गुरु यांनी शहरी प्रशासनातील बदलत्या गरजा, डिजिटल गव्हर्नन्स, आर्थिक स्वावलंबन आणि लोकसहभाग यांवर मार्गदर्शन केले.

यावेळी समीर राजूरकर, रूपाराणी निगम, अश्विनी निगम, श्रीनाथ भिमाले तसेच जयंत पाठक सोहम कुलकर्णी, राहुल भुसूम तसेच वैभव काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमात स्मार्ट आणि डिजिटल प्रशासन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण पूरक विकास, जलव्यवस्थापन, हरित शहर संकल्पना, नागरिकांचा सहभाग, तसेच स्थानिक संस्थांची आर्थिक क्षमता वाढविणे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.

# मेळघाटात मोहफुलांचा हंगाम बहरला

**अमरावती/का.प्र.**

मेळघाटातील आदिवासी पट्टयात सध्या मोहफुलांचा हंगाम बहरला असून, निसर्गाच्या या देणगीने स्थानिक आदिवासी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार दिला आहे.

रोजगाराच्या संधी मर्यादित असलेल्या या भागात मोहफुलांचे संकलन हाच सध्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत ठरत आहे. मात्र, एकेकाळी गाजलेल्या ‘मोहा बँक’ प्रकल्पाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे आदिवासींच्या या हक्काच्या उत्पन्नात शाश्वत प्रगती होऊ शकलेली नाही.

मेळघाटात उन्हाळ्याची चाहूल लागताच मोहफुलांचा सुगंध आसमंतात पसरतो.

पहाटेपासून महिला, पुरूष आणि मुले जंगलात जाऊन ही फुले वेचण्याचे काम करतात. पहाटेच्या वेळी ही फुले गळून पडतता.

त्यामुळे सकाळी लवकर उठून मोहफुले गोळा करण्यासाठी जावे लागते. एका कुटुंबाकडून दिवसाला साधारण १५ ते २० किलो मोहफुलांचे संकलन केले जाते. वेचलेली मोहफुले वाळवून त्याची विक्री केली जाते. सध्या बाजारात ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. मात्र, हे काम जोखमीचे असते.



**संकलनानंतरही ‘मोहा बँक’ प्रकल्पाकडे दुर्लक्ष**

मोहफुले हे अस्वलांचे प्रिय खाद्य असल्याने, ही फुले वेचताना वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका वाढला आहे.

पहाटेच्या अंधारात फुले वेचताना अस्वलाची सतत भीती वाटते, अशी भावना स्थानिक महिलांनी व्यक्त केली आहे.

‘पेसा’ कायद्यांतर्गत वनोपजावर मिळालेल्या अधिकारांमुळे स्थानिक ग्रामसभांची भूमिका या हंगामात महत्वाची ठरली आहे. मोहफुलांच्या विक्रीतून वर्षभरावी आर्थिक बेगमी करण्यासाठी आदिवासी बांधव प्रयत्नशील आहेत.

उत्पादनांना अधिक चांगला भाव मिळावा, यासाठी शासनाने थेट खरेदी केंद्रे सुरू करावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

काही वर्षांपुर्वी मोहफुलांच्या उत्पादनाला व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्यांनी ‘मोहा बँक’ ही संकल्पना मांडली होती. आदिवासींच्या उपजीविकेचे साधन म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात होते.

मात्र, नंतर या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे प्रशासकीय स्तरावर दुर्लक्ष झाले. हा प्रकल्प पूर्णत्वास न गेल्याने आदिवासींना स्थानिक व्यापाऱ्यांवरच अवलंबून रहावे लागत आहे.

या मोहफुलांपासून मद्यनिर्मिती तसेच विविध पारंपरिक पदार्थ केले जातात.

या फुलांचा औषधी उपयोग देखील आहे. मोहफुले हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून ती मेळघाटातील आदिवासींच्या संस्कृतीच्या आणि जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहेत. या नैसर्गिक संपत्तीला योग्य प्रक्रियेची आणि नियोजित बाजारपेठेची जोड मिळाल्यास मेळघाटातील स्थलांतराचा प्रश्न काही अंशी सुटण्यास मदत होऊ शकते.

# नगरपालिका स्वच्छता विभागाचा कारभार ढेपाळला

## प्रभाग १ च्या नगरसेविका स्वत: उतरल्या रस्त्यावर; हातात झाडू-घमेला घेऊन उचलला कचरा



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाच्या भोंगळ कारभाराचा फटका आता लोकप्रतिनिधींनाही बसू लागला असून, शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये साचलेल्या कचऱ्यामुळे संतप्त झालेल्या नगरसेविका रेशमा परवीन अजीम इनामदार यांनी गुरुवारी स्वतःच रस्त्यावर उतरून कचरा उचलला. हातात झाडू, फावडा आणि घमेला घेऊन त्यांनी परिसरातील साचलेला कचरा साफ केल्याने नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अकोट शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक भागांमध्ये नियमित कचरा संकलन होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. घंटागाड्या वेळेवर न पोहोचणे, रस्त्यांच्या कडेला दिवसन?दिवस कचऱ्याचे ढिग साचणे, नाल्यांमध्ये घाण जमा होणे आणि दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकवेळा नागरिकांनी तसेच नगरसेवकांनी प्रशासनाकडे तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याचा आरोप केला जात आहे.

प्रभाग क्रमांक १ मध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचून राहिल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण होते. वारंवार तक्रारी करूनही स्वच्छता विभागाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर नगरसेविका रेशमा परवीन इनामदार यांनी स्वतः पुढाकार घेत रस्त्यावर उतरून कचरा उचलण्यास सुरुवात केली. त्यांच्या या कृतीमुळे परिसरातील नागरिकांनीही प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.

**नागरिकांमध्ये संताप :** शहरातील विविध भागांत कचरा साचल्याने डासांचे प्रमाण वाढले असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

**'प्रशासन जागे होणार का?':** नगरसेविकेच्या या आंदोलनात्मक भूमिकेनंतर तरी नगर परिषद प्रशासन आणि स्वच्छता विभाग जागे होणार का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, शहरातील कचरा संकलनाचे काम खासगी कंत्राटदारामार्फत केले जात असताना, त्याला लाखो रुपयांची देयके नियमितपणे अदा केली जात असल्याची चर्चा आहे. मात्र प्रत्यक्षात शहरातील स्वच्छतेची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. 'देयके वेळेवर दिली जात असतील तर मग शहर स्वच्छ का राहत नाही?' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. नगरसेविकेला स्वत: रस्त्यावर उतरून कचरा उचलण्याची वेळ येणे, ही नगर परिषद प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची प्रतिक्रिया शहरात उमटत आहे. स्वच्छता विभागातील निष्काळजीपणा, कर्मचाऱ्यांवरील नियंत्रणाचा अभाव आणि कंत्राटदारांच्या कामावर देखरेख नसल्याने शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचा आरोप होत आहे.

## ...थोडक्यात...

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मूल्यमापन समितीवर विजय शिंदे



**अकोट :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान पुरस्कार मुल्यमापन समितीवर अकोला जिल्हा पत्रकार संघाचे सचिव तथा अकोट येथील पत्रकार विजय मनोहरराव शिंदे यांची नियुक्ती करण्यास आली आहे. अकोट पंचायत समितीच्या गठीत या मूल्यमापन समितीला वर्धा जिल्ह्यातील कारंजा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायती मधील कामकाजाचे पुरस्कारासाठी मूल्यमापन करावे लागणार आहे.

या समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी रमाकांत माळी असुन या समितीमध्ये विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (पंचायत), अगंणवाडी पर्यवेक्षिका, संगणक परिचालकव तालुका पत्रकार अशा चार सदस्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे राबविण्यात येणारा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे, जो २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राबविला जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांना सक्षम करून, लोकसहभागातून गावे अधिक कार्यक्षम, स्वच्छ आणि शाश्वत बनवणे हा आहे. या अभियानात सहभागी ग्रामपंचायतीना राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार ५ कोटी रुपये, द्वितीय ३ कोटी, आणि तृतीय २ कोटी रुपयांचा आहे. विभागनिहाय एकूण १८ उत्कृष्ट ग्रामपंचायतींनाही पुरस्कार मिळणार आहेत.

### 'श्रीमद् भागवत कथा व हरिनाम सप्ताहा'चे आयोजन

**मुर्तिजापूर :** तालुक्यातील शिरताळा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री महंत १००८ सिताराम महाराज यांच्या कृपेने व श्री वै. समर्थ सद्गुरु श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या जन्म शताब्दीनिमित्त 'श्रीमद् भागवत कथा व हरिनाम सप्ताहा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. गुरुवर्य तुकाराम सखारामपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह हनुमान मंदिर, शिरताळा येथे पार पडणार आहे. या आध्यात्मिक महोत्सवाचा शुभारंभ शनिवार, ९ मे २०२६ (वैशाख कृ. ७) रोजी होणार असून, सांगता शनिवार, १६ मे २०२६ (वैशाख कृ. ३०) रोजी होईल. सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज कळंबेश्वर हे करणार आहेत. कथेची वेळ दररोज सकाळी ८:३० ते १२:३० पर्यंत आहे. याशिवाय दररोज पहाटे ५ वाजता काकडा आरती, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ आणि रात्री ८ ते १०:३० या वेळेत विविध नामांकित कीर्तनकारांची 'हरिकीर्तन' सेवा पार पडणार आहे. सप्ताहात ह.भ.प. सोपान महाराज डिक्कर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज लाहुळकर, ह.भ.प. गजानन महाराज गोडचारे, ह.भ.प. हिरओम सोनोणे महाराज, ह.भ.प. गणेश कराळे महाराज, आणि ह.भ.प. अविनाश महाराज खोकले आपली सेवा अर्पण करतील. शुक्रवार, १५ मे रोजी भव्य मिरवणूक सोहळा काढण्यात येईल. शनिवार, १६ मे रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत ह.भ.प. गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपूरकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल.

### 'त्रिशरणाची मंगलवाणी' ने दुमदुमले महानगर

**अकोला :** संस्कार भारती अकोला शाखा व तीक्ष्णगत मल्टीपर्पज सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी गर्दीने तुडुंब भरलेल्या स्थानीक प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात बुद्ध पौर्णिमा संगीतमय उत्सवास अकोलेकर नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.पावन बुद्ध पौर्णिमा पर्वावर आयोजित या संगीतमय उत्सवात महिला, पुरुष गायकांनी एकापेक्षा एक सुंदर व संगीतमय बुद्ध व भीमगिते गाऊन भक्तिभाव निर्माण केला. तिक्ष्णगत सोसायटीचे अध्यक्ष डॉ सुगत वाघमारे व संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर यांनी साकारलेल्या व प्रा. प्रकाश बोरकर यांनी नियोजन केलेल्या व प्रा स्वप्निल बोरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या संगीतमय उत्सवाचा प्रारंभ संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर,सुमंत देशपांडे, डॉ गजानन नारे, प्रकाश मालगावे, प्रा प्रकाश बोरकर, निखिलेश दिवेकर, अध्यक्ष डॉ आर बी हेडा, तीक्ष्णगत सोसायटीचे विष्णुदास मंडोकार,निनाद कुळकर्णी, किसन जयस्वाल आदीच्या उपस्थितीत करण्यात आला.

# जेसीआय अकोला युनिक प्रियदर्शिनी तर्फे गोग्रास पात्रांचे वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■



सामाजिक आणि मानवीय सेवेत सक्रिय असलेल्या जेसीआय अकोला युनिक प्रियदर्शिनी संस्थेच्या वतीने गोमातेच्या सेवेसाठी एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. संस्थेच्या अध्यक्ष आरती लड्ढा यांच्या नेतृत्वाखाली गंगा नगर येथील हरिप्रिया गोशाळेत गोमातांना उन्हापासून दिलासा मिळावा यासाठी ७० किलो कलिंगडाचे वितरण करण्यात आले. तसेच गोशाळेसाठी तीन मल्टीपर्पज वॉटर ड्रम स्टँड देण्यात आले, ज्यामुळे गोशाळेत असलेल्या गोमातांसाठी दाणा-पाणी आणि गोग्रासासाठी स्वच्छ गोग्रास पात्र उपलब्ध होऊ शकेल.यावेळी आरती लड्ढा यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेकडून यापुढेही अशाच सेवा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाईल, असे सांगितले. या जीवदया उपक्रमात पूनम सोमानी, सीए सत्यनारायण लोहिया, सोनम गट्टानी, चेतना चांडक, रश्मी पसारी, सुमन अग्रवाल आणि मनीषा पाडिया यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सुरुवात समाजसेवी किशनलाल लड्ढा यांच्या हस्ते आणि डॉ. कपिल लड्ढा यांच्या उपस्थितीत गोग्रास पात्र पूजनाने झाली. या प्रकल्पाच्या संचालिका पूनम सोमानी आणि स्नेहल लोहिया होत्या. कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्ष आरती लड्ढा, सचिव मोनिका राठी, कशिश भाटिया आदी उपस्थित होत्या.

# नवीन कामगार नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध; हरकती व सूचना नोंदविण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■



राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांचे हित, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारने १ नोव्हेंबर २०२५ रोजी लागू केलेल्या नवीन चार कामगार संहितांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याची नियमावली तयार केली असून त्याचा मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे. या प्रस्तावित नियमावलीवर राज्यातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या हरकती आणि सूचना अधीसूचना प्रसिद्ध झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत नोंदवाव्यात, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.

केंद्र शासनाने औद्योगिक संबंध, वेतन संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता २०२०, तसेच सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अशा चार प्रमुख संहिता देशभर लागू केल्या आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्याला स्वतःची नियमावली तयार करणे आवश्यक होते. त्यानुसार, राज्य शासनाच्या कामगार विभागाने विधि व न्याय विभागाच्या अत्यंत सूक्ष्म तांत्रिक सहकार्याने ही नियमावली तयार केली आहे. या नियमावलीचा मसुदा २८ एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत अधिसूचनेद्वारे जनतेसाठी खुला करण्यात आला आहे.

या संदर्भात माहिती देताना कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, राज्याच्या प्रगतीमध्ये कामगारांचा वाटा सिंहाचा असतो. त्यामुळेच त्यांच्या कामाच्या ठिकाणची सुरक्षितता, त्यांचे आरोग्य आणि त्यांना मिळणारे वेतन या बाबींना राज्य सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. प्रस्तावित नियमावलीचा मुख्य उद्देश राज्यातील औद्योगिक शांतता टिकवून ठेवणे हा आहे. मालक आणि कामगार यांच्यातील संबंधांचे सुयोग्य नियमन करून दोघांमधील समन्वय वाढवणे, वेतनाच्या तरतुदी अधिक स्पष्ट आणि पारदर्शक करणे, ही या नियमावलीची वैशिष्ट्ये आहेत.

# वेळेवर विवाह लावा; अन्यथा दंडाला सामोरे जा!

## बौद्ध समाजात नवा पायंडा

■ प्रतिनिधी | अकोला ■

लग्न समारंभांमध्ये वेळेचे भान न राखता तासन्तास उशीर करण्याच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्यासाठी बौद्ध समाजाने आता शिस्तीचा नवा पायंडा पाडला आहे. बुद्ध विहार समन्वय महासंघाच्या पुढाकारातून धम्मबोधी डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली 'बौद्ध परिणय नियमन समिती' स्थापन करण्यात आली असून विवाह सोहळे वेळेत पार पडावेत यासाठी जनजागृती अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील विवाह सोहळ्यांच्या वेळेच्या नोंदी ठेवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिवणी येथे ५ मे २०२६ रोजी जगताप व सोनोने परिवारातील विवाह सोहळा पार पडला. वधूपक्षाने सर्व व्यवस्था वेळेत पूर्ण करूनही नाचगाणे व इतर कारणांमुळे विवाहास तब्बल दोन तास उशीर झाला. या विवाह सोहळ्यास अकोला जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष दामोदर जगताप, माजी गटविकास अधिकारी समाधान जगताप, वंचित बहुजन आघाडीचे अशोकराव सिरसाट, सुरेश सिरसाट, शेख साबीर भाई, प्रवीण पातोडे, नगरसेविका उज्वला पातोडे, शेख शमशु यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी पुज्य भंते सुरिक्ष सुनित बोधी तसेच भंते शीलरक्षित उपस्थित होते. विवाह विधी पार पाडण्यासाठी धम्म विनय बौद्ध समितीचे अध्यक्ष वसंतराव अवचार, महासचिव मोतीराम गायकवाड, कोषाध्यक्ष अवधुतराव भोजने गुलाबराव दामोदर भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक विलास बावस्कार यांनी उपस्थिती लावली. विवाहास झालेल्या उशिराची गंभीर दखल घेत समितीचे अध्यक्ष वसंतराव अवचार यांनी वधू-वर पक्षावर दोन हजार रुपयांचा दंड आकारला. विशेष म्हणजे या निर्णयाचे उपस्थितांनी जोरदार स्वागत केले. माजी उपाध्यक्ष दामोदर जगताप यांनी स्वतः स्टेजवरच दोन हजार रुपयांची दंडरक्कम समितीकडे सुपूर्द केली. सदरहू रक्कम बौध्द विहाराच्या बांधकामसाठी वापरण्यात येणार असल्याची माहिती धम्म विनय बौद्ध समितीचे अध्यक्ष वसंतराव अवचार यांनी दिली. या घटनेनंतर उपस्थितांमध्ये 'असे कठोर निर्णय घेतल्याशिवाय वेळेचे महत्त्व लोकांना कळणार नाही' अशी जोरदार चर्चा रंगली.

## सामाजिक जीवनात भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू - रविंद्र चव्हाण

■ प्रतिनिधी | अकोला ■

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी सीएडब्ल्यूटी सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो.

तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला सीएडब्ल्यूटी च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली.

## सीएडब्ल्यूटीतर्फे केले जाणारे काम कौतुकास्पद

**अकोला :** अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी सीएडब्ल्यूटी सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (सीएडब्ल्यूटी )आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने सीएडब्ल्यूटी च्या स्थापनेत आणि सीआयएनटीएए - सीएडब्ल्यूटी टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्त कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (N7940068) From **KAMAL RAMESHWAR SURYAWANSHI** -- TO -- **KAMALABAI RAMESHWAR SURYAWANSHI** My Residential Address is-- Raja Ram Menge Nagar Ring Road Kaulkhed Akola Maharashtra 444004.

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५८७/२०२६ प्रोसेस नं.५१२६/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ दिनांक : १५/०४/२०२६

**अर्जदार :** श्रीमती रेखा इंद्रजीत मौर्य रा. रामनगर, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला. २. श्रीमती फुल कुमारी अनिलकुमार मौर्य रा घर नं. ६६, मोहल्ला उमराना जंघाई रोड, मच्छलीशहर, जौनपूर, उत्तरप्रदेश २२२१४३ ३. राम आसरे सुखराज मौर्य ४. रामसेवक सुखराज मौर्य ५. शिवशंकर सुखराज मौर्य अर्जदार क. ३ ते ४ रा. ग्राम पंचायत च्या मागे, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला. ६. श्रीमती मनोरमा योगेश कच्छवाह रा. प्लॉट नं. ४८, नंद भवन, सेंट्रल बाजार रोड, व्हीएनआयटी कॉलेज जवळ, बजाज नगर, एस. ओ. नागपूर. ४४००१० ७. श्रीमती रिता रामनरेश मौर्य रा. ७८, यशवंत नगर, जळगाव, महाराष्ट्र ४२५००२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुखराज मंगरू मौर्य २. श्रीमती चंद्रावती सुखराज मौर्य
**पत्ता :-** रा. ग्राम पंचायत च्या मागे, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखराज मंगरू मौर्य यांचे दि. १०/०२/२००६ रोजी व तसेच मयत श्रीमती चंद्रावती सुखराज मौर्य यांचे दि. १०/०३/२००७ रोजी शिवणी, अकोला. ता. जि. अकोला. निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३३/२०२६ प्रोसेस नं.६३५३/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. मनोहर यशवंतराव मानकर रा. व्दारा यशवंतराव मानकर, फ्लॅट नं. १२०२, १२ वा मजला, रनवल सिरिन, लख्मे रोड, अंबरनाथ ग्राउंड जवळ, गोवंडी, पोस्ट देवनार, उपजिल्हा कुर्ला, जि. मुंबई उपनगर. २. विजय यशवंतराव मानकर रा. आशापुरी सॉ मिल, मनकर्णा प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शांताबाई यशवंत मानकर
**पत्ता :-** रा. आशापुरी सॉ मिल जवळ, मनकर्णा प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शांताबाई यशवंत मानकर यांचे दि.०३/०२/२०२६ रोजी लोटस सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५८३/२०२६ प्रोसेस नं.५२७०/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती नमुबाई मुरलीधर वाकोडकार रा. गजानन चौक, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. २. पद्माबाई लक्ष्मणराव डांगे उर्फ पद्माबाई मुरलीधर वाकोडकार रा. कोठारी वाटिका नं. ३, मलकापूर, अकोला, ता. जि. अकोला. ३. शारदा विजय ढवळे उर्फ शारदा मुरलीधर वाकोडकार रा. राजमाता कॉलनी नं. २, नागपूर रोड, राहटगाव, ता. जि. अमरावती. ४. संगिता राजेंद्र गरड उर्फ संगिता मुरलीधर वाकोडकार रा. कोठारी वाटिका नं. १, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ५. किशोर मुरलीधर वाकोडकार ६. अशोक मुरलीधर वाकोडकार अर्जदार क. ५ व ६ रा. ग्रामपंचायत जवळ, मलकापूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मुरलीधर मारोतराव वाकोडकार
**पत्ता :-** रा. ग्रामपंचायत जवळ, मलकापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मुरलीधर मारोतराव वाकोडकार यांचे दि. ०४/०४/२०१७ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५२३/२०२६ प्रोसेस नं.५२०३/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. पुंडलिक ज्ञानदेव शिंगणे रा. हातरूण रोड, दुधाळा, पो. लोणाग्रा, ता. जि. अकोला. २. गोपाल ज्ञानदेवराव शिंगणे रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. कमल गंगाधर कोकाटे रा. बाभुळगाव, पोस्ट उकळी बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. ज्ञानदेव गोविंद शिंगणे २. श्रीमती प्रमिला ज्ञानदेव शिंगणे
**पत्ता :-** रा. दुधाळा, पो. लोणाग्रा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्ञानदेव गोविंद शिंगणे यांचे दि. २०/०७/२०२५ रोजी व तसेच मयत श्रीमती प्रमिला ज्ञानदेव शिंगणे यांचे दि. २१/०४/२०१७ रोजी दुधाळा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक : ३४९/२०२६ कलम -२२ नेमता तारिख- ०८/०६/२०२६
जा.क्र. /११८४/२०२६ दि. ०५/०५/२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. काळा मारोती संस्थान अंत्री (मलकापुर ) ता. बाळापुर जि.अकोला. नोदणी क्रमांक. ए. १८६४ बाबत

**अर्जदार** - श्री. हरीभाऊ नारायण मापारी मु.अंत्री (मलकापुर ) पो. उरळ, ता. बाळापुर जि. अकोला.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) बर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत ( वर्णन ) :-** काहि नाहि **आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :-** १) दि. ०९/०२/२०२६ रोजीच्या दानपत्रादवारे मिळालेली स्थावर मालमत्ता त्याचे वर्णन खालीलप्रमाणे .

मौजे अंत्री मलकापुर ग्रा. पं. आहे. ता. बाळापुर जि. अकोला. येथील स्थावर माल खाली जागा यांचे वर्णन मालमत्ता क्रं. ६६, क्षेत्रफळ - १९८.१४ चौ. मी. हिस्सा पुर्ण

**चतु:सिमा :-** पुर्वेस :- डांगराजी परीवार. पश्चिमेस :- काळा मारोती मंदिर उत्तरेस :- शंकर देठेचे घर व महादेव मामानकरचे घर. दक्षिणेस :- सरकारी रस्ता.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक ०५.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोल अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# घाम गाळणाऱ्या कामगारांना शासनाचा दगड

## ९ महिन्यांपासून अर्जांची कोंडी; वर्धा येथे बांधकाम कामगारांमध्ये नाराजी

### १५ दिवसांत निर्णय घ्या, अन्यथा रस्त्यावर लाखोंचा एल्गार-उमेश अग्निहोत्री यांचा इशारा

**वर्धा/जनमाध्यम**

एकीकडे शासनाकडून कामगार कल्याणाच्या गोंडस घोषणा केल्या जात असताना दुसरीकडे वर्धा जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांना मात्र प्रशासनाने अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नोंदणी नूतनीकरण, शैक्षणिक सहाय्य, वैद्यकीय मदत, गृहउपयोगी संच आणि विविध कल्याणकारी योजनांचे अर्ज तब्बल आठ ते नऊ महिन्यांपासून प्रलंबित ठेवण्यात आल्याने कामगारांचा संताप आता उफाळून आला आहे.

गरीबांच्या घामावर उभे राहणारे सत्ताधारी आणि कार्यालयात बसून फाईली दाबून ठेवणारे अधिकारी यांच्याविरोधात बांधकाम कामगारांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. कामगारांच्या ताटातील घास हिरावून घेणारे हे कोण असा प्रश्न आता सर्वसामान्य कामगार विचारू लागले आहेत.माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वीपर्यंत वर्ध्यात अर्ज निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र अचानक नागपूर येथील अप्पर कामगार आयुक्तांनी वर्ध्यातील नोंदणी अधिकाऱ्यांचे लॉगिन आयडी काढून घेतल्याची माहिती समोर आली आहे.



हे आयडी गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आले. परंतु त्या अधिकाऱ्यांनी वर्ध्यातील एकाही कामगाराचा अर्ज मंजूर न केल्याचा गंभीर आरोप होत आहे.या निर्णयामुळे हजारो अर्ज धूळ खात पडले असून अनेक कामगार कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, आजारपणातील उपचारांसाठी किंवा संसारासाठी शासनाकडून मिळणाऱ्या मदतीच्या आशेवर असलेल्या कामगारांना प्रशासनाने अक्षरशः अंधारात ढकलल्याची भावना व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ हे सेवा हमी कायद्यांतर्गत येते. नियमानुसार प्रत्येक अर्ज ६० दिवसांच्या आत निकाली काढणे बंधनकारक आहे. मात्र प्रशासनाने कायद्यालाच पायदळी तुडवत हजारो अर्ज प्रलंबित ठेवले आहेत. त्यामुळे 'सेवा हमी कायदा फक्त कागदावरच का असा प्रश्न उपस्थित होत आहे.या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे.कामगारांच्या सहनशक्तीचा अंत पाहू नये. येत्या १५ दिवसांत सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढले नाहीत, तर हजारो बांधकाम कामगारांसह भव्य मोर्चा काढण्यात येईल.

त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी कामगार विभाग आणि संबंधित अधिकारी जबाबदार राहतील,असा आक्रमक इशारा त्यांनी दिला.दरम्यान, वर्ध्यातील बांधकाम कामगारांमध्ये आंदोलनाची ठिणगी पेटली असून प्रशासनाविरोधातील असंतोष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. आता शासन जागे होणार की कामगारांच्या उद्रेकानंतरच डोळे उघडणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# चना खरेदीला अखेर 'जीवनदान'

## खा. अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश; नाफेड खरेदीस २९ मेपर्यंत मुदतवाढ

**वर्धा/जनमाध्यम**

नाफेडमार्फत सुरू असलेल्या चना खरेदी प्रक्रियेत आलेल्या अडथळयांमुळे हजारो शेतकऱ्यांचा माल विक्रीविना पडून राहिला असताना अखेर शासनाने मोठा दिलासा दिला आहे. खासदार अमर काळे यांनी सातत्याने लावून धरलेल्या मागणीची दखल घेत राज्य शासनाने चना खरेदीस २९ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे. तसेच तुर खरेदीची मुदतही ३१ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

यंदा वर्धा व अमरावती जिल्ह्यात चन्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. बाजारभाव हमीभावाच्या आसपास असला तरी नाफेडच्या खरेदी केंद्रांवरील तांत्रिक अडचणी, नोंदणीतील विलंब, अपुरी क्षमता आणि वेळोवेळी खरेदी प्रक्रियेत पडलेला खंड यामुळे अनेक शेतकरी आपला माल विक्रीसाठी आणूनही



नोंदणी करू शकले नाहीत. परिणामी हजारो क्विंटल चना शेतकऱ्यांच्या घरातच पडून राहिला होता.दरम्यान, नाफेडची खरेदी थांबल्यानंतर व्यापारी वर्गाने याच परिस्थितीचा फायदा घेत पडत्या दरात चना खरेदी सुरू केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक होत असल्याचा मुद्दा खासदार अमर काळे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता.शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी नाफेडची खरेदी तातडीने सुरू ठेवणे आणि मुदतवाढ देणे अत्यावश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती.

यासोबतच खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, खरेदी केंद्रांची संख्या वाढविणे आणि नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची मागणीही त्यांनी केली होती.या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सहकार व पणन वस्त्रोद्योग विभागाने दि. ६ मे २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार नाफेडच्या चना खरेदीला २९ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. शासनाच्या या निर्णयामुळे वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आता उर्वरित माल हमीभावात विक्री करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणीची दखल घेत वेळेत निर्णय घेतल्याबद्दल खासदार अमर काळे यांनी समाधान व्यक्त केले असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी संघर्ष कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# रक्ताच्या थारोळ्यात तडफडत होते दोन जीव

## महामार्ग धावत होता पुढे; पण खा. अमर काळे थांबले
## सारवाडी घाटात माणुसकीचा जिवंत झरा;
## जखमी वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी खासदार ठरले देवदूत

**वर्धा/अमरावती जनमाध्यम**

राजकारण म्हटले की डोळ्यांसमोर उभा राहतो तो लाल दिव्यांचा ताफा, काळ्या काचा, अंगरक्षकांचा गराडा आणि सामान्य माणसापासून दूर गेलेले नेते. पण या सगळ्या चौकटी मोडून 'माणूसपण' अजूनही जिवंत असल्याचा प्रत्यय खासदार अमर काळे यांनी सारवाडी घाटात दिला. नागपूर-अमरावती महामार्गावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दोन तरुणांना स्वतःच्या वाहनातून रुग्णालयात नेत त्यांनी केवळ दोन जीवच वाचवले नाहीत, तर माणुसकीची ज्योतही तेजाने प्रज्वलित ठेवली.

नागपूरहून अमरावतीकडे दुचाकीने निघालेल्या दोन तरुणांचा सारवाडी घाटाजवळ भीषण अपघात झाला. दुचाकी घसरल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. डोक्यातून आणि शरीरातून रक्तस्त्राव होत असताना ते महामार्गावर अक्षरशः मृत्यूशी झुंज देत पडले होते. वाहनांची ये-जा सुरू होती, अनेकांनी अपघात पाहिला, काहींनी गती कमी केली, पण मदतीसाठी कुणाचेही हात पुढे आले नाहीत. महामार्गावरील ती संवेदनाहीनता अंगावर काटा आणणारी होती.अशातच खा.अमर काळे आपला दौरा आटोपून त्या मार्गाने परतत होते. अपघातस्थळ पाहताच त्यांनी वाहन तात्काळ थांबवले. कोणताही दिखावा नाही, कोणतीही प्रसिद्धी नाही. ते स्वतः



खाली उतरले, जखमी तरुणांची विचारपूस केली आणि क्षणाचाही विलंब न करता दोघांनाही स्वतःच्या वाहनात बसवून थेट उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.रुग्णालयातही त्यांची धावपळ सुरूच होती. डॉक्टर उपचार करत असताना खासदार अमर काळे स्वतः तिथे थांबून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. प्राथमिक उपचारानंतर दोन्ही तरुणांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे रवाना करण्यात आले. त्या क्षणी एका खासदाराने नव्हे, तर एका संवेदनशील माणसाने आपले कर्तव्य पार पाडले होते.या घटनेतील विशेष बाब म्हणजे जखमी झालेले दोन्ही युवक एमबीबीएसचे विद्यार्थी आहेत. एक नागपूरचा तर दुसरा गोंदियाचा असल्याची माहिती समोर आली. उपचारानंतर या विद्यार्थ्यांनी भावुक होत प्रतिक्रिया दिली. त्या क्षणी खासदार अमर काळे आमच्यासाठी देवासारखे धावून आले. त्यांनी मदत केली नसती तर आम्ही वाचलो असतो की नाही, सांगता येत नाही, असे त्यांनी सांगितले.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत तुकाराम महाराज आणि मेहेरबाबांच्या मानवधर्माच्या विचारांचा प्रभाव असलेल्या अमर काळे यांच्या कृतीतून त्यांच्या संस्कारांची प्रचिती पुन्हा आली. रंजल्या-गांजल्यांना मदतीचा हात देणे हेच खरे समाजकारण असल्याचे त्यांनी आपल्या वर्तनातून दाखवून दिले. आज राजकारणात प्रसिद्धीसाठी स्टंटबाजी करणाऱ्यांची कमी नाही. सोशल मीडियावर फोटोसाठी गर्दी करणाऱ्यांचाही सुळसुळाट आहे. मात्र कुठलाही गाजावाजा न करता मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्या दोन तरुणांसाठी धावून जाणारे खासदार अमर काळे यांचे हे कृत्य समाजातील हरवलेली माणुसकी पुन्हा जागवणारे ठरले आहे.दोन भावी डॉक्टरांचे प्राण वाचवून त्यांनी भविष्यात हजारो रुग्णांचे जीव वाचविणाऱ्या हातांनाच बळ दिले, अशा शब्दांत परिसरातील नागरिकांकडून त्यांच्या या कृतीचे कौतुक केले जात आहे.

# नदीत मुबलक पाणी... तरी गावकऱ्यांच्या घागरी कोरड्या

## साहूर-सावंगा-धाडीमध्ये चार दिवसाआड पाणीपुरवठा; महिलांची पाण्यासाठी भटकंती

**साहूर/जनमाध्यम**

एका बाजूला वर्धा नदीत मुबलक पाणीसाठा, तर दुसऱ्या बाजूला ग्रामस्थांच्या घागरी कोरड्या अशी संतापजनक परिस्थिती साहूर, सावंगा (पुनर्वसन) आणि धाडी या गावांमध्ये निर्माण झाली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत करोडो रुपये खर्चून उभारण्यात आलेली पाणीपुरवठा योजना आज नियोजनशून्य कारभारामुळे अक्षरशः कोलमडल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी, उन्हाळ्याच्या तडाख्यात नागरिकांना चार दिवसाआड पाणी मिळत असल्याने महिलांसह ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गेल्या ३० ते ३५ वर्षांपूर्वी



वर्धा नदीवरील फिल्टर प्लांटद्वारे या तिन्ही गावांसाठी पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली होती. अप्पर वर्धा धरणामुळे नदीत वर्षभर पाणीसाठा उपलब्ध असतानाही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने ग्रामस्थांनी जलजीवन मिशनचे अधिकारी, कंत्राटदार आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर आरोप केले आहेत.पूर्वी एक दिवसाआड होणारा पाणीपुरवठा आता थेट चार दिवसाआड होत असल्याने घरगुती वापर, लग्नसमारंभ आणि उन्हाळ्यातील वाढती गरज यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. अनेक घरांमध्ये कुलर सुरू असून पाहुण्यांची वर्दळ वाढली असताना ग्रामपंचायतीकडून नियमित पाणीपुरवठा करण्याऐवजी पुरवठा कमी करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, पाणीपट्टीचे बिल मात्र नियमित आकारले जात असल्याने बिल रोजचे आणि पाणी चार दिवसांनी अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांतून उमटत आहे.दरम्यान, पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन वारंवार फुटत असल्याने दूषित पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या सर्व प्रकारामागे अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमतामुळेच योजना कोलमडल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. येथील फॉरेस्ट नाक्याजवळील बंद पडलेला जुना बोरवेल तातडीने सुरू करून नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा करावा, अशी मागणी शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख सुरेश टरके, शाखाप्रमुख हरीश लाड, उपशाखाप्रमुख धनराज पाटमासे, सर्कल प्रमुख रामाजी बोटरे, शहर प्रमुख नरेंद्र थोर, विभाग प्रमुख उमेश गावंडे, विशाल कुकडे यांच्यासह ग्रामस्थांनी सरपंचांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.ग्रामस्थांच्या मते, शासनाने ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबापर्यंत स्वच्छ पिण्याचे पाणी पोहोचावे म्हणून जलजीवन मिशनसारखी महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली; मात्र स्थानिक पातळीवरील निष्क्रिय प्रशासनामुळे या योजनेचा बोजवारा उडाल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे.

# खडकीतून चार शेळ्या चोरीला

**सिंदी (रेल्वे)** - खडकी परिसरात शेळ्यांच्या चोरीची घटना समोर आली असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सखाराम नेहारे (६५) यांनी घराशेजारील गोठ्यात चार शेळ्या बांधून ठेवल्या होत्या. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात प्रवेश करून सुमारे ५० हजार रुपये किमतीच्या चारही शेळ्या चोरून नेल्या. सकाळी गोठा रिकामा दिसताच नेहारे यांच्या लक्षात हा प्रकार आला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनीही घटनास्थळी गर्दी केली. ग्रामीण भागात जनावरांच्या चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व संशयितांची माहिती तपासली जात आहे. पोलिसांनी चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# आजाराच्या वेदनेवर आनंदाचा मलम

**वर्धा/जनमाध्यम**

रुग्णालयातील निर्जीव वातावरण, औषधांचा वास आणि उपचारांच्या तणावातून बालरुग्णांना काही क्षण आनंदाचे, सर्जनशीलतेचे आणि आपलेपणाचे मिळावेत या उद्देशाने आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाच्या बालरोग विभागात आयोजित करण्यात आलेले दहा दिवसीय उन्हाळी शिबिर चिमुकल्यांसाठी अविस्मरणीय ठरले. १ मे ते १० मे या कालावधीत पार पडलेल्या या उपक्रमाने उपचार घेत असलेल्या मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवले. दंत तपासणीसारख्या उपक्रमांनाही चांगला प्रतिसाद मिळाला.हे शिबिर डॉ. केता वाघा यांच्या संकल्पनेतून साकार झाले असून विभागप्रमुख डॉ.



अमर ताकसांडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. जयंत वाघा तसेच डॉक्टर आणि प्राध्यापकांनीही उत्साहाने सहभाग घेत उपक्रम यशस्वी केला. उद्घाटनप्रसंगी डायरेक्टर हॉस्पिटल्स डॉ. चंद्रशेखर महाकाळकर आणि जेएनएमसीच्या डीन डॉ. सोनाली चौधरी उपस्थित होत्या. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत बालरुग्णांच्या सर्वांगीण काळजीसाठी अशा संवेदनशील उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

शिबिराच्या समारोपावेळी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यातील समाधान या उपक्रमाच्या यशाची साक्ष देऊन गेले. वैद्यकीय उपचारांसोबत मायेचा आणि आनंदाचा स्पर्श देणारे हे शिबीर अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले.

## संक्षिप्त

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**खरांगणा**-मजरा येथे एका इसमाने स्वतःच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली. महादेव पचारे (४५) असे मृताचे नाव आहे. महादेव यांना दारूचे व्यसन असल्याचे सांगण्यात येत असून ते काही दिवसांपासून मानसिक तणावात असल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दिली. घरातील सदस्यांना त्यांनी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसताच एकच खळबळ उडाली. तातडीने त्यांना खाली उतरविण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### अपघातात जखमी वृद्धाचा मृत्यू

**खरांगणा**-आंजी (मोठी) येथील बाजार परिसरात झालेल्या



अपघातात गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रामदास कोकाटे (७५) रा. भादोड असे मृताचे नाव आहे. काही दिवसांपूर्वी बाजार परिसरात त्यांचा अपघात झाला होता. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. वृद्धाच्या निधनाची माहिती मिळताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. खरांगणा पोलिसांनी या प्रकरणी नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे. वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांमध्येही चिंता व्यक्त केली जात आहे.

# नरसापूर प्रकरणाच्या निषेधार्थ वर्ध्यात संतप्त नागरिकांचे आंदोलन

## महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर; आरोपीला फाशीची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

नरसापूर येथे चार वर्षीय मुलीवर झालेल्या अत्याचार व हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ वर्धा शहरात आज विविध संघटना, राजकीय पक्ष व नागरिकांनी एकत्र येत तीव्र आंदोलन केले. या घटनेमुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून महिला व बालिकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

वर्धा जिल्हा महाविकास आघाडीच्या वतीने महात्मा गांधी पुतळ्याजवळ दुपारी चार वाजता आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान आरोपीविरोधात घोषणाबाजी करण्यात आली आणि घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला.आंदोलनकर्त्यांनी संबंधित आरोपीवर जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. अशा प्रकारच्या घटना थांबवण्यासाठी कठोर कायदे



आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे,असे मत अनेकांनी व्यक्त केले.महिलांनी हातातील बांगड्या दाखवत शासनाविरोधात प्रतीकात्मक निषेध नोंदवला. महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तसेच राज्यात महिलांच्या सुरक्षेसाठी यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली.आंदोलनानंतर प्रतिनिधीमंडळाने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून या प्रकरणात त्वरीत न्याय मिळावा तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली.या आंदोलनात अरुणा धोटे, संगीता उघडे, कल्पना टिपले, ऋतुजा भोयर, प्रमोद पांडे, प्रशांत सातपुते, भाग्यश्री उराडे, भारती कोटमकर, डॉ. अभ्युदय मेघे, कल्याणी पाटील, पियुष कोल्हे, माधवी पाटील, नाजिया शेख, शेख मेहमूद, प्रवीण पेठे, शंकर आडे, जयमाला सोनगडे, शेखर शेंडे, प्रमोद भोमले, भारती थूल, मनोज देशमुख, विलास कोरले, नंदकुमार वानखेडे, कुणाल बावनकुळे, खुशाल राऊत यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते.

# मलब्यावरून वाद; इसमाला मारहाण

**पुलगाव** - घराच्या बांधकामाचा मलबा चेंबरजवळ टाकल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका इसमाला मारहाण करण्यात आल्याची घटना गांधीनगर परिसरात घडली. प्रमोद ढेंगे (५०) यांनी शेजारी सुरू असलेल्या बांधकामातील मलबा चेंबरजवळ टाकण्यात आल्याने आक्षेप घेतला होता. याच कारणावरून त्यांचा विजय दुधे याच्याशी वाद झाला. वादाचे रूपांतर शिवीगाळ व मारहाणीत झाले. या घटनेत प्रमोद ढेंगे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. घटनेनंतर पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. किरकोळ कारणांवरून वाढणारे वाद चिंतेचा विषय ठरत आहेत.



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर सहसंचालकांसोबत बैठक

## स्थाननिश्चिती, कार्यभार, GPF, DCPS थकबाकी, एम.फिल. लाभ, पदनिर्धारण व कार्यभारविषयी आदी प्रश्नांवर चर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित सेवा-विषयक, आर्थिक व प्रशासकीय प्रश्नांवर आज उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक कार्यालयात संयुक्त संघर्ष कृती समिती व प्रशासन यांच्यात सविस्तर आणि महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. बैठकीस उच्च शिक्षण विभाग, अमरावती विभागाचे सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रभू दवणे तसेच राम राठोड उपस्थित होते.

या बैठकीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर संघटनांच्या प्रतिनिधींनी अभ्यासपूर्ण मांडणी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. बैठकीच्या प्रारंभी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील कार्यवृत्ताच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. स्थाननिश्चिती, वेतननिश्चिती, थकीत वेतन देयके, भविष्य निर्वाह निधीच्या (उइइ) हिशेब पावत्या, विविध थकबाकी, वैद्यकीय प्रतिपूर्ती, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन, उपदान व रजारोखीकरण यांसारख्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी समितीने केली.

महाविद्यालयीन शिक्षकांच्या कार्यभाराबाबत चर्चा करताना ळउण च्या नियमानुसार केवळ अध्यापनच नव्हे तर परीक्षा कार्य, संशोधन, प्रशासकीय जबाबदाऱ्या, विद्यार्थी विकास, मेजर-मायनर अभ्यासक्रम, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि इतर शैक्षणिक उपक्रमांचाही कार्यभारामध्ये समावेश होणे आवश्यक असल्याचे समितीने स्पष्ट केले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर मेजर-मायनर पद्धतीसह सातही वर्टिकलस् विचार न करता कार्यभार निश्चिती करणे व्यवहार्य ठरणार नाही तसेच प्रथम वर्षाला किमान विद्यार्थी संख्येची अट नसावी अशी भूमिका नुटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी मांडली. 'धोरणासोबत वास्तवाची सांगड घालणे आवश्यक असून, स्पष्ट निकषांशिवाय कार्यभार व पदनिर्धारण प्रक्रिया न्याय्य ठरणार नाही,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

एम.फिल. अर्हताधारक शिक्षकांच्या स्थाननिश्चितीतील तांत्रिक अडचणींचाही बैठकीत विशेष ऊहापोह झाला. एम.फिल.च्या आधारे स्थाननिश्चितीचे लाभ न मिळालेल्या प्राध्यापकांची प्रकरणे तातडीने निकाली काढावीत,



तसेच एम.फिल. अर्हतेच्या आधारे लाभ न मिळताच सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांना न्याय देण्यासाठी विशेष प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली.

पदनिर्धारणाच्या संदर्भात १ ऑक्टोबर २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे कोणते निकष वापरण्यात आले, अमरावती विभागात किती शिक्षक पदांना मंजुरी देण्यात आली, तसेच नवीन भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष गरजांचा कितपत विचार करण्यात येत आहे, याबाबतही प्रशासनाकडे सविस्तर माहिती मागविण्यात आली.

ण्ँ संदर्भातील चर्चेत महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार सेवा बजावणाऱ्या शिक्षकांचे प्रत्यक्ष कार्यकाल व अध्यापन तास (झीग्द् ण्दल्हू) ग्राह्य धरण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली. डॉ. विवेक देशमुख यांनीही या संदर्भात वास्तवाधारित भूमिका मांडत धोरणात्मक स्पष्टतेची आवश्यकता अधोरेखित केली.

रजारोखीकरणाच्या संदर्भात डॉ. प्रविण रघुवंशी यांनी सातवा वेतन आयोग लागू असताना कोणत्या शासन नियमांनुसार रजारोखीकरण दिले जात आहे, यासंदर्भात प्रशासनाकडे स्पष्ट आदेश आहेत काय, अशी थेट विचारणा केली. विद्यापीठातील विविध प्रलंबित प्रश्नांवर अध्यक्ष अजय देशमुख यांनी सविस्तर चर्चा घडवून आणत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या.

प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. राधेश्याम सिकची यांनी उइइ कर्ज प्रकरणांमध्ये व्यवस्थापनाच्या परवानगीची सक्ती का केली जाते, असा प्रश्न उपस्थित करत कर्मचाऱ्यांच्या आर्थिक अधिकारांबाबत प्रशासनाची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली.

बैठकीत अण्इए धारक कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची प्रकरणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके, सेवानिवृत्ती उपदान आणि इतर आर्थिक लाभ तातडीने मंजूर करण्याची मागणीही करण्यात आली.

संयुक्त संघर्ष कृती समितीने स्पष्ट केले की, कर्मचारी वर्गाशी संबंधित प्रश्न केवळ प्रशासकीय नसून ते शैक्षणिक व्यवस्थेच्या स्थैर्याशी निगडित आहेत. प्रश्न प्रलंबित राहिल्यास त्याचा थेट परिणाम शिक्षण व्यवस्थेवर होणार असल्याने प्रशासनाने संवेदनशीलता व सकारात्मकता दाखवून तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली. सहसंचालक कार्यालयाने विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करून टप्प्याटप्प्याने प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिल्याची माहिती बैठकीनंतर समितीच्या प्रतिनिधींनी दिली.

या बैठकीस संयुक्त संघर्ष कृती समितीचे सचिव डॉ. प्रविण रघुवंशी, अध्यक्ष नुटा तथा महाराष्ट्र प्राध्यापक संघटना, महाराष्ट्र राज्य अजय देशमुख, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटना, प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. राधेश्याम सिखाची, सचिव डॉ. निलेश गावंडे, नुटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे व डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. विवेक देशमुख, डॉ. दिनेश पुंड, डॉ. सौरभ घोगरे, प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे, अमरावती जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे प्रफुल्ल घवळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच नुटाचे सहसचिव डॉ. सुभाष गावंडे, विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी डॉ. योगेश्वर कुरवाडे, महाराष्ट्र शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष राजाभाऊ बढे, सचिव सुदाम मुगल, जिल्हा सचिव पी. व्ह. देशमुख तसेच संगाबाअविशिक संघाचे महासचिव नरेंद्र घाटोळ यांच्यासह संयुक्त संघर्ष कृती समितीचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# टीव्ही चोरीचा उलगडा; आरोपीला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-**
घराला कुलूप लावून बाहेर गेलेल्या महिलेच्या घरातून ५५ इंची एलईडी टीव्ही चोरी करणाऱ्या आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त केला. विवेक धनराज गायकवाड (वय ३१, रा. सरोज कॉलनी, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ६ मे रोजी सकाळी सुमारे ११ वाजता मुलीसह रुग्णालयात गेल्या होत्या, तर त्यांची भाची कार्यालयात गेली होती. घराला कुलूप लावलेले असताना सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी यांच्या मुलीच्या चुलत बहिणीने फोन करून 'तुमच्या भावाचा मित्र विवेक गायकवाड घरातून टीव्ही घेऊन जाताना दिसला,' अशी माहिती दिली. त्यानंतर फिर्यादी व त्यांची मुलगी घरी परतल्या असता हॉलमधील एमआय कंपनीचा ५५ इंची टीव्ही चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल केला.

तपासादरम्यान पोलिसांनी आरोपी विवेक गायकवाड याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली देत न्यू काँग्रेस नगर परिसरातील फिर्यादींच्या घरातून टीव्ही चोरी केल्याचे सांगितले. त्यानुसार आरोपीकडून १९ हजार रुपये किमतीचा एमआय कंपनीचा ५५ इंची टीव्ही जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत पोलिसांनी चोरीचा उलगडा करत आरोपीला अटक केली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर, फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट व पोलीस निरीक्षक निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक प्रमुख पोउपनि राहुल महाजन, सपोउपनि मनोज काळबांडे, पोहेका रज्जाक शेकुवाले, पोहेका हरीश चौधरी, नापोशी शशिकांत गवई, पोका अखिल दळवी व पोका संदीप राठोड यांनी केली.


## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २८/२०२५ — ने.ता.१६.०६.२०२६

**पिटीशनर - वनिता गोपाल शेळके व ईतर**
**-- वि --**
**रिस्पांडंट - गौरव दिलीपराव इंगळे व ईतर**

**बनाम -** 1. Vikas Sudhakar Ghalot, R/o Baggi (Jawara) Tq. Chandur Rly. Dist. Amravati.

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर वनिता गोपाल शेळके यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०४, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार विकास सुधाकर गहलोत, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक १६.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१८/२०२६
**माया अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Maya Mahadev Shinde, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Mata Fail, Old Town, Badnera, Tq.Dist.Amravati.
2. Sangita Arjun Paithankar Age 53 Yrs. Occu.: Household R/o Mata Fail, Amdapur, Old Town, Badnera, Tq.Dist.Amravati.
3. Dipak Mahadeo Shinde, Age 48 Yrs. Occu.: Labour R/o Juni Vasti Mata Fail, Badnera, Tq.Dist.Amravati.
4. Dhiraj Mahadeorao Shinde, Age 45 Yrs. Occu.: Labour R/o Marimata Mandir, Ramabai Ambedkar Nagar, Katamala, Badnera

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Mahadeo Tukaram Shinde हे दिनांक 30.08.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Maya Mahadev Shinde + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Maya Mahadev Shinde + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१०३/२०२६ — ने.ता.०४.०५.२०२६

**अर्जदार ः**
१. शामराव केशवराव नेवारे
२. भिमराव केशवराव नेवारे
३. शंकरराव केशवराव नेवारे (मयत)
३अ) इंदु शंकर नेवारे
४. ओंकारराव केशवराव नेवारे (मयत)
४अ) सिंधु ओंकार नेवारे
अ.नं.१ ते ४अ रा. चांदसुरा, पो.जनुना ता.जि.अमरावती
५. नानी विश्वनाथ भोंडे
६. राधा किसनराव भोंडे
४. शिल्पा प्रशांतराव पोफळ
दोन्ही रा.माहुली चोर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** निरंक

ज्याअर्थी मयत **केशवराव मुकाजी नेवारे** यांचा मृत्यू १९८० मध्ये चांदसुरा, पो.जनुना, ता.जि.अमरावती येथे झाला. मयताचे पत्नी नामे **सोनाबाई केशवराव नेवारे** यांचा मृत्यू दि.**१२.११.१९९९ रोजी** चांदसुरा, पो.जनुना, ता.जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार .१ व २ ही मुले असून अर्जदार नं.३अ व ४अ ह्या सुना आहेत. अर्जदार नं.५ व ६ ह्या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## नगर परिषद, उमरखेड
## ता.उमरखेड, जि.यवतमाळ-४४५२०६
## ई-निविदा सूचना क्र.०१/२०२६-२७

नगर परिषद, उमरखेडच्या वतीने विशेष रस्ता अनुदान योजना (लेखाशिर्ष ३०५४००२२) अंतर्गत एकुण ४ कामांच्या ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे तत्सम खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बी-१ नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहेत. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०६.०५.२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. ई-निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**ई-निविदा पध्दतीचा तपशील.**

| | |
|---|---|
| ऑनलाईन निविदा विक्री | दिनांक ०६.०५.२०२६ ते दिनांक १५.०५.२०२६ |
| ऑनलाईन निविदा स्विकृती | दिनांक ०६.०५.२०२६ ते १५.०५.२०२६ सायं.५.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे | शक्यतो दिनांक १८.०५.२०२६ सकाळी ११.०० वाजता |

**अटी व शर्ती -**

१. **निविदेच्या सर्व सविस्तर अटी व शर्ती** www.mahatenders.gov.in **या वेबसाईटवर पहावयास मिळतील.**

**स्वाक्षरी/- नगर अभियंता, नगर परिषद, उमरखेड**
**स्वाक्षरी/- लेखापाल, नगर परिषद, उमरखेड**
**स्वाक्षरी/- मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरखेड**

## जाहीर सूचना

खालील सही करणार यांचे कार्यालयात वृक्ष प्राधिकरण महाराष्ट्र नागरिक क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण पाच कलम (८) पोट कलम ३ मध्ये नमुद नुसार सर्व झोन कार्यालयातून खालीलनुसार अर्ज प्राप्त झाले आहेत. वृक्ष तोडण्याची परवानगी बाबत प्राप्त अर्ज बाबत अर्जावर हरकती/सूचना मागविण्यात येत आहेत.

**झोन क्र.१**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पत्ता | वृक्षाचे नांव | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.राजू शर्मा | विलास नगर गल्ली नं.२, अमरावती | पिंपळ | ०१ |
| २ | पूजा लक्ष्मणराव अहेरवार | मसानगंज, अमरावती | कडूनिम | ०१ |
| ३ | श्री.संदीप प्रदीपराव पेठे | यशवंत बाबा कॉलनी शेगाव-रहाटगांव रोड अमरावती | कडू निम<br>गोडचिंच | ०१<br>०१ |
| ४. | उपअभियंता (बांधकाम विभाग) | उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प, अमरावती | इंग्रजी चिंच | ०३ |
| ५ | जयश्री छोटुसिंग सोळंकी | पाठ्यपुस्तक जवळ, अमरावती | आडजात | ०१ |
| ६ | श्री.नितीन वि.सोनोने | अभिनव कॉलनी, अमरावती | इंग्रजी चिंच | ०३ |
| ७ | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग (निर्माण) क्र.१, अमरावती | विविध प्रजाती | ८२ |
| ८ | अमोल आखरे | राधा नगर, अमरावती | कडू बदाम | ०१ |
| ९ | संतोष मधुकर बोबडे | शेगाव नाका मालवीय कॅम्प, अमरावती | कडू निम | ०१ |
| १० | कपिल वामनराव पाटील | राम नगर विनय विला मंगल कार्यालय समोर अमरावती | कडू बदाम | ०१ |
| ११ | विनोद साहेबराव महल्ले | अंजू कॉलनी अमन बोरवेल मागे, अमरावती | कडू बदाम | ०१ |

**झोन क्र.२**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पत्ता | वृक्षाचे नांव | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सदर सभेमध्ये वृक्ष तोडणे बाबत झोन क्र.२ कडून कुठलेही अर्ज प्राप्त झाले नाहीत. | | | |

**झोन क्र.३**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पत्ता | वृक्षाचे नांव | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.हरीश किंमतराम अडवाणी | रा.नवजीवन कॉलनी, दसरा मैदान अमरावती | कॅशिया | ०१ |
| २ | श्री.सुरेख चारमोरे | रा.नंदा मार्केट राजापेठ, अमरावती | पिंपळ | ०१ |
| ३ | श्रीमती सुलभा यशवंत बोडखे | रा.देशपांडे लेआऊट | कडूनिम | ०१ |
| ४ | श्रीमती सुषमा डोंगरदिवे | रा.वामन सोसायटी, अमरावती | सागवान | ०१ |
| ५ | श्री.विष्णुजी बाबलाजी मेश्राम | रा.देवीनगर, अमरावती | उंबर | ०१ |
| ६ | श्री.नितीन भटकर | सहा.अभियंता मनपा, अमरावती | मुंगणा/कडू बदाम | ०१ |
| ७ | श्रीमती मुक्ता मधुकर पांडे | रा.फॉरेस्ट कॉलनी, अमरावती | आंबा | ०२ |
| ८ | श्रीमती रत्नप्रथा मनोहर जिरापुरे | रा.एस.बी.आय.कॉलनी, अमरावती | वाळलेले वृक्ष | ०१ |
| ९ | श्री.मनोहर तारकराम देवरे | रा.भोवते लेआऊट, अमरावती | आंबा | ०१ |
| १० | श्री.अंकुश सुखदेवराव हेडाऊ | रा.जलाराम नगर, अमरावती | आंबा/फणस | ०१ |

**झोन क्र.४**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पत्ता | वृक्षाचे नांव | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.चंद्रशेखर नारायण कुलकर्णी | श्री.चंद्रशेखर नारायण कुलकर्णी सर्व्हे नं.२२८/२ मौजा बडनेरा | सागवान | १३३ |
| २ | श्री.भाविक सुधीर शह | सर्व्हे नं.११/२अ/५९/२/७/१/४/१ | विविध प्रजातीचे | ०५ |
| ३ | श्री.विवेक देशमुख | सहा.अभियंता, दक्षिण प्रभाग, बडनेरा | विविध प्रजातीचे | ०६ |
| ४ | श्री.मिलिंद श्रीरामजी कुथे | रा.सर्व्हेनं.३३४ मौजा बडनेरा, नेमाणी गोडाऊनच्या मागे, बडनेरा | विविध प्रजातीचे | ०७ |
| ५ | प्राचार्य, सेंट फ्रांसिस स्कूल | नवी वस्ती बडनेरा | शिसम वृक्ष | ०१ |

**झोन क्र.५**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पत्ता | वृक्षाचे नांव | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती ललिता तुकाराम सावरकर | महाजनपुरा, अमरावती | पिंपळ | ०१ |
| २ | सौ.पुष्पा केशवराव उजवणे | शिवशक्ती नगर, म्हाडा कॉलनीजवळ, अमरावती | सागवान | ०२ |

वरील नमुद वृक्ष काढण्याबाबत कोणाची काही हरकत असल्यस संबंधितांनी या कार्यालयात जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसांचे आत सबळ कारण व पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकती/सूचना कार्यालयीन वेळेत दाखल कराव्यात. त्यानंतर येणाऱ्या हरकती / सूचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. हरकती / सुचनांवर कार्यवाहीचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, अमरावती महानगरपालिका तथा आयुक्त, मनपा अमरावती यांचेकडे राखीव आहेत.

**स्वा/-**
**उद्यान अधीक्षक (प्र.)**
**उद्यान विभाग,**
**महानगरपालिका, अमरावती**

## जाहीर सुचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार यांचे वतीने सदर जाहीर सुचना देतो ती येणेप्रमाणे --

**जमिनीचा तपशील** - मौजे - रहाटगांव, प्रगणे - नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे क्र.८३/१ सालीम क्षेत्रफळ १ हे.७४ आर कृषक जमीनीपैकी उत्तरेकडील टोकाची पुर्व-पश्चिम वाटणीची ० हे.४५ आर कृषक शेतजमीन त्यात अंदाजे २००० स्क्वे.फुटाचे विटा-सिमेंटचे पक्के मकान/घर/एक मोठी विहीर, सागाची, अशोकाची, लिंबू व ईतर फळ झाडे इ. पश्चिमेला एक समोरुन १२ फुट रुंद ६ फुट उंच लोखंडी फाटक (गेट) व लागून डांबरी सर्व्हिस रोड.

जमिनीची चतुःसिमा--
पुर्वेस - श्री.दुबे यांची दूध डेअरी
पश्चिमेस - एन.एच.६ हायवे व लागून पक्का सर्व्हीस रोड
उत्तरेस - श्री.महादेव संस्थानची पडीत जमीन
दक्षिणेस - याच सर्वे नंबरमधील उर्वरित शेत जमीन

सदर मिळकत माझे पक्षकार श्री.मनोहर भाऊराव पुरकर यांच्याकडून सदर जमीन विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तसेच वरील नमुद मिळकत ही कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/ सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास तसेच इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नंबरवर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत अथवा दावा ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मिळकती-जमिनीसंबंधी माझ्या पक्षकाराने खरेदीचा सौदा केलेला आहे. त्यानुसार ठरल्याप्रमाणे खरेदी कार्यालयात खरेदी खत रितसर नोंदणीकृत करण्यास माझे पक्षकार मोकळे राहतील, करीता ही जाहीर सूचना

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१५१/२०२६ — ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार ः**
१. रजनी मोहनराव ठाकरे, रा.खेड पिंप्री, पो.पिंपळगांव निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. चंदना युवराज गोमासे, रा.भांडेगांव, पो.भांडेगांव, ता.जि.यवतमाळ
३. सुजाता नितीन भोयर, रा.रुरल इन्स्टिट्यूट, शिवाजी नगर, अमरावती
४. रोशन मोहनराव ठाकरे, रा.खेड पिंप्री, पो.पिंपळगांव निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** निरंक

ज्याअर्थी मयत **मोहन विष्णुजी ठाकरे** यांचा मृत्यू दिनांक १२.०१.२०२६ मध्ये खेड पिंप्री, , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी, अर्जदार नं.२ व ३ मुली असून अर्जदार नं.४ हा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मे, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१४६/२०२६ — ने.ता.११.०६.२०२६

**अर्जदार ः**
१. कुसूम ज्ञानेश्वर पारसकर, रा.वार्ड नं.५ नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. सविता प्रमोद पुंड, रा.वार्ड नं.१७ नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. गंगा योगेशराव घोडे, रा.मुंड निशांकराव, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. ममता तुकाराम भोजापुरे, रा.उंबर्डा, पो.इंझोरी, ता.मानोरा, जि.वाशिम

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** निरंक

ज्याअर्थी मयत **ज्ञानेश्वर सुखदेव पारसकर** यांचा मृत्यू दिनांक २६.०३.२०२३ रोजी घरी रा.मुंड निशांकराव नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयत ज्ञानेश्वर पारसकर यांची आई नामे शेवंताबाई सुखदेव पारसकर यांचा मृत्यू दि.११.०४.१९९० रोजी राहत्या घरी झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी, अर्जदार नं.२ ते ४ ह्या मुली आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ मे, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुलात सर्वांगीण सुसंस्कार शिबीर

**गुरुकुंज मोझरी-** श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १ मे ते १५ मे दरम्यान सुरू असलेल्या या शिबिरात १० ते १८ वयोगटातील सुमारे १०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे. १ मे रोजी प्रा. प्रवीण निपाणी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी अध्यात्म गुरुकुलचे संचालक रवी मानव व दीपकराव भेलकर उपस्थित होते. तसेच मल्लखांब, लाठीकाठी व कराटे यांसारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण माजी सैनिक मेजर बंडू खडसे, आर्यन खडसे व प्रशिक्षक हर्ष बारापात्रे देत आहेत. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रथमेश निस्ताने, विवेक गहाणे, आयुष येरगुडे, सुजल पेटकर आदी सहाय्यक शिक्षक कार्यरत असून, शिबिराचे व्यवस्थापन आर्यन बोबडे सांभाळत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजवून असल्याचे मत शिबिर प्रमुख सुधीर निस्ताने यांनी व्यक्त केले.

# अंजनगाव बारीत मुसळधार वाऱ्यासह पाऊस व गारपीट

## घरांचे नुकसान; विजेचे तार कोसळले,विजपुरवठा खंडित; बदललेल्या वातावरणामुळे उभ्या कांदा पिकांचे मोठे नुकसान

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरात दुपारी २ वाजताच्या सुमारास अचानक वातावरणात काळे ढग दाटून आले आणि मुसळधार वाऱ्यासह जोरदार पाऊस व गारपीट झाली. अचानक झालेल्या या अवकाळी बदलामुळे परिसरातील शेतकऱ्यांची धावपळ उडाली.

विशेषतः शेतात उभ्या असलेल्या कांदा पिकांना मोठा फटका बसला असून गारपिटीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी कांदा पिके आडवी पडली असून गारांच्या मारामुळे





पिकांची गुणवत्ता खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे परिसरातील विजपुरवठा खंडित झाला आहे तसेच काही ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्याच्या देखील तक्रारी समोर येत आहेत.

जोरदार वाऱ्यामुळे विजेचे तारा वायर्स कोसळले असून रस्त्यावर विद्युत तारा विखुरलेले दिसत आहेत. यामुळे संपूर्ण परिसरातील विजपुरवठा पूर्णत: खंडित झाला आहे. नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून रस्तेही अडथळ्यांनी भरलेले आहेत.

अवकाळी पावसामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर नव्या संकटाचे सावट निर्माण झाले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**खल्लार-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित असलेल्या खल्लार कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली असून महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९०.३८ टक्के लागला आहे. प्रथम क्रमांक दिक्षा रमाकांत गुडदे, द्वितीय क्रमांक समिक्षा जिवन पटके,तृतीय क्रमांक यश प्रमोद खडेकार या विद्यार्थ्यांनी पटकावला आहे. कनिष्ठ महाविद्यालयातून एकूण ५२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते



पैकी ४७ विद्यार्थी पास झाले या यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक् हर्षवर्धन देशमुख, कार्यकारिणी सदस्य प्रा.केशव गावंडे सर्व संचालक मंडळ,शाळा समिती सदस्य, शाळा तपासणी अधिकारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डी. आर. नवरे, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व पालक वृंद यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.

# खरीपपूर्व उगवण तपासणी प्राथक्षिकाचे आयोजन

**शिराळा -** येथे खरीपपूर्व पीक प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत बियाणे उगवण तपासणी उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सहाय्यक कृषी अधिकारी मारोती जाधव यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पेरणीपूर्व तयारीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बियाणे उगवण तपासणीची सोपी व प्रभावी पद्धत प्रत्यक्ष दाखवून दिली. सोयाबीन, तूर आदी पिकांच्या बियाण्यांची उगवणक्षमता तपासण्यासाठी ओल्या गोणपाटामध्ये किंवा कागदामध्ये ठरावीक प्रमाणात बियाणे ठेवून त्यांची उगवण टक्केवारी कशी मोजावी, याची माहिती दिली. जर उगवणक्षमता ६० टक्क्यांपेक्षा कमी आढळली, तर ते बियाणे पेरणीसाठी वापरू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, बियाणे प्रक्रिया करण्याचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी FIR पध्दतीने औषधांचा योग्य क्रम व वापर कसा लावावा,या



बाबत मार्गदर्शन केले. बीजप्रक्रिया केल्यास पिकांचे रोगांपासून संरक्षण होऊन उगवण चांगली होते, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी योग्य नियोजन करता येणार असून, उत्पादनवाढीस निश्चितच मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी राष्ट्रीय अन्न सुरक्षा समितीचे जिल्हा सदस्य जयंत आमले, शिवाजीराव खाडे,धनंजय लव्हाळे,युवा शेतकरी आकाश शेंडे, आशिष उके अदि शेतकरी बांधव उपस्थित होते.

# शिक्षकाच्या 'परीसस्पर्शा'ने उजळला सोहळा; प्राचार्य विवेक मोहोड यांच्या गौरवग्रंथाचे प्रकाशन

**अमरावती/का.प्र.**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयात पस्तीस वर्षे गणिताचे शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना गणितासारखा कठीण विषय सोपा-साधा करून शिकवणारे प्राचार्य विवेक मोहोड यांच्या जीवनकार्यावर मित्र, आप्तेष्ट, सहअध्यायी शिक्षक तसेच माजी विद्यार्थी यांच्या मनोगतातून तयार झालेल्या 'परीसस्पर्श' या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा अमरावती शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात थाटात झाला.

माजी उच्च शिक्षण संचालक डॉ. के. एम. कुळकर्णी यांच्या हस्ते हा गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अस्मिता शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा, प्राचार्य डॉ. मीनल भोंडे होत्या. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयाचे माजी प्राचार्य मुरलीधर भोंडे व समाजसेवक गोविंद कासट उपस्थित होते. श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयातील १९९४ च्या इयत्ता दहावीचे विद्यार्थी व सध्या छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असलेले भारत जमधडे यांच्या प्रयत्नातून हा गौरवग्रंथ साकारण्यात आला. विशेष म्हणजे दोन वर्षांपासून या गौरवग्रंथासाठी भारत जमधडे यांनी प्रचंड मेहनत घेतली असुन यासाठी त्यांना मुख्याध्यापक दिलीप सदार, प्राचार्य सुनील मुंदाने, प्राचार्य ममता वाडेगावकर तसेच मोहोड कुटुंबीयांचे विशेष सहकार्य मिळाले. कार्यक्रमाची



सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करून झाली.गौरवग्रंथ प्रकाशन प्रसंगी डॉ. के. एम. कुळकर्णी म्हणाले की, 'एखाद्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रकाशित होणारा 'परीसस्पर्श' गौरवग्रंथ हे अलीकडच्या काळातील एक उत्तम उदाहरण आहे.

गणिताच्या शिक्षकावर विविध क्षेत्रांतून इतके भरभरून प्रेम व्यक्त होत असल्याचे या ग्रंथातून दिसते. गौरवग्रंथ वाचल्यावर विवेक मोहोड हे खरोखरच आदर्श शिक्षक असून त्यांचा खूप मोठा चाहता वर्ग असल्याचे जाणवते.' प्रमुख पाहुणे म्हणून गौरवग्रंथावर भाष्य करताना समाजसेवक डॉ. गोविंदभाऊ कासट म्हणाले की, 'गौरवग्रंथाची समर्पित शिक्षक, विद्यार्थी-केंद्रित नेतृत्व' ही टॅगलाईन आदर्श शिक्षकाचे सर्व आयाम स्पष्ट करते व कर्तव्यनिष्ठ शिक्षकाचे महत्त्व अधोरेखित करते. विवेक-भारत सारखी आदर्श गुरु-शिष्याची जोडी हे समाजाला व शिक्षण क्षेत्राला एक आदर्शवत उदाहरण आहे.अध्यक्षीय समारोप करताना डॉ. मीनल भोंडे म्हणाल्या, 'शिक्षकांच्या नजरेतून, मैत्रीच्या दृष्टीक्षेपातून, आप्तस्वकीयांच्या अनुभवातून तसेच विद्यार्थ्यांच्या आठवणींतून अशा विविध शीर्षकांद्वारे भारत जमधडे यांनी संपादित केलेला हा गौरवग्रंथ शिक्षण क्षेत्रातील प्रत्येकासाठी प्रेरणास्रोत आहे. हा ग्रंथ प्राचार्य विवेक मोहोड यांचा जीवनप्रवास उलगडण्यास मदत करतो.'

प्रकाशन सोहळ्याचो प्रास्ताविक करताना संपादक भारत जमधडे म्हणाले की, 'आपल्यावर समाज, शिक्षक, आई-वडील या तीन ऋणांपैकी शिक्षकाचे ऋण हे आई-वडिलांइतकेच महत्त्वाचे असते.

या कृतज्ञतापूर्वक सुचलेल्या भावनेतून आदरणीय प्राचार्य मोहोड सरांचे कार्य समाजासमोर आणण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. माजी विद्यार्थी संजीव करांगळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी सरांच्या मातोश्री पुष्पा मोहोड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भारत जमधडे आणि डॉ. वंदना जमधडे या उभयतांनी प्राचार्य विवेक मोहोड यांचा पत्नी रोहिणी मोहोड यांच्यासह सन्मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार केला. त्याचबरोबर गोविंदभाऊ कासट मित्र मंडळ, डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. मुकुल भोंडे आणि प्राचार्य मोहोड यांच्या मित्रमंडळींसह अनेक मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला.सत्काराला उत्तर देताना प्राचार्य मोहोड भावुक होऊन म्हणाले, 'पवित्र अशा शिक्षकी पेशात कार्यरत असताना शिक्षणरूपी वाढणाऱ्या रोपट्यास मी एक माळी बनून सिंचनाचे काम केले. आज त्याबद्दलची कृतज्ञता पाहून मी धन्य झालो. गौरवग्रंथ निर्मितीसाठी प्रयत्न केलेल्या सर्वांनाच हा ग्रंथ मी समर्पित करतो. असे मत व्यक्त केले.'

यावेळी संपादक भारत जमधडे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सुनील गाडवे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रीती क्षीरसागर यांनी केले. यावेळी विविध शहरांतून प्राचार्य मोहोड यांचे स्नेही, आप्तेष्ट, सहअध्यायी शिक्षक आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजय करांगळे, राजूभाऊ, सुनील भोंडे, संजय खोब्रागडे, पुरुषोत्तम काकडे, शशांक लावरे, प्रतीक कडू, हेमंत सातपुते, चेतन गाडे, नंदू गुल्हाने, रुद्राणी उघडे आदींनी विशेष सहकार्य केले.

# मोहम्मद जहीर ताहेर ज्युनियर कॉलेजचे यश

**करजगाव/वार्ताहर**

येथे स्थित शरीफाबी उर्दू हायस्कूल आणि मोहम्मद जहीर ताहेर ज्युनियर कॉलेज येथे विज्ञान, कला, वाणिज्य आणि एमसीव्हीसी अभ्यासक्रम उर्दू माध्यमातून शिकवले जातात. येथील विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियानांतर्गत १२वीच्या बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवून शाळेला गौरव मिळवून दिला आहे. विज्ञान विभागाचा उत्तीर्णतेचा टक्का ९७.६७टक्के होता, ज्यात मोहम्मद फातिम अक्रम आणि मोहम्मद मुश्ताक यांनी ७४.३३ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले. मिस्बा



कौसर अब्दुल आसिफने ७०.५० टक्के, तर आवेश ताजिन मुजफ्फर खानने ६८.०० टक्के गुण मिळवले. कला विभागाचा उत्तीर्णतेचा टक्का ७२.४१ टक्के होता, ज्यात लैबा फिरदौस अब्दुल सत्तारने ६८.३३ टक्के, तर सादिया फिरदौस शेख अहमदने ६१.५० टक्के गुण मिळवले. वाणिज्य विभाग उर्दू माध्यमातून शिकवला जातो. नाझीव अर्सलान जावेद इक्बाल याने ७४.६७ टक्के, तन्झिला महेक सय्यद शकील ६६.८३ टक्के आणि मोहम्मद उजेर अब्दुल रौफ ६५.१७ टक्के गुण मिळवून तिसरी क्रमांक पटकावली. एचएससी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली असून, हुशार विद्यार्थी उरूज फातेमा मोहम्मद इद्रिस (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) हिने ६४.५० टक्के, उवैस अहमद तनवीर अहमद (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) याने ६२.१७टक्के आणि अर्शिया साहेर शम्सुद्दीन (ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी) हिने ६१.१७टक्के गुण मिळवले आहेत.

एमसीव्हीसीचा निकाल ६७.६४ टक्के लागला. प्राचार्य मोहम्मद मुदस्सिर मोहम्मद जहीर ताहेर, पर्यवेक्षक मोहम्मद मुमताजुद्दीन इनामदार आणि सर्व शिक्षकवृंदाने गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

## महेश साबळे व शेख नाजीद गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित

**तिवसा-** अम. महावितरण परिमंडळ अंतर्गत गुणवंत कामगार सन्मान सोहळा महाराष्ट्र दिन व कामगार दिनी आयोजित करण्यात आला होता. यावेळी तिवसा उप विभागातून शेख नाजीद अ.हाफिज व अमरावती ग्रामीण मधून महेश साबळे यांना गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महावितरण च्या प्रत्येक उपविभाग मधून एक तांत्रिक कर्मचारी हा सदर पुरस्कार देण्याकरिता निवडला जात असतो. सदर कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महावितरणचे मुख्य अभियंता



अशोक साळुंके, प्रवीण दरोली अधीक्षक अभियंता यवतमाळ, दीपाली माडेलवार, तसेच अम.ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रफुल लांडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत तिवसा उपविभाग मधून शेख नाजीद अ. हफिज,वरिष्ठ तंत्रज्ञ तसेच अमरावती ग्रामीण विभाग मधून महेश साबळे यंत्रचालक यांचा गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला.सदर पुरस्काराबद्दल म. रा. स्वाभिमानी विदयुत वर्कर्स युनियन शाखा तिवसा यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या आहे.

# पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचा ऑफर लेटर डिस्ट्रिब्युशन सोहळा उत्साहात

## महाविद्यालयातूनच ५८१ विद्यार्थ्यांना मिळाला नामांकित कंपनीत रोजगार

**अमरावती/क्रा.प्र.**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे आयोजित ऑफर लेटर वितरण सोहळा स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सुमारे चार हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विविध राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेल्या ५८१ विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह अप्रेसिएशन अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला.

यावर्षी संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत ११० हून अधिक कोअर व सॉफ्टवेअर कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आले होते. अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, फार्मसी, कृषी आणि आर्किटेक्चर या शाखांतील विद्यार्थ्यांना अंतिम वर्षातच नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. विशेष म्हणजे अभियांत्रिकीच्या कोअर शाखां इलेक्ट्रिकल, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन मध्ये १०० टक्के प्लेसमेंट झाल्याचे यावेळी संस्थेमार्फत सांगण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष आ. प्रविण पोटे पाटील यांनी सांगितले की, संस्थेने केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर उत्कृष्ट प्लेसमेंटद्वारेही विदर्भात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार देणारी विदर्भातील एकमेव संस्था म्हणून नावलौकिक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना पदवीसोबत रोजगारक्षम कौशल्यांची आवश्यकता लक्षात घेऊन



उद्योगाभिमुख शिक्षणावर भर दिला जात आहे. सॉफ्टवेअरसोबतच मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, सोलर, कन्स्ट्रक्शन, इलेक्ट्रिक व्हेईकल, फिनटेक, बँकिंग, सेमीकंडक्टर आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांचा वाढता सहभाग हा संस्थेच्या विश्वासार्हतेचा पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या पुणे, मुंबई, नागपूर व हैदराबाद येथील प्लेसमेंट कार्यालयांमुळे उद्योगजगताशी सातत्यपूर्ण संपर्क राखला जात असल्याचे डीन कॉर्पोरेट रिलेशन व प्लेसमेंट डॉ. मोनिका जैन यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत असून विविध शाखांतील विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये स्थान मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांना इंडस्ट्री-रेडी बनविण्यासाठी संशोधन, आधुनिक प्रकल्प आणि कौशल्यविकासावर विशेष भर दिला जात असल्याचे सांगितले. उद्योगांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे यश शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. इतर महाविद्यालयांतील काही विद्यार्थ्यांनाही या उपक्रमातून रोजगाराच्या संधी मिळाल्या.कार्यक्रमाच्या शेवटी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, संचालक तसेच विविध महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोटातील 'बेनामी' खाणसाखळी : कागदावर आदिवासी, खऱ्या सत्तेवर कोण?

## महसूल, खनिकर्म, बँक व्यवहार आणि अनुदान साखळीची चौकशी झाली तर मोठा स्फोट होण्याची शक्यता

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर–रुदाळी परिसरात समोर आलेल्या कथित 'बेनामी' खाणसाखळी प्रकरणाने आता अवैध उत्खननाचा मुद्दा ओलांडून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेलाच कठघऱ्यात उभे केले आहे. आदिवासींच्या नावावर जमीन, परवाने आणि रॉयल्टी दाखवून प्रत्यक्षात संपूर्ण खाण व्यवसायाचे आर्थिक आणि व्यवस्थापकीय नियंत्रण प्रभावशाली बाह्य घटकांकडे असल्याचा आरोप अधिक गंभीर स्वरूप धारण करू लागला आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे; एवढ्या मोठ्या खाण व्यवसायासाठी लागणारा पैसा नेमका कुठून आला? कारण अनेक कथित लाभार्थी आदिवासी कुटुंबांची प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती पाहता कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करणे त्यांच्या आवाक्याबाहेर असल्याचे स्पष्ट दिसते. उत्खननासाठी लागणाऱ्या पोकलेन मशीन, हायवा, डंपर, डिझेल, मजूर आणि रॉयल्टी खर्चासाठी लागणारी रक्कम जर इतरांकडून पुरवली जात असेल, तर मग खरा मालक कोण, हा प्रश्न आता थेट प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

स्थानिक पातळीवर अशीही चर्चा आहे की, काही ठिकाणी आदिवासींच्या नावावर केवळ कागदोपत्री परवाने घेण्यात आले आणि त्यानंतर संपूर्ण व्यवहार इतरांनी हाताळले. अनेक करार हे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय स्टॅम्प पेपर किंवा बाँडवर करण्यात आल्याचा आरोप असून, हे व्यवहार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदींना बगल देणारे असल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे, खाण व्यवसायाशी संबंधित आर्थिक व्यवहारांची व्याप्ती मोठी असतानाही संबंधित आदिवासी कुटुंबांच्या जीवनमानात कोणताही ठोस बदल दिसून येत नाही. ज्या जमिनींवरून लाखो-कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे सांगितले जाते, त्याच जमिनींचे मालक आजही रोजंदारी, मजुरी आणि शासकीय योजनांवर अवलंबून असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे हा संपूर्ण उद्योग आदिवासी विकासाच्या नावाखाली सुरू असलेला आर्थिक मुखवटा तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### 'मनी ट्रेल' उघड झाली तरच खरे चेहरे समोर येणार?

अकोटातील कथित 'बेनामी' खाणसाखळी प्रकरणात आता आर्थिक व्यवहारांच्या तपासाची मागणी तीव्र झाली आहे. परवाने आदिवासींच्या नावावर असले तरी रॉयल्टी, मशीनरी, डिझेल, वाहतूक आणि उत्खननासाठी लागणारा कोट्यवधींचा खर्च नेमका कोण करत आहे, हा मुख्य प्रश्न उपस्थित होत आहे. या आर्थिक साखळीची चौकशी करीत मनी ट्रेल तपासल्यास कथित 'बेनामी' व्यवहारांचे खरे सूत्रधार समोर येऊ शकतात, असे बोलले जात आहे. तर या प्रकरणाचा तपास केवळ महसूल विभागापुरता मर्यादित न ठेवता आर्थिक गुन्हे शाखा, आयकर विभाग, सक्तवसुली संचालनालय (ॐ) आणि बेनामी व्यवहार प्रतिबंधक प्राधिकरणामार्फत करण्याची मागणी पुढे येत आहे.

### कागदोपत्री लखपती, वास्तवात दारिद्र्य

ज्या आदिवासी कुटुंबांच्या नावावर खदान आणि परवाने असल्याचे दाखवले जाते, त्यातील अनेक कुटुंबांची परिस्थिती आजही हलाखीची असल्याचे वास्तव समोर येत आहे. कोट्यवधींच्या व्यवहारांच्या दाव्यांनंतरही अनेक कुटुंबांकडे मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे.

या कथित खाणसाखळीतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शासन अनुदानाचा. आदिवासी बांधवांच्या जमिनीवर करारनामा, भाडेपट्टे करून उभारण्यात आलेल्या प्रकल्पांना आर्थिक लाभ मिळाले असल्याची चर्चा आहे. जर या उद्योगांत खरोखर शासनाला चुकीची माहिती देऊन लाभ घेतल्याचा प्रकार उघड झाला तर अशा परिस्थितीत संबंधितांवर फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार आणि बेनामी व्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, प्रशासनाच्या भूमिकेवरही आता तीव्र टीका होत आहे. महसूल, खनिकर्म, प्रदूषण नियंत्रण मंडळ, ग्रामपंचायत, पोलीस आणि उद्योग विभाग या सर्व यंत्रणांच्या नजरेसमोर इतक्या मोठ्या प्रमाणावर खाण व्यवसाय सुरू असताना त्याकडे दुर्लक्ष कसे झाले, असा सवाल उपस्थित होत आहे.

या संपूर्ण प्रकरणात आर्थिक व्यवहारांची चौकशी हा सर्वात निर्णायक मुद्दा ठरू शकतो. रॉयल्टी भरण्यासाठी वापरलेली खाती, वाहनांचे व्यवहार, मशीनरी खरेदी, बँक व्यवहार, जीएसटी नोंदी आणि करारनाम्यांची साखळी तपासली गेल्यास या कथित 'बेनामी' साम्राज्याचे खरे चेहरे समोर येऊ शकतात, असा दावा स्थानिक स्तरावर केला जात आहे. आदिवासींच्या नावावर खाण दाखवून प्रत्यक्ष नफा इतरांनी लाटल्याचा आरोप खरा ठरल्यास, हे प्रकरण केवळ आर्थिक गैरव्यवहारापुरते मर्यादित राहणार नाही, तर आदिवासी हक्क आणि सामाजिक न्याय व्यवस्थेवर झालेला गंभीर आघात मानला जाऊ शकतो.

# हळदीच्या मांडवात दुःखाचा आक्रोश

## लग्नाच्या आदल्या दिवशी भावाचा मृत्यू

### रामा येथे हृदयद्रावक घटना



**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** ज्या घरात सनई-चौघड्यांच्या सुरांत आनंदाचे वातावरण नांदत होते, जिथे नवरदेवाच्या हाताला हळद लागून लग्नसोहळ्याची लगबग सुरू होती, त्याच घरात नियतीने क्रूर घाला घालत आनंदाचे रूपांतर क्षणात आक्रोशात केले. भातकुली तालुक्यातील रामा येथे आखरे परिवारावर लग्नाच्या पूर्वसंध्येलाच दुःखाचा डोंगर कोसळला. नवरदेव हर्षल सुधाकर आखरे यांचा थोरला भाऊ तुषार सुधाकर आखरे (वय ३५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ६ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास हर्षल यांच्या लग्नाच्या हळदीचा कार्यक्रम उत्साहात सुरू होता. नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत मंगलगीते, हास्य-विनोद आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. घरासमोर आकर्षक मांडव सजविण्यात आला होता. मात्र, या आनंदोत्सवाला अचानक दुःखाची किनार लागली. हळदीच्या कार्यक्रमादरम्यान तुषार आखरे यांना अचानक तीव्र हृदयविकाराचा झटका आला.कुटुंबीयांनी तातडीने उपचारासाठी धावपळ केली, मात्र उपचार मिळण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. भावाच्या लग्नात फेटा बांधून आनंद साजरा करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तुषार यांना नियतीने कायमचे हिरावून नेले.सर्वाधिक हृदयद्रावक क्षण तेव्हा ओढवला, जेव्हा लग्नाची मिरवणूक निघण्याची तयारी सुरू असताना त्याच मांडवातून तुषार आखरे यांची अंत्ययात्रा निघाली. नवरदेवाच्या वेशात बोहल्यावर चढण्याऐवजी हर्षल यांना आपल्या लाडक्या भावाच्या पार्थिवाला खांदा द्यावा लागला. हे दृश्य पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले.तुषारच्या मागे पत्नी ,चार वर्षाची मुलगी, नऊ महिन्याची मुलगी, आई, वडील, भाऊ असा आप्त परिवार आहे.या दुर्दैवी घटनेमुळे रामा गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

# दरोड्याच्या तयारीत असलेले शस्त्रधारी गुन्हेगार जेरबंद

**तलवारी, चाकू, मिरची पूड जप्त**



**अमरावती/प्रतिनिधीः-** दरोडा टाकण्याच्या तयारीत शस्त्रास्त्रांसह दबा धरून बसलेल्या टोळीचा मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी पर्दाफाश करत तिघांना अटक केली, तर पाच जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. आरोपींकडून तलवारी, फरशी, चाकू, स्टील रॉड, लाकडी काठ्या आणि मिरची पूड ☞(पान २ वर)

# मजीप्राची मुख्य पाईपलाईन फुटली

## दोन दिवस बंद राहणार पाणीपुरवठा



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराला मोर्शी येथील सिंभोरा धरणातून पाणीपुरवठा करणारी १५०० मिमी व्यासाची मुख्य पाईपलाईन आज गुरुवार ७ मे च्या दुपारी ३ वाजता सुमारास डवरगांव जवळ अचानक फुटली. या मोठ्या बिघाडामुळे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून पुढील किमान दोन दिवस शहरवासीयांना पाणी मिळणार नाही. नागरिकांना गंभीर टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. मुख्य पाईपलाईन अचानक फुटल्याने रस्त्यावर पाणी वाहत आहे. तांत्रिक बिघाडामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती सुरू झाली आहे. घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. या जलवाहिनीचा व्यास तब्बल पंधराशे मिली असल्याने दुरुस्तीचे काम अत्यंत जटिल आणि वेळखाऊ आहे. पाईपलाईन दुरुस्तीसाठी मोठ्या जन सामग्रीची मदत घेतली जात असून संबंधित☞(पान २ वर)

### शेतात शिरले पाणी -

मजीप्राची पाईपलाईन फुटल्याने नांदगाव पेठ परिसरात एका शेतकऱ्याच्या शेतात पाणी शिरले. यामुळे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात पूर्ण पाणी पाईपलाईन फुटल्याने साचले होते. हजारो लिटर पाणी वाया गेले आहे.

# पोलीस पाटलाला मारहाण करणाऱ्या तिघांना कारावास

**-अचलपूर न्यायालयाचा निकाल**
**डीजे बंद करण्यास सांगितल्याचा राग**

**अमरावती/प्रतिनिधीः-** गावातील डीजेचा आवाज बंद करण्यास सांगितल्याच्या रागातून पोलीस पाटलाला शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या तिघांना अचलपूर येथील सत्र न्यायालयाने दोषी ठरवत तीन महिने सक्तमजुरी आणि प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक २ यांनी बुधवारी दि. ६ मे रोजी दिला.

या प्रकरणातील आरोपी सय्यद मन्नान सय्यद रज्जाक (वय ५५), सय्यद सलमान सय्यद मन्नान (वय २५, दोघेही रा. गौलखेडा बाजार) आणि शेख परवेज शेख शब्बीर खान (वय ३८, रा. गणेशनगर, परतवाडा) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार, चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौलखेडा बाजार येथे १५ जून २०२१ रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास आरोपींच्या घरी मोठ्या आवाजात डीजे सुरू होता. आवाजामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाल्याने त्यांनी गावचे पोलीस पाटील तथा तक्रारदार रमेश वसंत महल्ले यांच्याकडे तक्रार केली. यानंतर महल्ले हे आरोपींच्या घरी जाऊन डीजे बंद करण्यास सांगितले. मात्र, याचा राग मनात धरून आरोपींनी 'तू कोण सांगणारा?' असे म्हणत अश्लील शिवीगाळ केली आणि त्यांना मारहाण केली. यावेळी ☞(पान २ वर)

# क्षमता असेल तरच श्वान निर्बीजीकरणाचे काम घ्या

## जनतेच्या जीवाशी खेळू नका : अनिल अग्रवाल यांचा इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरात ठिकठिकाणी पिसाळलेल्या कुत्र्यांच्या टोळ्या फिरत असून लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच दहशतीखाली आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने ५ हजार कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी ८२ लाख ५० हजार रुपयांची नवी निविदा प्रक्रिया राबवली आहे. मात्र, यापूर्वी अशाच कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने नवीन कंत्राटाकडे शंकेच्या नजरेतून पाहिले जात आहे. जुन्या अनुभवातून धडा घेत प्रशासनाने पारदर्शक कारभार करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने 'मेगा प्लॅन' तयार केला आहे. यानुसार शहरातील पाचही विभागांतून ५ हजार कुत्रे पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्यात येणार आहे. यासाठी ८२ लाख ५० हजार रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला असून अनेक खासगी संस्था हे कंत्राट मिळवण्यासाठी स्पर्धेत उतरल्या आहेत. १८ मे पर्यंत निविदा सादर करण्याची अंतिम मुदत असून त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. निवडलेल्या संस्थेला कुत्र्यांना पकडण्यापासून ते त्यांच्या शस्त्रक्रियेनंतरची औषधोपचार आणि जेवणाची व्यवस्था सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करावी लागणार आहे. यापूर्वी देखील महापालिकेने कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च केला होता. मात्र, प्रत्यक्षात शहरात कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी ती वाढतच गेली. कागदोपत्री सर्व सोपस्कार पूर्ण करून केवळ देयके लाटण्याचे प्रकार घडल्याचा आरोप होत आहे. ☞(पान २ वर)

# शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करणार



**पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत माजी खासदार अनंतराव गुढे यांची घोषणा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** भूतकाळातील शिवसेनेचे वैभव पाहता अमरावती जिल्ह्यामध्ये अनंतराव गुढे यांचेसह एक खासदार, तीन आमदार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, मनपा उपमहापौर, जि. प. सदस्य, पंचायत समिती सभापती, सरपंच होते. एके काळी काँग्रेसचे केंद्र आणि राज्यात सरकारे असताना सुद्धा शिवसेनेने प्रचंड यश मिळवित राज्यात प्रथमच शिवसेना-भाजपा युतीचे सरकार स्थापन करून पहिला गैरकाँग्रेसी मुख्यमंत्री हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेबांनी बसविला. पण हे वैभव अमरावती जिल्ह्यात आज नाहीसे झाल्याची खंत अनंतराव गुढे यांना सतत सलत होती. शिवसेनेचे ☞(पान २ वर)

# अमरावतीमध्ये २,५,व १०,रुपये स्टॅम्प तात्काळ उपलब्ध करा

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती शहर व जिल्ह्यामध्ये २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकीटे तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या मागणीला घेऊन राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती शहरच्या वतीने जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. निवेदनात सांगण्यात आले कि, सद्या अमरावती शहर व जिल्ह्यामध्ये २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकीटांचा मोठा तुटवडा जाणवत आहे. शहरात शालेय व महाविद्यालयीन कामकाजासाठी लागणारे दाखले , तसेच महसूल संदर्भातील कामांकरिता , न्यायालयीन कामे आदींकरिता २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकिटांची नेहमीच आवश्यकता असते. बऱ्याच ठिकाणी मुद्रांक शुल्क तिकीट स्वरूपात पाच रुपये व दहा रुपये आकारल्या जात असून ☞(पान २ वर)

# महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत अमरावती ग्रामीणची दमदार कामगिरी

**-सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुंबई येथे दि. २० एप्रिल ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत अमरावती ग्रामीण पोलीस दलातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. राज्यभरातील विविध पोलीस घटकांतील खेळाडूंमध्ये झालेल्या या स्पर्धेत अमरावती ग्रामीण पोलिसांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत आपला ठसा उमटविला.

स्पर्धेत मपोको वैष्णवी उचितकर यांनी तायक्वांदो प्रकारात सुवर्ण पदक तर वुशूमध्ये कांस्य पदक पटकावले. पोको चिराग तायडे यांनी वुशूमध्ये रौप्य पदक मिळविले, तर पोको आकाश इंदुरकर यांनी तिहेरी उडी प्रकारात रौप्य पदकाची कमाई केली. मपोको वैशाली शिंगाडे आणि मपोको करूणा काळे यांनी व्हॉलीबॉल स्पर्धेत रौप्य पदक मिळवून संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. तसेच पोको अक्षय नितनवरे यांनी तायक्वांदोमध्ये कांस्य पदक, तर मपोको मनिषा पवार यांनी 4x400 रिले स्पर्धेत कांस्य पदक पटकावले.

याशिवाय पुणे येथे आयोजित २६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस शुटींग स्पर्धा २०२६ मध्ये पोहेका निलेश☞(पान २ वर)

# महावितरणने दिली दुरूस्ती कार्याला गती

## वादळचा कहर - महावितरण यंत्रणेला मोठा फटका

**अमरावती/प्रतिनिधीः-** वादळामुळे अस्त-व्यस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरूस्ती कामाला महावितरणने लगेच सुरूवात केली आहे. कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे व उपकार्यकारी अभियंता जंयत घाटे प्रत्यक्ष फिल्डवर पोहचले असून नुकसानाची माहिती घेत दुरूस्ती कार्याला जोरदार गती दिली आहे. त्यामुळे या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. आज दुपारी प्रचंड दाबासह झालेल्या वादळामुळे महावितरणच्या बडनेरा उपविभागातील यंत्रणा अस्त -व्यस्त झाली आहे. यात मुख्यत्वे २२० केव्ही कोंडेश्वर या अती उच्चदाब उपकेंद्रातून निघणारी आणि ३३ केव्ही अंजनगाव बारी उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही वाहिनीचे ५ पोल पडून वाहिनीचे



नुकसान झाले . याचबरोबर ३३ केव्ही अंजनगाव बारी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही अडगाव,आणि ११ केव्ही अंजनगाव बारी या उच्चदाब वाहिनीचेही ७ पोल व वाहिनी जमिनदोस्त झाली आहे.

वादळाचा दबाव एवढा ☞(पान २ वर)

# शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष

## १२ लाख ९५ हजार ७५३ रुपयांची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेअर बाजारात गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल १२ लाख ९५ हजार ७५३ रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोली रोडवरील म्हाडा कॉलनी येथे राहणारा विनय वसंतराव छपाणे (वय ३१) हा इंस्टाग्रामचा वापर करत असताना त्याला शेअर बाजाराशी संबंधित गुंतवणुकीची एक जाहिरात दिसली. अधिक नफा मिळण्याच्या आशेने त्याने त्या जाहिरातीवरील लिंकवर क्लिक केले. त्यानंतर त्याचा मोबाईल क्रमांक एका व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आला. त्या व्हॉट्स ॲप ग्रुपमधील☞(पान २ वर)